# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक




## "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागांतर्गतच्या विविध योजना, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम, उपक्रम व इतर अनुषंगिक कामकाजांबाबतची नियमावली,२०२१."

(विद्यार्थी कल्याण विभाग, मआविवि, नाशिक)

MUHS

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## नियमावली मसुदा समिती

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. आशुतोष गुप्ता | अध्यक्ष |
| २ | डॉ. मनिषा यु. कोठेकर | सदस्य |
| ३ | डॉ. अजित एम. गोपछडे | सदस्य |
| ४ | डॉ. किशोर मालोकर | सदस्य |
| ५ | डॉ. विनोद श्रावण पाटील | सदस्य |
| ६ | ॲड. संदिप एस. कुलकर्णी | सदस्य सचिव |

नियमावलीचे शब्दांकन :- ॲड. संदिप एस. कुलकर्णी
(प्रभारी संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मआविवि, नाशिक)


सहकार्य :-

१) श्री.बी.आर.पेंढारकर - वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता (विद्यार्थी कल्याण विभाग,मआविवि, नाशिक)

२) श्री. किशोर आर. पाटील - कक्ष अधिकारी (विद्यार्थी कल्याण विभाग, मआविवि, नाशिक)



# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (संलग्नित महाविद्यालये)




नकाशातील महाविद्यालयांची संख्या दि. ३१/१२/२०२१ ची स्थिती दर्शविणारी आहे.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

म्हसरुळ, वणी-दिंडोरी रोड, नाशिक - ४२२००४

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागांतर्गतच्या विविध योजना, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम, उपक्रम व इतर अनुषंगिक कामकाजांबाबतची नियमावली,२०२१.

-: अ नु क्र म णि का :-


| प्रकरण क्र. १ : प्रारंभिक | | |
|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
| १) | संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रारंभ | ०८ |
| २) | व्याख्या | |

| प्रकरण क्र. २ : विद्यार्थी कल्याण योजना | | |
|---|---|---|
| ३) | धन्वंतरी विद्याधन योजना | ०९ ते ३२ |
| ४) | बहि:शाल शिक्षण मंडळ योजना | |
| ५) | सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना | |
| ६) | संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना | |
| ७) | कमवा व शिका योजना | |
| ८) | योजनांसंबधी संकिर्ण तरतुदी | |

| प्रकरण क्र. ३ः क्रीडा स्पर्धा | | |
|---|---|---|
| ९) | विभागीय, आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा, सराव शिबीर, भारतीय विद्यापीठ संघ क्रीडा स्पर्धा व इतर क्रीडा स्पर्धा | ३३ ते ५८ |

| प्रकरण क्र. ४: विद्यार्थ्यांकरीता कौशल्य विकास कार्यक्रम | | |
|---|---|---|
| १०) | व्यावसायिक मार्गदर्शन | ५९ ते ६३ |
| ११) | व्यक्तिमत्व विकास समुपदेशन, प्रभावी शिक्षण व संवाद कौशल्य | |

| प्रकरण क्र. ५ : सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम व उपक्रम | | |
|---|---|---|
| १२) | स्पंदन | ६४ ते ७९ |
| १३) | निबंध स्पर्धा | |
| १४) | सामाजिक जनजागृती उपक्रम | |
| १५) | स्व.डॉ.दौलतराव आहेर व्याख्यानमाला | |
| १६) | इंद्रधनुष्य | |
| १७) | युवा महोत्सव सहभाग | |
| १८) | विद्यापीठ आरोग्य बँक | |

| प्रकरण क्र. ६ : संशोधन कार्यक्रम व उपक्रम | | |
|---|---|---|
| १९) | अविष्कार निवड चाचणी | ८० ते ८६ |
| २०) | अविष्कार पुर्व प्रशिक्षण शिबीर | |
| २१) | अविष्कार | |
| २२) | अविष्कार फेलोशिप | |
| २३) | अन्वेषण | |

| प्रकरण क्र. ७ : रॅगिंग प्रतिबंध व विद्यार्थी परिषद | | |
|---|---|---|
| २४) | रॅगिंग विरोधी समिती व उपक्रम | ८७ ते ९२ |
| २५) | विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवडणुक व विद्यार्थी परिषदेची कार्यशाळा | |

| प्रकरण क्र. ८ : राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) | | |
|---|---|---|
| २६) | राष्ट्रीय सेवा योजना अंशदान/शुल्क व अनुदान वाटप | ९३ ते ९७ |
| २७) | राष्ट्रीय सेवा योजना स्वयंनिर्वाह एकक | |

| प्रकरण क्र. ९ : माजी विद्यार्थी संघ | | |
|---|---|---|
| २८) | विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ | ९८ ते १०० |
| २९) | महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ | |

| प्रकरण क्र. १० : समन्वयक | | |
|---|---|---|
| ३०) | विभागीय क्रीडा समन्वयक | १०१ ते १०३ |
| ३१) | महाविद्यालय समन्वयक | |

| प्रकरण क्र. ११ : प्रो-राटा | | |
|---|---|---|
| ३२) | क्रीडा महोत्सव शुल्क, क्रीडा शुल्क, तसेच विद्यार्थी कल्याण निधी | १०४ ते १०८ |
| ३३) | विद्यापीठ विकास निधी | |
| ३४) | आपत्ती व्यवस्थापन निधी | |

| प्रकरण क्र. १२ : पुरस्कार आणि क्रीडा शिष्यवृत्ती | | |
|---|---|---|
| ३५) | उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट विद्यार्थी व विद्यार्थीनी, उत्कृष्ट क्रीडा शिक्षक आणि उत्कृष्ट खेळाडू विद्यार्थी व विद्यार्थीनी | १०९ ते १२० |
| ३६) | जीवनगौरव पुरस्कार | |
| ३७) | राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार | |
| ३८) | क्रीडा शिष्यवृत्ती | |

| प्रकरण क्र. १३ : संकिर्ण तरतुदी, विविध अर्जांचे नमुने व प्रपत्र | | |
|---|---|---|
| ३९) | संकिर्ण तरतुदी | १२१ ते १३९ |
| ४०) | विविध अर्जांचे नमुने व प्रपत्र | |

## प्रकरण क्र. १ : प्रारंभिक

१) संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रारंभ

(१.१) सदर नियमावलीस, "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागांतर्गतच्या विविध योजना, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम, उपक्रम व इतर अनुषंगिक कामकाजांबाबतची नियमावली, २०२१" असे संबोधण्यात येईल.

(१.२) सदर नियमावली व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केल्याच्या दिनांकापासुन लागु असल्याचे समजले जाईल.

(१.३) सदर नियमावली महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संचलीत महाविद्यालय, प्रशाळा, विद्यापीठ विभाग, विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना लागू राहील.

(१.४) सदर नियमावली लागू होण्याच्या दिनांकापुर्वीपर्यंत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागांतर्गत विविध योजना, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतीक व सामाजिक कार्यक्रम, उपक्रम व त्या अनुषंगिक इतर कामकाज त्या-त्या वेळी जे निदेश, नियम किंवा परिपत्रकाद्वारे संचलीत केले जात होते ते सर्व निदेश, नियम व परिपत्रक उक्त नियमावली लागू झाल्याचे दिनांकास निरसित झाल्याचे समजण्यात येईल. अशा प्रकारे सदर निदेश, नियमावली किंवा परिपत्रकांचे निरसन झाले असले तरी त्याअन्वये करण्यात आलेली कोणतीही बाब किंवा केलेली कार्यवाही ही निरर्ह ठरणार नाही.

२) व्याख्या

(२.१) "विद्यापीठ" या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ चे कलम ३ अन्वये स्थापन झालेले "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ" असा असेल.

(२.२) सदर नियमावलीमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ मध्ये विषद केलेल्या संज्ञांचा अर्थ उक्त नियमावलीस जसाच्या तसा लागू असेल.

३) धन्वंतरी विद्याधन योजना

(३.१) प्रस्तावनाः- धन्वंतरी विद्याधन योजनेत विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या अभ्यासक्रमाच्या ज्या नियमित विद्यार्थ्यांनी शिक्षणाकरीता बॅंकेकडून महाविद्यालयाचे शिक्षण शुल्क भरण्याकरीता कर्ज घेतले असेल अशा कर्जावरील व्याजाच्या रक्कमेच्या परताव्याकरीता ठराविक मर्यादेपर्यंत विद्यापीठातर्फे अनुदान देणे हा सदर योजनेचा उद्‍देश असुन सदर योजनेचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(३.२) सदर योजनेचा लाभ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व अभ्यासक्रमाच्या मागील वर्षात उत्तीर्ण झालेल्या गरजू व पात्र विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असेल.

(३.३) खालील विद्यार्थी धन्वंतरी विद्याधन योजनेचा लाभ घेण्यास अपात्र असतील;

(**I**) आंतरवासियता (Internship) प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी;

(**II**) अनिवासी भारतीय (Non Resident Indian - NRI) विद्यार्थी;

(**III**) परराज्यातून आलेले (Other than Maharashtra State - OMS) विद्यार्थी; आणि

(**IV**) व्यवस्थापन कोटयातून (Management Quota) प्रवेश घेतलेले विद्यार्थी.

(३.४) विद्यार्थ्यास केंद्र शासन, राज्य शासनाच्या किंवा अन्य संस्थांकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप, शुल्क परतावा, शुल्क सवलत मिळत असेल तरी देखील असे विद्यार्थी सदर योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील. तथापि, महाराष्ट्र शासनातर्फे राबविली जात असलेली शैक्षणिक कर्ज व्याज अनुदान सवलत (Education Loan Subsidy Scheme) घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय नसेल.

(३.५) विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क भरण्याकरीता बॅंकेकडून संपुर्ण कर्ज एकरक्कमी घेतलेले असेल किंवा मंजूर झालेल्या कर्जापैकी दरवर्षी कर्जाची रक्कम हप्त्यात घेत किंवा घेणार असेल, अशा प्रत्येक संलग्नित महाविद्यालयाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या १५ टक्के पदवी व १० टक्के पदव्युत्तर पदवी शिक्षण घेणाऱ्या नियमित व पात्र विद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू असेल.

(३.६) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुंबाचे सर्व स्त्रोतांतून प्राप्त होणारे वार्षिक उत्पन्न शासन/विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा कमी असेल असे विद्यार्थी सदर योजनेचा लाभ घेऊ शकतील. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची यादी व प्रस्ताव तयार करतांना सदर योजनेचा लाभ घेऊ ईच्छिणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. विद्यापीठाच्या दरवर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात सदर योजनेकरीता केलेल्या आर्थिक तरतुदीच्या मर्यादेत विद्याधन अनुदान वाटपाची कमाल मर्यादा प्रती पात्र विद्यार्थी रु.३०,०००/-(रुपये तीस हजार मात्र) असेल. विद्याधन अनुदानाच्या सदर रक्कमेत वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असेल.

(३.७) विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयाकडुन प्राप्त होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रस्तावानुसार व्याजाच्या रक्कमेची/अनुदानाची परीगणना करण्यासाठी विद्यार्थ्याने त्यालगतच्या मागील आर्थिक वर्षाचे कालावधीत शैक्षणिक कर्जावर बॅंकेने आकारलेले व्याज व विद्यार्थ्यांच्या पालकाच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यात येईल.

(३.८) शिक्षणशुल्क समितीने संलग्नित महाविद्यालयासाठी निर्धारीत केलेले शुल्क विचारात घेऊन विद्यार्थ्याने १२ महिन्यांच्या कालावधीमध्ये ज्या महिन्यात शैक्षणिक कर्ज घेतले असेल, तो महिना सोडून त्याच्या पुढील महिन्यापासुन कर्ज रक्कमेवरील व्याजाच्या रक्कमेची परिगणना करण्यात येईल.

(३.९) शैक्षणिक कर्जाच्या व्याजापोटी विद्याधन अनुदान देतांना शिक्षण शुल्क समितीने संबंधीत महाविद्यालयाचे चालु वर्षाचे निर्धारीत केलेले शिक्षण शुल्क ग्राहय धरले जाईल. शिक्षण शुल्क समितीने संबंधीत महाविद्यालयाचे चालु

वर्षाचे शिक्षण शुल्क निर्धारीत केलेले नसल्यास लगतच्या मागील वर्षाचे शिक्षण शुल्क समितीने निर्धारीत केलेले शिक्षण शुल्क ग्राहय धरण्यात येईल. तसेच, ज्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या शैक्षणिक प्रवेशानंतर एकरक्कमी कर्ज घेतलेले असेल अशा विद्यार्थ्यांना त्या आर्थिक वर्षातील व्याजाच्या रकमेची परीगणना करुन व्याजापोटी विद्याधन अनुदान अनुज्ञेय असेल.

(३.१०) सदर योजनेचा लाभ घेऊ ईच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी परिपुर्ण प्रस्ताव महाविद्यालयामार्फत विद्यापीठास विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक असेल. सदर योजनेची माहिती, त्याबाबतचे भित्तीपत्र व मुदतीबाबतचे परिपत्रक विद्यापीठ सर्व संलग्नित महाविद्यालयांना टपालाद्वारे पाठवेल. सदर माहिती, भित्तीपत्र व परिपत्रक महाविद्यालयाने सुचना फलकावर लावणे व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन देणे आवश्यक असेल. प्रस्तावासोबत खालील दस्तऐवज जोडणे आवश्यक असेल.

(I) विद्यार्थ्यांचा प्राचार्यांनी साक्षांकीत केलेला संपुर्ण माहिती भरलेला नमुना आवेदन अर्ज;

(II) विद्यार्थ्यांचे स्वयंघोषणापत्र;

(III) ज्या बॅकेतुन शैक्षणिक कर्ज घेतलेले असेल त्या बॅकेच्या व्यवस्थापकांच्या सही शिक्क्यासह विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या नमुन्यातील बॅकेचे मुळ पत्र;

(मंजूर झालेल्या कर्जापैकी प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेल्या कर्जाचा व कर्जावरील व्याजदरासह होणाऱ्या व्याज रक्कमेचा त्यामध्ये स्पष्ट उल्लेख असावा).

(IV) लगतच्या गतवर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यापीठाच्या परिक्षेच्या गुणपत्रकाची विद्यार्थ्यांनी स्वयंसाक्षांकित केलेली छायाप्रत;

(V) आवेदक विद्यार्थ्यांच्या पालकांच्या एकत्रित उत्पन्नाचा लगतच्या गतवर्षाच्या दाखल्याची स्वसाक्षांकित प्रत; (तहसीलदार/ सक्षम

प्राधिकाऱ्याने निर्गमीत केलेल्या उत्पनाच्या दाखल्याव्यतिरीक्त इतर कोणत्याही प्रकारचा दाखला ग्राहय धरण्यात येणार नाही.)

(VI) व्याजाच्या रक्कमेची मागणी केलेल्या आर्थिक वर्षातील (१ एप्रिल ते ३१ मार्च) या कालावधीचे बॅकेने दिलेली कर्जउताऱ्याची (Loan Statement) मुळ प्रत;

(VII) आवेदक विद्यार्थ्यांच्या आधारकार्डची विद्यार्थ्यांने स्वयंसाक्षांकीत केलेली छायाप्रत;

(३.११) प्रस्तावासोबत सादर केलेल्या बॅकेने दिलेल्या कर्जखात्याच्या उताऱ्यामध्ये (स्टेटमेंटमध्ये) किंवा बॅक व्यवस्थापकांच्या पत्रामध्ये प्रमाणित केल्याप्रमाणे प्रत्यक्ष आकारण्यात आलेला व्याज दर किंवा जास्तीत जास्त १५ टक्के व्याजदर या पैकी जो कमी असेल त्या दराने कर्ज रक्कमेवरील व्याजाची परिगणना करण्यात येईल.

(३.१२) विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येईल. प्रस्ताव अपुर्ण असेल किंवा निर्धारीत मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झालेला असेल तर असा प्रस्ताव नाकारण्याचे विद्यापीठास अधिकार असतील. तसेच ई-मेलव्दारे प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. उशिरा किंवा अपुर्ण प्रस्तावासंबंधी विद्यार्थ्यांकडुन किंवा त्यांच्या पालकांकडुन विद्यापीठास प्राप्त तक्रारीची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयांवर असेल.

(३.१३) विद्यार्थ्यांनी ज्या बॅकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असेल अशा संबंधीत बॅकेच्या नांवे व्याज अनुदानाची रक्कम धनादेश/धनाकर्षाव्दारे संबंधीत विद्यार्थ्यांना प्राचार्यामार्फत वाटप करण्यात येईल. अनुदानाच्या रक्कमेचा धनादेश/धनाकर्ष कुठल्याही परिस्थितीत कर्ज ज्या बॅकेकडुन घेतलेले असेल त्या बॅकेच्या नावांव्यतिरीक्त इतरांचे नांवे देण्यात येऊ नये.

४) <u>बहि:शाल शिक्षण मंडळ योजना</u>

(४.१) प्रस्तावना :- विद्यार्थ्याच्या सर्वांगीण व्यक्तीमत्व विकासाला चालना देण्याकरीता महाविद्यालयबाहय अभ्यासक्रमांव्यतिरिक्त उपक्रमांच्या माध्यमातुन सामाजिक कार्याचा परिचय करवुन देणे, विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यात सहभाग घेण्यास प्रवृत्त करणे व महाविद्यालय परिसरातील जनतेची सामाजिक जाणीव सजग करणे, तसेच आरोग्यविषयक व देशहितविषयक बाबींच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास करण्याच्या दृष्टीने सदर योजना सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाकडे खर्चाची प्रतीपूर्ती म्हणुन न पाहता सामाजिक बांधीलकी म्हणुन बघणे अपेक्षित आहे. त्यामुळे प्राप्त अनुदानाचा विनियोग हा केवळ कार्यक्रम घेणे असा न ठेवता समाज जागृती व नवनिर्मितीच्या कामात महाविद्यालय व विद्यार्थी यांचा सक्रिय सहभाग असावा या उदात्त हेतूने बहि:शाल शिक्षण कार्यक्रम ही योजना सुरु करण्याचा उद्‌देश असेल. तसेच, सदर योजना ही निव्वळ अभ्यासक्रमबाहय व्यक्तीमत्व विकासाचा उपक्रम न राहता समाज जागृती व नवनिर्माणाची चळवळ सुरु व्हावी असादेखील सदर योजनेचा उद्‌देश असुन सदर योजनेचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(४.२) सदर योजनेंतर्गत उपक्रमांकरीता ज्या महाविद्यालयांचे प्रस्ताव विहित नमुन्यात व विहीत मुदतीत विद्यापीठास प्राप्त होतील अशा प्रत्येक पात्र महाविद्यालयास जास्तीत जास्त रु.१०,०००/-(रु.दहा हजार मात्र) प्रति कार्यक्रम/उपक्रम अनुदान विद्यापीठामार्फत देण्यात येईल. सदर योजनेंतर्गतच्या अनुदानाच्या रक्कमेत बदल करण्याचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असेल. ज्या महाविद्यालयाने सदर योजनेचा यापुर्वी लाभ घेतला नसेल /कमीत कमी वेळा लाभ घेतला असेल अशा महाविद्यालयांना प्रथम प्राधान्य देऊन विद्यापीठाच्या अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतुदीच्या कमाल मर्यादेत अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

(४.३) बहिःशाल शिक्षण मंडळ योजनेअंतर्गत महाविद्यालयास व्याख्यानमाला, परिसंवाद, चर्चासत्र किंवा शिबीर यांचे आयोजन करता येईल.

(४.४) व्याख्यानमाला/परिसंवाद/चर्चासत्र/शिबिर याद्वारे ज्या विषयांवर मार्गदर्शन अपेक्षित आहे त्यासाठी तज्ञ व्याख्याता/मार्गदर्शकांना आमंत्रित करण्याचे व प्रस्तावित विषयांव्यतिरिक्तच्या विषयाची निवड करण्याचे अधिकार महाविद्यालयाच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांना असतील. कार्यक्रम/उपक्रम अनिवासी स्वरुपाचे असावे व त्यांचे स्वरुप साधारणपणे दरवर्षी बदलते असावे.

(४.५) बहिःशाल शिक्षण मंडळ योजनेंतर्गत आयोजित व्याख्यानमालेसाठी परिसंवाद, चर्चासत्र किंवा शिबीरासाठी प्रस्तावित विषयांची यादी खालील प्रमाणेः

(I) महाविद्यालयातील जेष्ठ (सिनीयर) विद्यार्थी व नविन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी रॅगिंग प्रतिबंध विषयक समुपदेशन;

(II) रॅगिंग प्रतिबंध विषयी शिक्षक व महाविद्यालयाच्या आवारातील इतर घटक उदा. शिक्षकेतर कर्मचारी, वार्डन, कॅन्टीन स्टाफ, सुरक्षा रक्षक यांचेसाठी व्याख्यानमाला;

(III) महिला सबलीकरण;

(IV) स्त्री भ्रुणहत्या;

(V) व्यसनमुक्ती;

(VI) संवाद कौशल्य विकास; (Teacher–Student/Doctor-Patient Relationship/Communication Skills)

(VII) व्यक्तीमत्व विकास;

(VIII) आपत्ती व्यवस्थापन;

(X) तणाव व्यवस्थापन;

(XI) स्वच्छता-स्वच्छ परिसर व्यवस्थापन;

(XII) वृक्ष व जल संवर्धन.

(४.६) बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेसाठी विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाचे लेखापरिक्षण (Audit) करण्यासाठी महाविद्यालयांना अतिरिक्त रु.५००/-(रु.पाचशे मात्र) लेखापरिक्षण शुल्क (Audit Fees) म्हणुन अनुज्ञेय असतील.

(४.७) बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेंतर्गतच्या कार्यक्रम/उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाने करुन त्याअनुषंगिक सर्व खर्च करावा. सदर योजनेंतर्गत अनुदानाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयांनी खर्चाच्या सविस्तर तपशिलासह प्रस्तावास आवश्यक ती सर्व मुळ देयके जोडुन परिपुर्ण प्रस्ताव विद्यापीठास विहित मुदतीत सादर करणे आवश्यक असेल.

(४.८) बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेसाठीचे अनुदान खर्च करावयाचा तपशील विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या/विद्यापीठ वेळोवेळी प्रसिध्द करेल अशा नमुन्यात सादर करणे आवश्यक असेल.

(४.९) बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेच्या अनुदानाच्या खर्चाचे समायोजन करतांना महाविद्यालयांनी प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक असेल.

(**I**) कार्यक्रमाचा अहवाल, छायाचित्रे, शक्य असल्यास वृत्तपत्रातील बातम्यांची कात्रणे इ.;

(**II**) व्याख्यात्यांना/वक्त्यांना अदा करण्यात आलेल्या मानधनाची मूळ देयके/व्हाऊचर्स;

(**III**) कार्यक्रमासाठी प्रत्यक्ष झालेल्या इतर प्रशासकीय खर्चाची मूळ देयके;

(**IV**) उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) सनदी लेखापालांकडून (Chartered Accountant) केलेल्या लेखापरिक्षणाचा अहवाल;

(**V**) जमाखर्च/हिशोब, सनदी लेखापालांकडून प्रमाणित केलेल्या जमा खर्चाचा हिशोब;

(**VI**) रु.५००/- (रुपये पाचशे मात्र) लेखापरिक्षण शुल्काची (Audit Fees) मुळ पावती;

(४.१०) महाविद्यालयांनी बहिःशाल शिक्षण मंडळ या योजनेचा लाभ मिळण्यासाठी प्रस्ताव/अर्ज परिपत्रकान्वये विहित मुदतीत विद्यापीठास सादर करणे अपेक्षीत असेल. विहीत मुदतीत प्राप्त न झालेला अथवा ई-मेलद्वारे प्राप्त झालेला प्रस्ताव नाकारण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(४.११) महाविद्यालयाने सादर केलेल्या अर्जामध्ये महाविद्यालयाचे ज्या बॅंकेत खाते असेल त्या बॅंकेचे नाव, खाते क्रमांक, बॅंकेचा आय.एफ.एस.सी.कोड, बॅंकेची शाखा, बॅंकेचा पुर्ण पत्ता इ.माहिती नमुद करणे अनिवार्य असेल. जेणे करुन महाविद्यालयाच्या बॅंक खात्यामध्ये ईलेक्ट्रॉनिक्स ट्रान्सफरद्वारे (आरटीजीएस) अनुदानाची रक्कम वर्ग करणे विद्यापीठास सोईचे होईल.

(४.१२) सदर योजनेंतर्गत संलग्नित महाविद्यालयाने एका शैक्षणिक वर्षातून किमान एक एकदिवसीय व्याख्यानमाला/शिबीर/परिसंवाद/चर्चासत्र आयोजित करावे असे अपेक्षित आहे. एका कार्यक्रमापेक्षा जास्त कार्यक्रम राबवावयाचे असल्यास त्यास मुभा असेल.

(४.१३) महाविद्यालयाने व्याख्यानमाला/ परिसंवाद / चर्चासत्र / शिबिर आयोजनाकरीता विद्यापीठातर्फे निर्धारीत अनुदानापेक्षा जास्त खर्च केला असल्यास अशा अतिरिक्त खर्चाची विद्यापीठ अदायगी/प्रतिपुर्ती अनुज्ञेय नसेल.

(४.१४) सदर योजनेंतर्गत अनुदान रक्कमेतुन कोणत्याही स्वरुपाच्या भेटवस्तुची रक्कम प्रतिपुर्तीस अनुज्ञेय नसेल.

५) <u>सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना</u>

(५.१) प्रस्तावनाः- विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमाच्या मागील शैक्षणिक वर्षाच्या विद्यापीठाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तसेच, नियमित पदवी आणि पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या गरजु, हुशार व पात्र विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती देणे हा सदर योजनेचा उद्देश असुन सदर योजनेचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(५.२) सदर योजनेचा लाभ घेण्यास संलग्नीत महाविद्यालयातील पदवीपूर्व अभ्यासक्रमाचे नियमित शिक्षण घेणाऱ्या व मागील वर्षात उत्तीर्ण झालेल्या,

तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमास नियमित शिक्षण घेणाऱ्या (ज्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरीता प्रथम वर्ष झाल्यानंतर विद्यापीठ परीक्षा घेत असेल अशा अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या) गरजू व हुशार विद्यार्थीनी पात्र असतील.

(५.३) खालील विद्यार्थीनी या योजनेचा लाभ घेण्यास अपात्र असतील;

(I) आंतरवासियता (Internship) प्रशिक्षणार्थी विद्यार्थीनी;

(II) अनिवासी भारतीय (Non Resident Indian - NRI) विद्यार्थीनी;

(III) परराज्यातून आलेल्या (Other than Maharashtra State -OMS) विद्यार्थीनी; आणि

(IV) व्यवस्थापन कोटयातुन (Management Quota) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनी;

(५.४) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाच्या अधिष्ठाता/प्राचार्यांनी प्रस्ताव विद्यापीठास पाठविण्यापूर्वी, विद्यार्थीनीने त्यांच्याकडे सादर केलेल्या अर्जाची व त्यासोबतच्या दस्तऐवजांची छाननी करुन ती पात्र आहे किंवा कसे आणि सदर योजनेची आवेदनकर्त्या विद्यार्थीनीला आवश्यकता असल्याची खात्री करुनच गरजू विद्यार्थीनींचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करावेत. पदवी अभ्यासक्रमास १०० पर्यंत प्रवेश क्षमता असलेल्या संलग्नीत महाविद्यालयातून तीन विद्यार्थीनी, १०१-१५० प्रवेश क्षमता असलेल्या संलग्नीत महाविद्यालयातून चार विद्यार्थीनी, १५१-२०० प्रवेश क्षमता असलेल्या संलग्नीत महाविद्यालयातून पाच पात्र व गरजु विद्यार्थीनी या प्रमाणात प्रस्ताव विद्यापीठास विहीत मुदतीत सादर करावेत. तसेच, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास (सर्व विषयांतील अभ्यासक्रम मिळुन) प्रवेशित एका संलग्नीत महाविद्यालयातून केवळ १ पात्र व गरजु विद्यार्थीनीचा प्रस्ताव विद्यापीठास विहीत मुदतीत सादर करावा. याव्यतिरिक्त जास्तीचे प्रस्ताव सादर केल्यास असे अतिरिक्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. सदर प्रमाणात परिस्थितीनीरुप आवश्यक तसे बदल करण्याचे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असतील.

(५.५) उपरोक्त तरतुदीत विहित प्रमाणापैकी सदर योजनेअंतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षातील तरतूद केलेल्या रक्कमेपैकी ३ टक्के रक्कम दिव्यांग विद्यार्थीनींसाठी राखीव असेल. संलग्नीत महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थीनींचे प्रस्ताव महाविद्यालय स्तरावर अधिष्ठाता/प्राचार्य यांनी निवड करुन विद्यापीठास सादर करावेत. "प्रथम प्राप्त प्रथम प्राधान्य" या तत्वावर सदर आरक्षित रक्कमेच्या अनुदानाचे वाटप करण्यात येईल. दिव्यांग विद्यार्थीनींचे प्रस्ताव प्राप्त न झाल्यास राखीव रक्कम इतर पात्र सर्वसाधारण पात्र विद्यार्थीनींना वितरीत करण्यात येईल.

(५.६) ज्या आवेदनकर्त्या विद्यार्थीनींच्या पालकांचे मागील लगतच्या आर्थिक वर्षातील कमाल वार्षिक उत्पन्न शासन/विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा कमी असेल अशा विद्यार्थीनी सदर योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील.

(५.७) महाविद्यालयातील पात्र आवेदनकर्त्या विद्यार्थीनींची यादी तयार करतांना ज्या विद्यार्थीनीच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थीनींना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. विद्यापीठाच्या दरवर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात सदर योजनेकरीता केलेल्या आर्थिक तरतुदीअंतर्गत प्रत्येक पात्र आवेदनकर्त्या विद्यार्थीनीस रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार मात्र) च्या कमाल मर्यादेत अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

(५.८) विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील सदर योजनेकरीताच्या एकुण तरतुदीपेक्षा जास्त रक्कमेकरीताचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्रती महाविद्यालय प्रती विद्यार्थीनी यांचे अनुदानाच्या रक्कमेचे उपरोल्लेखीत प्रमाण कमी करण्यात येईल.

(५.९) सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेसाठी उत्पन्नाचा समान निकष धारण करणाऱ्या विद्यार्थीनींपैकी पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी I) संबंधीत विद्यार्थीनींने मागील शैक्षणिक वर्षातील विद्यापीठाच्या परीक्षेत प्राप्त केलेले एकुण गुण II) संबंधीत विद्यार्थीनींना समान गुण असल्यास सदर

विद्यार्थीनी किती प्रयत्नात (Attempts) विद्यापीठाची मागील लगतच्या वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाली आहे या निकषांचा अनुक्रमे आधार घेण्यात येईल.

(५.१०) पात्र व गरजु विद्यार्थीनींना त्यांच्या नियमीत शैक्षणिक कारकीर्दीमध्ये (अभ्यासक्रमात) विद्यापीठाच्या इतर योजनांच्या लाभाबरोबरच सदर योजनेचा लाभ देखील अनुज्ञेय असेल. तथापि, आवेदनकर्त्या विद्यार्थीनींना केंद्र किंवा राज्य शासनाच्या किंवा अन्य प्राधिकरणाकडुन शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप, शुल्क परतावा, शुल्क सवलत किंवा इतर काही अनुदान/लाभ मिळत असेल किंवा मिळणार असेल अशा विद्यार्थीनींचे प्रस्ताव सदर योजनेकरीता अपात्र ठरविण्यात येतील.

(५.११) महाविद्यालयाने सादर केलेल्या अर्जामध्ये विद्यार्थीनीचे ज्या बॅंकेत खाते आहे त्या बॅंकेचे नाव, खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी. कोड, बॅंकेची शाखा, बॅंकेचा पुर्ण पत्ता इ. माहिती नमुद करणे अनिवार्य असेल, जेणेकरुन विद्यार्थीनीच्या बॅंक खात्यामध्ये ईलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर (आरटीजीएस) द्वारे अनुदानाची रक्कम जमा करणे विद्यापीठास सोईचे होईल.

(५.१२) विद्यार्थीनीने सादर केलेल्या प्रस्तावांमध्ये त्रुटी असल्यास त्याबाबत विद्यापीठातर्फे कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. महाविद्यालयाने विद्यार्थीनींचे प्रस्ताव परिपुर्ण आहेत हे तपासुन विद्यापीठास सादर करावेत. अपुर्ण प्रस्तावांसंदर्भात प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारींची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची असेल.

(५.१३) सदर योजनेंतर्गत प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक असेलः-

(I) विद्यार्थीनीचा प्राचार्यांनी साक्षांकीत केलेला विहीत नमुन्यातील अर्ज;

(II) लगतच्या गतवर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यापीठाच्या परिक्षेच्या गुणपत्रकाची स्वयंसाक्षांकीत छायाप्रत;

(III)आवेदक विद्यार्थीनीच्या पालकांच्या एकत्रित उत्पन्नाचा लगतच्या गत आर्थिक वर्षाच्या दाखल्याची स्वयंसाक्षांकीत प्रत; (तहसीलदारांचा/सक्षम

प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याव्यतिरीक्त कोणत्याही प्रकारचा दाखला ग्राहय धरण्यात येणार नाही.)

(**IV**) आवेदक विद्यार्थीनीच्या आधारकार्डची स्वयंसाक्षांकीत केलेली छायाप्रत;

६) <u>संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना</u>

(६.१) प्रस्तावनाः- विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात नियमित शिक्षण घेत असताना विद्यार्थ्याला काही गंभीर आजार झाल्यास, त्याचा अपघात झाल्यास, अपघातामुळे अपंगत्व आल्यास किंवा अपघात किंवा आजारामुळे अपमृत्यु झाल्यास त्याच्या कुटूंबियांच्या होणाऱ्या हानीची अंशतः भरपाई व्हावी हा सदर योजनेचा उद्देश असुन सदर योजनेचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(६.२) सदर योजनेअंतर्गत विद्यार्थी किंवा विद्यार्थ्याच्या मृत्युप्रकरणी त्याच्या पालकांना किंवा वारसदारांना देण्यात येणारे अर्थसहाय्य अनुदान विद्यापीठाच्या स्वनिधीतुन देण्यात येईल.

(६.३) सदर योजना विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयातील पदवी, पदविका, आंतरवासियता (Internship) प्रशिक्षणार्थी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या स्तरावरील नियमित शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना लागु असेल.

(६.४) विद्यापीठांतर्गत संलग्नीत महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेत नियमित स्वरुपात विद्यार्थ्याचा प्रवेश घेतल्याचे दिनांकापासुन ते संबंधीत विद्यार्थ्याचा अभ्यासक्रम पुर्ण होईपावेतोच्या दिवसापर्यंत सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल.

(६.५) विद्यार्थ्याचा अपघातामुळे, नैसर्गिक आपत्तीमुळे (उदा. पूर, भूकंप, आग, वीज पडून इ.), हृदय विकाराच्या झटक्याने किंवा गंभीर आजाराने आकस्मिक मृत्यु झाल्यास रु.२,००,०००/- (रुपये दोन लक्ष मात्र) इतकी रक्कम विद्यार्थ्याच्या पालकांना/वारसदारांना अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.

(६.६) विद्यार्थ्याचा अपघातामध्ये कायमस्वरुपी एक हात किंवा एका पायाला अपंगत्व आल्यास किंवा एका डोळयाची कायमस्वरुपी दृष्टी गेल्यास

रु.१,००,०००/- अथवा यापैकी कोणत्याही दोन अवयवांना कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास रु.२,००,०००/- इतके अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.

(६.७) विद्यार्थ्याचा अपघात झाल्यास दुखापतग्रस्त अवयवावर मोठी शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास (उदा.मेंदू, हृदय, यकृत, फुप्फुस इ. अवयवांवरील शस्त्रक्रीया) उपचारासाठी प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची रक्कम किंवा रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम खर्चाची प्रतिपुर्तीची देयके प्रस्तावासोबत सादर केल्यानंतर अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.

(६.८) विद्यार्थ्यास गंभीर आजार झाल्यास (उदा. हृदयविकाराचा झटका, हृदयउपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, मूत्रपिंड किंवा इतर अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, कोणत्याही अवयवाचा कर्करोग, मेंदूविकार, पक्षघात इ.) अशा आजाराच्या उपचाराकरीता प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची रक्कम किंवा रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम खर्चाची प्रतिपुर्तीची देयके प्रस्तावासोबत सादर केल्यानंतर अर्थसहाय्य म्हणुन अनुज्ञेय असेल.

(६.९) विद्यार्थ्याचे अपघातात शरीराचे कुठलेही हाड मोडले असल्यामुळे शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा अपघातानंतर कुठल्याही प्रकारची शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा आजारामुळे छोटी शस्त्रक्रिया करावी लागल्यास होणाऱ्या खर्चाइतकी किंवा जास्तीत जास्त रु.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) इतक्या खर्चाची रक्कम प्रतिपुर्तीची देयके प्रस्तावासोबत सादर केल्यानंतर अर्थसहाय्य म्हणून अनुज्ञेय असेल. तसेच विद्यार्थ्याचा किरकोळ अपघात झाल्यास तो जर २४ तासापेक्षा जास्तवेळ रुग्णालयामध्ये दाखल असेल तर अशा स्थितीत प्रत्यक्ष खर्च किंवा जास्तीत जास्त रु.२,०००/- (रुपये दोन हजार मात्र) यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम खर्चाची देयके सादर केल्यानंतर अर्थसहाय्य म्हणून अनुज्ञेय असेल.

(६.१०) विद्यार्थ्याचे मुत्रपिंड निकामी झाले असल्यास त्याकरीता डायलीसीस करावे लागत असल्यास एका महिन्यातुन कमाल चार वेळा डायलीसीस

करण्याकरीता प्रती डायलीसीस जास्तीत जास्त रु.२०००/- इतके अर्थसहाय्य खर्चाची देयके सादर केल्यानंतर अनुज्ञेय असेल.

(६.११) नुकसानीचे स्वरुप व त्याकरीता निर्धारित अर्थसहाय्याची रक्कम दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणेः

| अ.क्र. | नुकसानीचे स्वरुप | भरपाई / अर्थसहाय्याची रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याचा अपघाताने / नैसर्गिक आपत्तीने / नैसर्गिक / गंभीर आजाराने मृत्यु झाल्यास | रु.२,००,०००/- |
| २ | कायम स्वरुपी अपंगत्व (दोन्ही डोळयांची पुर्णतः दृष्टी जाणे / दोन अवयवांना पुर्णपणे कायमस्वरुपी अपंगत्व ) | रु.२,००,०००/- |
| ३ | कायम स्वरुपी एका अवयवाला पूर्णतः अपंगत्व (एका डोळयाची दृष्टी जाणे किंवा एका अवयवाला अपंगत्व) | रु.१,००,०००/ |
| ४ | अपघात झाल्यास मोठी शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास (उदा.मेंदू, हृदय, यकृत, फुप्फुस इ. किंवा इतर अवयवांवरील मोठी शस्त्रक्रीया) | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.५०,०००/- यापैकी कमी असलेली रक्कम |
| ५ | विद्यार्थ्यास गंभीर आजाराचे उपचाराकीरता (उदा. हृदयविकाराचा झटका, हृदयउपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, मूत्रपिंड व इतर अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, कोणत्याही अवयवाचा कर्करोग, मेंदूविकार, पक्षघात इ.) | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.५०,०००/- यापैकी कमी असलेली रक्कम |
| ६ | किरकोळ अपघातात विद्यार्थ्याचे हाड मोडले असल्यामुळे शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा अपघातानंतर इतर कारणामुळे शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा आजारामुळे छोटी शस्त्रक्रिया करावी लागल्यास | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.१०,०००/- यापैकी कमी असलेली रक्कम |
| ७ | अपघातात विद्यार्थी २४ तासापेक्षा जास्तवेळ हॉस्पिटल मध्ये दाखल असल्यास | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.२,०००/- यापैकी कमी असलेली रक्कम |
| ८ | मुत्रपिंड निकामी झाल्यामुळे डायलीसीस करावे लागत असल्यास | एक महिन्यातुन कमाल चार वेळा डायलीसीस- प्रत्येक डायलीसीस करीता रु.२,०००/- |

(६.१२) उपरोक्त मुद्दयांमध्ये नमूद केल्याव्यतिरिक्त अपघातामध्ये शरीराचा इतर कुठलाही अवयव निकामी झाल्यास किंवा अपंगत्व आले असल्यास अशा प्रस्तावांसाठी विद्यापीठाने या योजनेच्या अंमलबजावणीचे प्रयोजनाकरीता गठीत केलेल्या समितीने घेतलेल्या निर्णयानुसार अर्थसहाय्याची रक्कम अनुज्ञेय असेल.

(६.१३) विद्यार्थ्याचा अपघात झाल्यास, मृत्यु झाल्यास किंवा विद्यार्थ्याच्या गंभीर आजाराविषयी महाविद्यालयाला कळविण्यात आले असेल तर महाविद्यालयाने प्रथम स्तरावर १० दिवसाच्या आत टपालाद्वारे किंवा ईमेलद्वारे विद्यापीठास त्याबाबत कळविणे आवश्यक असेल.

(६.१४) महाविद्यालयाने/ शैक्षणिक संस्थेने त्यांच्या स्तरावर विद्यार्थ्यांसाठी दुसरी एखादी विमा योजना लागु केली असल्यास सदर योजनेंतर्गत कुठलाही लाभ अनुज्ञेय नसेल.

(६.१५) विद्यापीठाने कोणत्याही विमा कंपनीशी करार न करता दि.२९/०३/२०१२ पासुन सदर योजना विद्यापीठामार्फत राबविण्यात येत असल्याने या तारखेनंतर विद्यापीठांतर्गत नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याचा अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यु झाल्यास किंवा आजाराच्या उपचाराच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीचे प्रस्ताव विद्यापीठाने या योजनेच्या अंमलबजावणीचे प्रयोजनाकरीता गठित केलेल्या समितीच्या सदस्यांनी घेतलेल्या निर्णयानुसार निकाली काढण्यात येतील.

(६.१६) सदर योजनेंतर्गत प्राप्त अर्थसहाय्याचा प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर शक्यतो १५ दिवसांचे आत अशा प्रस्तावांची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येईल. छाननी दरम्यान प्रस्तावात काही अपुर्तता किंवा त्रुटी असल्यास सदर बाबीची पुर्तता करणेकरीता संबधितास किंवा संबंधीत महाविद्यालयास प्रशासकीय स्तरावरुन कळविण्यात येईल. प्रशासकीय स्तरावर प्रस्ताव परिपुर्ण आढळुन आल्यास असा प्रस्ताव उक्त योजनेच्या अंमलबजावणीचे प्रयोजनाकरीता खालीलप्रमाणे गठीत केलेल्या समितीसमोर सादर करण्यात येईल. सदर समितीने घेतलेला निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

<u>संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना अंमलबजावणी समिती</u>

| | | |
|---|---|---|
| १ | कुलगुरु | अध्यक्ष |
| २ | प्रति कुलगुरु | सदस्य |
| ३ | कुलसचिव | सदस्य |
| ४ | वित्त व लेखाधिकारी | सदस्य |
| ५ | विधी अधिकारी | सदस्य |
| ६ | संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग | सदस्य सचिव |

(६.१७) विद्यार्थ्याचा मृत्यु झाला असल्यास किंवा अपघातात कायमचे अपंगत्व आल्यास किंवा अपघाताच्या उपचारासाठी किंवा गंभीर आजाराच्या उपचारासाठी किंवा अपघातात हाड मोडले असेल किंवा शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा डायलीसीस करीता सदर योजनेंतर्गत अर्थसहाय्याचा प्रस्ताव व प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे दस्तऐवज सादर करणे आवश्यक असेल.

(I) मृत विद्यार्थ्याच्या पालकांनी त्यांचा पाल्य ज्या महाविद्यालयात शिक्षण घेत होता त्या महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य यांचे मार्फत अर्ज सादर करावा. तसेच, अपघातग्रस्त, गंभीर आजारी, शस्त्रक्रिया झालेल्या किंवा मुत्रपिंड निकामी झालेल्या विद्यार्थ्याने तो ज्या महाविद्यालयात शिक्षण घेत असेल त्या महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य यांचे मार्फत अर्ज सादर करावा.

(II) वैद्यकीय प्रमाणपत्र (नमुना अर्ज) मधील सर्व रकान्यांमध्ये मृत/ अपघातग्रस्त/अपघातामुळे कायमस्वरुपीचे अपंगत्व आलेल्या/शस्त्रक्रिया झालेल्या/ मुत्रपिंड निकामी झालेल्या विद्यार्थ्याची पुर्ण माहिती भरणे आवश्यक असेल. तसेच, त्यावर विहित ठिकाणी वैद्यकीय अधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का, पत्ता व दूरध्वनी क्रमांक नमूद असावा.

(III) विद्यार्थ्याचा अपघातात मृत्यु झाला असेल तर एफ.आय.आर. व पोलिस पंचनामा यांची साक्षांकीत प्रत. तसेच, जिल्हा शल्य चिकीत्सकाचा

अथवा शासकीय वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेला शवविच्छेदन अहवाल किंवा मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत.

(**IV**) विद्यार्थ्याचा अपघात झाला असल्यास एफ.आय.आर व पोलिस पंचनाम्याची साक्षांकीत प्रत.

(**V**) विद्यार्थी आजाराने किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे मृत झाला असेल तर नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाचे प्रमाणपत्र आवश्यक असेल. सदर प्रमाणपत्रामध्ये विद्यार्थी केव्हापासून कोणत्या आजाराने आजारी होता किंवा कोणत्या आजाराने किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे मृत झाला याचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे. तसेच, जिल्हा शल्य चिकीत्सकाचा अथवा शासकीय वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेला शवविच्छेदन अहवाल किंवा मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत.

(**VI**) अपघातामुळे कायमस्वरुपीचे अपंगत्व आले असल्यास जिल्हा शल्य चिकीत्सकांनी / यथोचित समितीने दिलेले अपंगत्व प्रमाणपत्र (अपंगत्व कोणत्या कारणाने आले व शरीराचे कोणते अवयव किती टक्के निकामी झाले याचा स्पष्ट उल्लेख असावा) तसेच, अपंगत्व आलेल्या विद्यार्थ्याचे ४×६ सें.मी. आकाराचे दोन रंगीत छायाचित्रे. (छायाचित्रामध्ये शरीराचे कोणते अवयव निकामी होऊन अपंगत्व आले त्या भागाचे दर्शनी छायाचित्र सादर करावे.)

(**VII**) अपघातग्रस्त/गंभीर आजारी/शस्त्रक्रिया झालेल्या विद्यार्थ्यास रुग्णालयातुन सोडल्याचा (Discharge Card) वैद्यकीय अधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्क्यासह दाखला. उपचारासाठी कराव्या लागलेल्या विविध चाचण्यांचे अहवाल व देयके (Investigation Reports & Bills), वैद्यकीय देयके, औषधालयाची देयके, तपासणी अहवाल क्रमवार लावुन सादर करावेत.

(**VIII**) उक्त कागदपत्रांची एकत्रितरीत्या पुर्तता करुन, सदर कागदपत्रे संबंधीत महाविद्यालयाच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांनी साक्षांकित करुन

विद्यार्थ्यांचा मृत्यु झाल्यापासुन / उपचारानंतर रुग्णालयातुन डिस्चार्ज केल्यानंतर तीन महिन्याच्या आत प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा.

(६.१८) अपघाताच्या कारणास्तव / आजारावरील उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर रुग्णालयातील स्वतंत्र खोलीचे भाडे (Private or Semi -Private Room), रुग्णवाहिकेचे भाडे, विशेष आहार, टॉनिक, डिस्चार्ज नंतरच्या औषधांची देयके इ. देयके सदर योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्यासाठी गृहीत धरले जाणार नाहीत.

(६.१९) विद्यार्थ्याचा मृत्यु झाला असल्यास त्याच्या पालकाचे/वारसदाराचे अथवा इतर सर्व प्रकरणी विद्यार्थ्याचे ज्या बॅंकेत खाते असेल त्या बॅंकेचे नाव, खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी.कोड, बॅंकेची शाखा, बॅंकेचा पुर्ण पत्ता प्रस्तावामध्ये नमुद करणे अनिवार्य असेल जेणेकरुन दावा धारक पालक / वारसदार अथवा विद्यार्थ्याच्या बॅंक खात्यामध्ये सदर योजनेंतर्गत अर्थसहाय्याची रक्कम ईलेक्ट्रॉनिक ट्रान्सफरद्वारे (आरटीजीएस) जमा करणे सोईचे होईल.

(६.२०) योजनेत खालील बाबींचा समावेश असणार नाहीः-

(I) महाविद्यालयात प्रवेश घेण्यापुर्वीचे आजार किंवा अपंगत्व ;

(II) भ्रमिष्टपणा ;

(III) आण्विक दुर्घटना ;

(IV) अंमली पदार्थाच्या अंमलाखाली असतांना झालेला अपघात / मृत्यु;

(V) आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वतःला जखमी करुन घेणे ;

(VI ) गुन्हयाच्या उद्‌देशाने कायद्याचे उल्लंघन करताना झालेली दुखापत/ अपघात / मृत्यु;

(VII) विद्यार्थ्याचा बेकायदेशीर कृत्यामध्ये असलेल्या सहभागामुळे झालेली दुखापत / अपघात / मृत्यु ;

(VIII) महाविद्यालयाच्या नियमानुसार बेशिस्त वर्तनामुळे / बेकायदेशीर आंदोलनामध्ये सहभागामुळे झालेली दुखापत / अपघात / मृत्यु ;

(IX) शर्यती व साहसी खेळ या दरम्यान झालेली दुखापत/ अपघात / मृत्यु.

(६.२१) योजनेच्या अनुषंगाने प्रस्तावासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची, विद्यार्थ्याच्या पालकाची तसेच अधिष्ठाता / प्राचार्य यांची असेल. एखाद्या कागदपत्राच्या पुर्ततेअभावी प्रस्ताव अपात्र ठरविल्यास त्यासाठी विद्यापीठ जबाबदार नसेल.

(६.२२) विद्यापीठामार्फत दरवर्षी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदीच्या अधिन राहुन संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांनुसार अर्थसहाय्याच्या रक्कमेत बदल करण्याचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असेल.

(६.२३) ज्या विद्यार्थ्याचा वैयक्तिक आरोग्य विमा असेल व सदर विम्याअंतर्गत तो विद्यार्थी त्याच्या आजाराच्या किंवा अपघाताच्या उपचारावर झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती घेणार असेल किंवा घेतली असेल अशा विद्यार्थ्यास सदर योजने अंतर्गत अर्थसहाय्य अनुज्ञेय नसेल.

(६.२४) सदर योजना कुठल्याही स्तरावर बंद करुन विद्यार्थी सुरक्षेकरीता इतर योजनेचा अवलंब करण्याचा / विमा काढण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

७) कमवा व शिका योजना

(७.१) प्रस्तावनाः- विद्यापीठांतर्गत आरोग्य विज्ञानाच्या अभ्यासक्रमास प्रवेशीत कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण आर्थिक अडचणीमुळे थांबू नये या भूमिकेतून व विद्यार्थ्यास काही प्रमाणात आर्थिक स्वावलंबी बनविण्याकरीता विद्यापीठाने "कमवा व शिका" ही योजना अंमलात आणली आहे. गरजू, होतकरु व नियमित विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना निवडक स्वरुपाच्या शैक्षणिक बाबींशी निगडीत कामांची संधी महाविद्यालय किंवा रुग्णालयात उपलब्ध करुन देऊन त्याच्या मोबदल्यात नियमानुसार योग्य तो आर्थिक मोबदला देऊन त्यांच्या काही

प्रमाणात आर्थिक गरजा भागविणे व त्यांच्या शिक्षणास हातभार लावणे हा सदर योजनेचा उद्देश असुन सदर योजनेचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(७.२) सदर योजनेचा लाभ केवळ विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमाचे नियमित शिक्षण घेणारा, मागील शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या गरजू विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असेल. खालील विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यास अपात्र असतीलः-

(I) पदव्युत्तर (Postgraduate ) अभ्यासक्रमाचा विद्यार्थी;

(II) आंतरवासियता (Internship) प्रशिक्षणार्थी;

(III) अनिवासी भारतीय (Non Resident Indian - NRI) विद्यार्थी;

(IV) परराज्यातून आलेले (Other than Maharashtra State– OMS) विद्यार्थी;

(V) विद्यावेतन (स्टायपेंड) मिळत असलेले विद्यार्थी.

(७.३) विद्यार्थ्यास केंद्र / राज्य शासनाच्या किंवा अन्य संस्थेकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप शुल्क परतावा, शुल्क सवलत किंवा इतर काही अनुदान मिळत असले तरी देखील असे विद्यार्थी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यास पात्र असतील.

(७.४) कमवा व शिका योजनेचा कालावधी एका शैक्षणिक वर्षात ८ महिने असेल. कमवा व शिका योजनेतंर्गत महाविद्यालयातील पात्र ठरविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना कामाचा आर्थिक मोबदला म्हणुन आठ महिन्यांकरीता जास्तीत जास्त रु.१६,०००/- प्रती विद्यार्थी या प्रमाणे अनुदान अनुज्ञेय असेल. विद्यापीठाचे सदर अनुदान प्रति तास रु.५०× प्रति दिवस २ तास ×२० दिवस = रु. २,०००/- दरमहा ×०८ महिने = रु.१६,०००/- अशाप्रकारे सुट्टयांचे दिवस वगळून दरमहा, आठ महिन्यांकरीता असेल.

(७.५) ज्या आवेदनकर्त्या विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न शासन / विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा कमी असेल असे विद्यार्थी सदर

योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करताना ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. सदर योजनेंतर्गत विद्यापीठाच्या दरवर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात सदर योजनेकरीता केलेल्या आर्थिक तरतूदीच्या कमालमर्यादेत अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

(७.६) कमवा व शिका योजनेसाठी उत्पन्नाचा समान निकष धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी पात्र उमेदवाराची निवड करण्यासाठी क्रमाने खालील निकषांचा अवलंब करण्यात येईल.

(I) मागिल वर्षाचे गुण (ज्या विद्यार्थ्यास जास्त गुण असतील तो पात्र)

(II) प्रयत्न (attempts) (मागील वर्षात किती प्रयत्नांमध्ये विद्यार्थी उत्तीर्ण झाला)

(III) मुलींना प्राधान्य.

(७.७) कमवा व शिका योजनेचा आठ महिन्यांचा कालावधी संपताच १५ दिवसांच्या आत समायोजनासाठी महाविद्यालयाने प्रस्ताव विद्यापीठास सादर करणे आवश्यक असेल. महाविद्यालयाने सादर केलेल्या प्रस्ताव अर्जामध्ये महाविद्यालयाचे ज्या बॅंकेत खाते असेल त्या बॅंकेचे नाव, खाते क्रमांक, आय.एफ. एस.सी. कोड, बॅंकेची शाखा, बॅंकेचा पुर्ण पत्ता नमुद करणे अनिवार्य असेल. जेणेकरुन महाविद्यालयाच्या बॅंक खात्यामध्ये ईलेक्ट्रॉनिक ट्रान्सफरद्वारे अनुदानाची रक्कम जमा करणे सोईस्कर होईल.

(७.८) विद्यार्थ्याने/महाविद्यालयाने प्रस्ताव व प्रस्तावासोबत खालील प्रमाणे आवश्यक कागदपत्रे/दस्तऐवज जोडुन सादर करणे आवश्यक असेल.

(I) विद्यार्थ्याचा प्राचार्यानी साक्षांकीत केलेला नमुना अर्ज;

(II) लगतच्या गतवर्षी अभ्यासक्रमाच्या उत्तीर्ण झालेल्या विद्यापीठाच्या परिक्षेच्या गुणपत्रकाची स्वयंसाक्षांकित छायाप्रत;

(III) विद्यार्थ्याच्या पालकांचा मागील आर्थिक वर्षाचा संबंधित तहसीलदार / यथोचित प्राधिकारी यांनी दिलेला वार्षिक उत्पन्नाच्या दाखल्याची स्वसाक्षांकीत प्रत;

(IV) विद्यार्थ्याच्या आधारकार्डची स्वसाक्षांकीत छायाप्रत.

(७.९) विद्यार्थ्यास केलेले कामाचे वाटप, विद्यार्थ्याची त्यासाठीची उपस्थिती व विद्यार्थ्यास अनुदानाची रक्कम अदा केल्याची पावती महाविद्यालयाने विद्यापीठास सादर करणे आवश्यक असेल. विद्यार्थ्यास कामाच्या वाटपाची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयाची असेल.

८) <u>योजनांसंबधी संकिर्ण तरतुदी</u>

(८.१) धन्वंतरी विद्याधन योजना, बहि:शाल शिक्षण मंडळ योजना, सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना, संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना आणि कमवा व शिका योजना या योजनेंतर्गत नियम ठरविणे, नियमांचा अर्थ लावणे तसेच, योजनेंचे लाभार्थी ठरविणेबाबतचा विद्यापीठाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

(८.२) सदर सर्व योजनेंतर्गत विहित मुदतीत विद्यापीठास महाविद्यालयामार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येईल. छाननीअंती पात्र प्रस्तावांची यादी तयार करण्यात येवुन अनुदान वाटपासंबंधी कार्यालयीन टिप्पणीस कुलगुरु यांचे मान्यतेनंतर सदर टिप्पणी, पात्र विद्यार्थ्यांची आवश्यक माहितीसह यादी, अनुदानाची रक्कम व इतर यथोचित माहितीचा तक्ता क्रेडीट नोटसह पडताळणी व अनुदानाचे धनादेश/धनाकर्ष तयार करणेकरीता किंवा ईलेक्ट्रॉनीक ट्रान्सफरकरीता विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी यांना अग्रेषित करण्यात येईल. सदर प्रशासकीय प्रक्रिया निर्धारित करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(८.३) प्रस्तावासोबत सादर केलेल्या दस्तऐवजांमध्ये किंवा माहितीमध्ये कालांतराने कोणतेही दस्त किंवा माहिती बनावट अथवा खोटी असल्याचे सिध्द्

झाल्यास संबधीत विद्यार्थ्यावर कायदयानुसार शिस्तभंगाची/फौजदारी कारवाई करण्यात येईल / करण्याबाबत संबंधीत महाविद्यालयास निर्देशित करण्यात येईल.

(८.४) सदर सर्व योजनेंतर्गत लाभ घेताना लाभार्थी विद्यार्थी त्याचा प्रस्ताव, त्यामधील माहिती व त्यासोबतची दस्तऐवज यांच्या सत्यतेकरीता वैयक्तिक जबाबदार असेल. तसेच, प्रस्तावाच्या सत्यतेच्या पडताळणीची जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्याबिरोबरच संबंधित महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांची असेल.

(८.५) कोणत्याही योजनेंतर्गत सादर केलेला प्रस्ताव अपुर्ण असेल किंवा निर्धारीत मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झाला असेल तर सदर प्रस्ताव नाकारण्याचा विद्यापीठास अधिकार असेल. ई-मेलव्दारे प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारले जाऊ नयेत. अपुर्ण किंवा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावासंबंधी विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांकडुन तक्रार प्राप्त झाल्यास सदर तक्रारीची संपुर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयांवर असेल.

(८.६) शासनाकडुन, यथोचित प्राधिकरणाकडुन किंवा एखादया संस्थेकडुन विद्यार्थ्यास विद्यावेतन (स्टायपेन्ड) मिळत असल्यास असे विद्यार्थी संजीवनी सुरक्षा योजनेव्यतिरिक्त इतर योजनेचा लाभ घेण्यास पात्र नसतील.

(८.७) सदर सर्व योजनांकरीता उक्त नियमावलीत विहित नियमांव्यतिरिक्त विद्यापीठाने परिपत्रकाव्दारे वेळोवेळी प्रसिध्द् केलेल्या / करण्यात येणाऱ्या अटी व शर्तीचे पालन करणे महाविद्यालय व लाभार्थी विद्यार्थ्यास बंधनकारक असेल.

(८.८) सदर सर्व योजनेअंतर्गत विद्यार्थी / विद्यार्थ्याच्या पालकांना देण्यात येणारे अर्थसहाय्य / अनुदान हे विद्यापीठाच्या स्वनिधीतून देण्यात येत असल्याने, सदर योजनेचा लाभ विद्यार्थी / विद्यार्थ्याच्या पालकांना मिळणारी एक अतिरिक्त सवलत असुन योजनेचा लाभ हा त्यांचा हक्क असणार नाही.

(८.९) सदर योजनांकरीता अटी व शर्तीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेले असतील.

(८.१०) सदर योजनांपैकी कुठलीही योजना कुठल्याही स्तरावर बंद करण्याचा किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(८.११) उपरोक्त नियमावलीत सुधारणा/बदल/निरसन करण्याचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असेल. अशा सुधारणा/बदल/निरसन परिपत्रकाद्वारे वेळोवेळी प्रसिध्द् करण्यात येतील व परिपत्रकाद्वारे प्रसिध्द् करण्यात येणाऱ्या अशा सुधारणा/बदल/निरसन हे उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येतील.

(८.१२) सदर योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यापीठ ऑनलाईन पध्द्तीने विद्यार्थ्यांकडुन आवेदन मागवु शकेल. ऑनलाईन आवेदनाच्या अनुषंगाने विद्यापीठ परिपत्रक काढुन त्याबाबतची प्रक्रिया विहित करेल. उक्त नियमावलीत नियम विहित असले तरी ऑनलाईन प्रक्रियेच्या अनुषंगाने विद्यापीठाने परिपत्रकान्वये विहित केलेले नियम सदर नियमांची जागा घेतील. अशाप्रकारे प्रख्यापीत करण्यात आलेले परिपत्रक उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येईल.

# प्रकरण क्र. : ३ क्रीडा स्पर्धा

९) विभागीय, आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा, सराव शिबीर व भारतीय विद्यापीठ संघ क्रीडा स्पर्धा व इतर क्रीडा स्पर्धा

(९.१) प्रस्तावनाः- मा. कुलपती यांच्या निर्देशानुसार दरवर्षी महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे आयोजन राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये करण्यात येते. महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवाच्या अनुषंगाने विद्यापीठ संघाची निवड ही विद्यापीठ कार्यक्षेत्रानुसार राज्यातील सहा विभागांमधुन करण्यात येत असते. त्यानुसार विभागीय निवड चाचणी क्रीडा (Zonal Selection Trial - Sports) स्पर्धाचे आयोजन विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात करण्यात येते. सहा विभागांमधुन प्रत्येकी १२० खेळाडु विद्यार्थी असे एकुण ७२० खेळाडु विद्यार्थ्यांची निवड आंतर विभागीय क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचणी करीता करण्यात येते. आंतर विभागीय (Inter Zonal Selection Trial - Sport) निवड चाचणी स्पर्धेतुन ७२० खेळाडु विद्यार्थ्यापैकी सराव शिबीर (Coaching Camp) व क्रीडा महोत्सवासाठी १२० खेळाडु विद्यार्थ्यांच्या संघाची निवड करण्यात येते. सदर निवड करण्यात आलेला १२० खेळाडु विद्यार्थ्यांचा संघ महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवामध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी सहभागी होत असतो.

तसेच अखिल भारतीय विद्यापीठ संघाद्वारे (All Indian Universites) दरवर्षी आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ व पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ (All India / West Zone Inter University) तसेच खेलो इंडिया या राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धामध्ये विद्यापीठाचे नेतृत्व करण्यासाठी विद्यापीठ संघ किंवा स्पर्धक पाठविण्यात येतात. त्याअनुषंगाने विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात अखिल भारतीय विद्यापीठ संघ (ए.आय.यु.) निवड चाचणी बॅडमिंटन (Badminton), टेबल टेनिस (Table Tennis), जलतरण (Swimming), बुध्दीबळ (Chess) व लॉन टेनिस (Lawn Tennis) स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते.

क्रीडा महोत्सवाच्या अनुषंगाने विभागीय, आंतरविभागीय व सराव शिबीर तसेच ए.आय.यु. निवड चाचणी व भारतीय विद्यापीठ संघ (Association of Indian University) यांच्याद्वारे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ/पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ (All India Inter Universtiy/West Zone Inter University) क्रीडा स्पर्धासाठीची व इतर स्पर्धासाठीची नियमावली याद्वारे विहीत करण्यात आलेली आहे.

(९.२) <u>विभागीय क्रीडा समन्वयक :-</u>

विविध क्रीडा स्पर्धाच्या अनुषंगाने वेळोवळी निर्देशित केल्यानुसार कामकाज करण्यासाठी उक्त नियमावलीत नमुद केलेल्या नियमांनुसार विभागीय क्रीडा समन्वयकांची मानद स्वरुपात नियुक्ती करण्यात येईल.

(९.३) <u>विभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धा</u>

(I) विभागीय निवड चाचणीमध्ये सर्वसाधारणपणे खालील खेळांचा समावेश असेल;

| अ.क्र. | खेळाचा प्रकार |
|---|---|
| १ | कबड्डी |
| २ | खो-खो |
| ३ | बास्केटबॉल |
| ४ | व्हॉलीबॉल |
| ५ | मैदानी स्पर्धा (अॅथलेटीक्स्)<br>१०० मी.,२०० मी.,४०० मी., ८०० मी., १५०० मी., व ५००० मी., ४×१०० मी., रिले व ४×४०० मी., लांब उडी, उंच उडी, तिहेरी उडी, गोळा फेक, थाळी फेक व भाला फेक) इत्यादी |

याव्यतिरीक्त क्रीडा महोत्सवात वेळोवळी मा. राज्यपाल कार्यालयाकडुन प्राप्त होणाऱ्या निर्देशांनुसार सदर खेळांमध्ये बदल करण्यात येईल. अशाप्रकारे होणारे बदल परिपत्रकान्वये प्रख्यापित करण्यात येतील. अशी परिपत्रके उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येईल.

(II) विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व्यावसायिक प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवित असल्याने उक्त खेळांमध्ये काही महाविद्यालये पुर्ण विद्यार्थी संघ पाठवु शकत नसल्यास अशा महाविद्यालयातुन प्रत्येक किंवा काही खेळांसाठी ३ ते ४ विद्यार्थी

स्पर्धक व ०२ संघव्यवस्थापक (०१ पुरुष व ०१ महिला) याप्रमाणे एकुण कमाल ४० व्यक्ती प्रत्येक महाविद्यालयातुन सहभागी होऊ शकतील.

(**III**) संलग्नित महाविद्यालये विद्यार्थ्यांना विभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्याकरिता प्रोत्साहन देतील. त्यानुसार सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या व माहिती विद्यापीठ नामनिर्देशन अर्जाद्वारे संबंधित महाविद्यालये विभागीय आयोजक महाविद्यालयास ई-मेल द्वारे विहित मुदतीत सादर करतील. नामनिर्देशन अर्जाशिवाय संघास क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार नाही. तथापि, प्रासंगिक वेळेनुसार/परिस्थितीनुसार स्पर्धकांच्या सहभागाबाबत योग्य तो निर्णय घेण्याचा विभागीय क्रीडा समन्वयकांना अधिकार असेल.

(**IV**) उपरोक्त विहीत क्रीडा प्रकारांच्या अनुषंगाने स्पर्धक निवड चाचणी राज्यातील प्रत्येक महसुल विभागातील (मुंबई, पुणे, नाशिक, नागपुर, अमरावती व औरंगाबाद) आयोजक महाविद्यालयांमध्ये घेण्यात येईल. आयोजक महाविद्यालय ठरविण्याचे अधिकार विद्यापीठाचे असतील. प्रत्येक महसुल विभागाच्या कार्यक्षेत्रातील आरोग्य विज्ञानाच्या विविध विद्याशाखांची संलग्नित महाविद्यालये त्या-त्या विभागाच्या विभागीय निवड चाचणीकरीता आयोजक महाविद्यालयात आपल्या महाविद्यालयातील ईच्छुक व पात्र खेळाडू पाठवतील. विभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धांच्या अनुषंगाने विद्यापीठाचे संचालक, विद्यार्थी कल्याण व संबंधित महसुल विभागाचे विभागीय क्रीडा समन्वयक यांचेशी चर्चा करुन आयोजक महाविद्यालयांनी स्पर्धांचे नियोजन व आयोजन करावे. निवड चाचणी स्पर्धेसंबंधी अनुषंगीक सर्व कामकाज करण्याची जबाबदारी स्थानिक समन्वयक म्हणुन आयोजक महाविद्यालयाच्या क्रीडा शिक्षकाची असेल.

(**V**) विभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धांकरिता प्रत्येक महसुल विभागातील संलग्नित महाविद्यालयांमधील महाविद्यालयीन संघांनी / खेळाडुंनी दोन संघव्यवस्थापकांसह (एक पुरुष व एक महिला) आपआपल्या विभागीय स्तरावरील आयोजक महाविद्यालयात विद्यापीठाने ठरवुन दिलेल्या तारखेस व वेळेत उपस्थित राहणे आवश्यक असेल. संघव्यवस्थापकांची नियुक्ती करण्याची

जबाबदारी संबंधित महाविद्यालयांची असेल. विभागीय स्पर्धेकरिता आयोजक महाविद्यालयातील स्थानिक समन्वयक व विद्यापीठ नियुक्त संबंधीत महसुल विभागातील विभागीय समन्वयक हे स्पर्धेत सहभागी महाविद्यालयांच्या संघव्यवस्थापकांची स्पर्धापुर्व बैठक आयोजित करुन त्यांना स्पर्धा विषयक संपुर्ण माहिती देतील व त्यांच्या शंकाचे व अडचणींचे निरसन करतील. त्यानंतर ते स्पर्धापुर्व बैठकीचा सविस्तर अहवाल विद्यापीठास तात्काळ ई-मेलद्वारे सादर करतील.

(**VI**) विभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धेतुन आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेकरीता संघ निवडीची प्रक्रियाः-

(अ) निवड करण्यात आलेल्या प्रत्येक क्रीडा प्रकारानुसार १२ खेळाडुंचा संघ असेल. यानुसार एकुण १२० स्पर्धक खेळाडुंचा विभागीय संघ असेल. याप्रमाणे ०६ महसुल विभागांतुन संघाची निवड करण्यात येईल. यानुसार ०६ विभागातील त्या-त्या विभागाच्या निवड करण्यात आलेल्या संघांचे नामनिर्देशन अहवाल विभागीय समन्वयक तयार करतील. सदर अहवाल आयोजक महाविद्यालयाच्या समन्वयकाकडे सुपूर्त करतील. तसेच सदर, अहवालाची एक प्रत विद्यापीठास सादर करतील.

(ब) विभागीय क्रीडा समन्वयक निवड करण्यात आलेल्या संघासोबत संघव्यस्थापक म्हणुन आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा आयोजक महाविद्यालयाच्या ठिकाणी जातील.

(क) विभागीय क्रीडा समन्वयक आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेकरिता स्पर्धक विद्यार्थी, संघ-व्यवस्थापक व प्रशिक्षक यांच्या आयोजक महाविद्यालयाच्या ठिकाणी पोहचण्याकरीता प्रवासाची व्यवस्था करतील.

(ड) संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांचा सल्ला घेऊन विभागीय क्रीडा समन्वयक बाहेरील ०५ तज्ञ प्रशिक्षक/निवड समिती सदस्य यांची यादी तयार करतील व सदर यादी विद्यापीठास सादर करतील. त्यानुसार प्रशिक्षक/निवड समिती सदस्य यांची स्पर्धेकरीता निवड करण्यात येईल.

(**VII**) क्रीडा महोत्सव – विभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धांच्या (Zonal Selection Trials Sports Competition) आयोजनाकरीता महाविद्यालयास विद्यापीठ निधीतुन अनुज्ञेय खर्चाचा तपशील खालीलप्रमाणेः–

| अ. क्र. | तपशिल | प्रस्तावित खर्च |
|---|---|---|
| १ | क्रीडांगणे तयार करणे (कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल प्रत्येकी दोन) | रु. २५,०००/– |
| २ | क्रीडांगणाबाबत 'अ' किंवा 'ब' यापैकी कोणताही एक पर्याय स्विकारावा | |
| अ | क्रीडांगणे भाडे (बास्केटबॉल व ॲथलेटीक्स) | रु. १०,०००/– |
| ब | क्रीडांगण तयार करणे (बास्केटबॉल व ॲथलेटीक्स) | रु. २०,०००/– |
| ३ | जिल्हा क्रीडा असोसिएशन पंच मानधन (आयोजक महाविद्यालय नियुक्त):<br>१ मुख्यपंच (Head Umpire) × रु. ६०० = ६००/–<br>२ पंच (Umpire) × रु. २५० = ५००/–<br>१ गुणलेखक (Scorer) × रु. २०० = २००/–<br>२ लाईनमन × रु. १५० = ३००/–<br>एका खेळांकरीता = १,६००/–<br>• एकुण ५ खेळांकरीता : (रु.१,६००/– × ५) = ८,०००/–<br>• एकुण २ दिवसांकरीता : (रु. ८,०००/–× २) = १६,०००/– | रु.१६,०००/– |
| ४ | अ) विद्यापीठ नियुक्त विभागीय क्रीडा समन्वयक मानधन (Zonal Co-ordinator) ०१ | रु.१,०००/– |
| | ब) निवड समिती (बाहय) ०५ सदस्यांचे मानधन प्रत्येकी रु.१०००/– (एक रक्कमी पुर्ण कालावधीकरिता) | रु.५,०००/– |
| | क) आयोजक महाविद्यालयाच्या क्रीडा शिक्षकाचे मानधन (स्पर्धेच्या पुर्ण कालावधी करीता) | रु. १,०००/– |
| ५ | क्रीडा साहित्य खरेदी (व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, भाला, गोळा, थाळी इ.) (प्रत्येकी २) | रु. १०,०००/– |
| ६ | प्रथमोपचार व वैद्यकीय सहाय्य | रु. ४,०००/– |
| ७ | १) निवास व्यवस्थेसाठी गादी, सतरंजी, चादर, उशी इ. भाडे प्रती संच रु.६०/– × अंदाजे ४०० (स्पर्धक विद्यार्थी व संघ व्यवस्थापक) × २ दिवस | रु. ४८,०००/– |
| | २) निवास व्यवस्थेसाठी मंगल कार्यालय, आश्रम शाळा किंवा महाविद्यालयाच्या खोलीचे भाडे | रु. १०,०००/– |
| | ३) गादी, चादर, सतरंजी व उशी ने-आण करीता वाहतुक व हमाली खर्च | रु. ५०० ते १०००/– |
| ८ | उद्घाटन व समारोप समारंभासाठी खर्च संबंधीत आयोजक महाविद्यालयाने करावा. आर्थिक सहाय्य रु. ५०००/– (समायोजना समवेत देयके सादर करण्यात यावे.) | रु.५,०००/– |
| ९ | इतर तात्कालीक व आकस्मिक खर्च (स्टेशनरी, छायाप्रति, पाणी टॅंकर,इ.) (समायोजना समवेत देयके सादर करण्यात यावे.) | रु.१०,०००/– |

(**VIII**) विभागीय क्रीडा स्पर्धापासुन आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेच्या ठिकाणी जाण्यासाठी विभागीय समन्वयकांनी उपलब्ध करुन दिलेली वाहतुक व्यवस्था सर्व सदस्यांना (स्पर्धक, प्रतिनिधी, संघव्यवस्थापक व इतर संबंधीत व्यक्ती एकुण १२५) मान्य करावी लागेल. त्याकरिता विभागीय समन्वयकांनी सुस्थितीतील ०२ बस (५० ते ५५ आसनी) व गरज भासल्यास ०१ मिनीबस (१७ ते ३२ आसनी) उपलब्ध करावी / भाडयाने घ्यावीत. सदर वाहन व्यवस्थेच्या भाडयापोटी विद्यापीठातर्फे आयोजक महाविद्यालयास पुढील प्रमाणे खर्च अनुज्ञेय असेल. विभागीय निवड चाचणी स्पर्धेच्या ठिकाणापासून ते आंतरविभागीय निवड चाचणी स्पर्धेच्या ठिकाणा पर्यंतचे अंतर ४०० कि.मी. पर्यंत असल्यास रु. ४०/- प्रति कि.मी. या दराने व ४०० कि.मी. पेक्षा जास्त असल्यास रु. ५० प्रति कि.मी. या दराने व मिनीबस प्रकारातील वाहनाकरीता रु.३०/- प्रति कि. मी. प्रमाणे भाडयाचे दर अनुज्ञेय असतील. तसेच टोलची रक्कम प्रत्यक्षात आकारण्यात आलेल्या टोलच्या दरानुसार देय असेल. त्याकरीता मुळ टोल पावत्या देयका सोबत सादर करणे अनिवार्य असेल. तसेच, सदर वाहनांच्या हॉल्टचा खर्च प्रति दिन २०० कि.मी. हा ५० आसनी वाहनासाठी रु. १०,०००/- व मिनीबससाठी १०० कि.मी. या दराने जास्तीत जास्त एका दिवसासाठी रु.३,०००/- विद्यापीठातर्फे अनुज्ञेय असेल.

(**IX**) उपरोक्त नियमांत विहीत मानधन व खर्चाची रक्कम पुनर्निधारीत करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(९.४) <u>आंतरविभागीय (निवड चाचणी) क्रीडा स्पर्धा</u> **<u>(Inter Zonal Selection Trials Sports Competition )</u>**

(**I**) विभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धेतुन निवडण्यात आलेल्या जास्तीत जास्त ७२० विद्यार्थ्यांची (एका महसुल विभागातुन जास्तीत जास्त एकुण १२० विद्यार्थी) आंतरविभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धा विद्यापीठ निर्धारीत करेल त्या संलग्नित महाविद्यालयात आयोजित करण्यात येईल.

(**II**) प्रत्येक विभागीय संघ व विभागीय क्रीडा समन्वयक, संघव्यवस्थापक यांना विद्यापीठाने विहित केलेल्या मुदतीत व वेळेत आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा आयोजक महाविद्यालयात / स्थळी उपस्थित राहणे आवश्यक असेल.

(**III**) आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेकरीता विद्यापीठ मानद स्वरुपात एका क्रीडा शिक्षकाची/विभागीय क्रीडा समन्वयकाची "आंतरविभागीय क्रीडा समन्वयक" म्हणुन नामनिर्देशनाने अस्थायी स्वरुपात सदर स्पर्धेच्या कालावधीकरीता नियुक्ती करेल. अशाप्रकारे नियुक्त आंतरविभागीय समन्वयक हे सर्व विभागीय क्रीडा समन्वयक, संघव्यवस्थापक व प्रशिक्षक यांची स्पर्धापुर्व बैठक विद्यापीठाने विहित केलेल्या दिनांकास आयोजित करुन त्यांना स्पर्धाविषयक संपुर्ण माहिती देतील व स्पर्धापुर्व बैठकीचा संपुर्ण अहवाल विद्यापीठास ई-मेलद्वारे तात्काळ सादर करतील.

(**IV**) आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेकरिता विद्यापीठ किमान १० आंतरविभागीय निवड समिती सदस्यांची नियुक्ती करेल. विद्यापीठ नियुक्त सदर निवड समिती सदस्य क्रीडा महोत्सवाच्या अनुषंगाने आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेदरम्यान संबंधीत खेळाच्या संघांची निवड करतील व निवडी बाबतचा त्यांचा निर्णय अंतिम असेल.

(**V**) ज्या खेळाडु विद्यार्थ्यांची मागील राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवातील कामगिरी चांगली नसेल अशा खेळाडु विद्यार्थ्यांस संघात समावेश करणे किंवा वगळणे याबाबत निवड समिती निर्णय घेऊ शकेल.

(**VI**) आंतरविभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धेतुन निवड करण्यात आलेले विद्यार्थी स्वतःचे ०३ पासपोर्ट आकारातील फोटो आपआपल्या संघ व्यवस्थापकांकडे जमा करतील. संघ व्यवस्थापकाकडे जमा करण्यात आलेले विद्यार्थ्यांचे यादीसह फोटो व नामनिर्देशन अर्ज इ. माहिती संघव्यवस्थापक विद्यापीठाकडे सादर करतील.

(**VII**) विद्यापीठ नियुक्त निवड समिती सदस्यांनी राज्यस्तरीय क्रीडा महोत्सव नियमांनुसार खेळाडु विद्यार्थ्यांची पात्रता तपासणे आवश्यक असेल.

(**VIII**) आंतरविभागीय निवड चाचणी स्पर्धेदरम्यान विद्यापीठ नियुक्त निवड समिती सदस्य सराव शिबीर व क्रीडा महोत्सवाकरिता प्रत्येक क्रीडा प्रकारासाठी एकुण २४ स्पर्धकांचा संघ (१२ मुले व १२ मुली) निवडेल. तसेच प्रत्येकी ०३ स्पर्धक राखीव म्हणुन निवडेल.

(**IX**) आंतरविभागीय निवड चाचणी स्पर्धेतुन निवड करण्यात आलेल्या स्पर्धकांची खेळानुसार संघाची अंतिम यादी निवड समिती विद्यापीठाकडे तात्काळ सादर करेल. सदर निवड यादी सराव शिबीराच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(**X**) आंतरविभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाकरीता महाविद्यालयास विद्यापीठ निधीतुन अनुज्ञेय खर्चाचा तपशील खालीलप्रमाणेः-

| अ. क्र. | तपशिल | प्रस्तावित खर्च |
|---|---|---|
| १ | क्रीडांगणे तयार करणे (शक्यतो विभागीय स्पर्धा आयोजक महाविद्यालयाचे ठीकाणी) कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल प्रत्येकी दोन | रु.२०,०००/- |
| २ | क्रीडांगणाबाबत 'अ' किंवा 'ब' यापैकी कोणताही एक पर्याय स्विकारावा. | |
| अ | क्रीडांगण भाडे (बास्केटबॉल व ॲथेलेटीक्स) | रु.१०,०००/- |
| ब | क्रीडांगण तयार करणे (बास्केटबॉल व ॲथेलेटीक्स) | रु.२०,०००/- |
| ३ | <u>जिल्हा क्रीडा असोसिएशनकडून नियुक्त पंचाचे मानधन खालीलप्रमाणे :</u><br>१ मुख्यपंच (Head Umpire) × रु. ६०० = ६००/-<br>२ पंच (Umpire) × रु. २५० = ५००/-<br>१ गुणलेखक (Scorer) × रु. २०० = २००/-<br>२ लाईनमन × रु. १५० = ३००/-<br>एका खेळाकरीता = १,६००/-<br>• एकुण ५ खेळांकरीता : (रु.१,६००/- × ५) = ८,०००/-<br>• एकुण २ दिवसांकरीता : (रु. ८,०००/-× २)= १६,०००/- | रु.१६,०००/- |
| ४ | अ) विद्यापीठ नियुक्त क्रीडा समन्वयक (Inter Zonal Co-ordinator) - ०१ | रु.२,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | ब) विद्यापीठ नियुक्त निवड समिती १० सदस्यांचे मानधन प्रत्येकी रु. १०००/- (एक रक्कमी पुर्ण कालावधीकरिता) × १० = रु.१०,०००/- | रु.१०,०००/- |
| | क) आयोजक महाविद्यालयाच्या क्रीडा शिक्षकाचे मानधन (स्पर्धेच्या पुर्ण कालावधी करीता) | रु. १,०००/- |
| ५ | क्रीडा साहित्य खरेदी (व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, भाला, गोळा, थाळी इ.) | रु.१०,०००/- |
| ६ | ५ मदतनीस- मैदानाच्या पूर्व तयारीसाठी (५ व्यक्ती ×२ दिवस × रु. २५०/-) | रु.२,५००/- |
| ७ | प्रथमोपचार व वैद्यकीय सहाय्य | रु.५,०००/- |
| ८ | अ) निवास व्यवस्थेसाठी गादी, सतरंजी, चादर, उशी इ. भाडे प्रती संच रु.६०/- × अंदाजे ७५० (स्पर्धक व संघ व्यवस्थापक) × ०३ दिवस | रु.१,३५,०००/- |
| | ब) निवास व्यवस्थेसाठी मंगल कार्यालय, आश्रम शाळा किंवा महाविद्यालयाची खोली व इ. भाडे तत्वावर घेणे. एकुण ७२० स्पर्धक पैंकी ३६० मुले व ३६० मुली करीता भाडे रु.२५,०००/- | रु. २५,०००/- |
| | ड) गादी, चादर, सतरंजी व उशी ने-आण करीता वाहतुक व हमाली खर्च | रु.५०० ते १०००/- |
| ९ | अ) चहा नाश्ता व भोजन खर्च (प्रति दिन प्रति विद्यार्थी, संघ व्यवस्थापक, प्रतिनिधी व इतर संबंधीत व्यक्तींसाठी) ७५० व्यक्ती × रु.२५०/- × ०३ दिवस = रु. ५,६२,५००/- (अंदाजे) | रु. ५,६२,५००/- |
| | ब) दुपार व सायंकाळचे भोजन करीता शामियाना मंडप व प्रकाशव्यवस्था खर्च रु.५,०००/- प्रतिदिन प्रमाणे ०३ दिवसांकरिता | रु.१५,०००/- |
| १० | उद्घाटन व समारोप खर्च संबंधीत आयोजक महाविद्यालयाने करावा. | रु.५,०००/- |
| ११ | इतर तात्कालीक व आकस्मिक खर्च (गरम पाणी, अतिरिक्त चादर, जनरेटर, लॅम्स् व पाणी टॅंकर) | रु.१०,०००/- |

(**XI**) उपरोक्त नियमात विहित मानधन व खर्चाची रक्कम पुनर्निधारीत करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(**XII**) आंतरविभागीय निवड चाचणी स्पर्धेकरीता उपस्थित / सहभागी असलेले विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी स्पर्धक, विद्यापीठ नियुक्त आंतरविभागीय क्रीडा समन्वयक, विभागीय क्रीडा समन्वयक, संघव्यवस्थापक, विद्यापीठ नियुक्त निवड समिती सदस्य, विद्यापीठ नियुक्त प्रशिक्षक, तज्ञ प्रशिक्षक (बाहय) आणि इतर नियुक्त क्रीडा शिक्षक, विद्यापीठ अधिकारी/ कर्मचारी यांना स्पर्धेच्या निर्धारीत दिनांकाच्या आदल्या दिवशीच्या रात्रीच्या भोजनाचा खर्च देखील आयोजक महाविद्यालयास विद्यापीठाकडुन अनुज्ञेय असेल.

(९.५) <u>सराव शिबीर व क्रीडा महोत्सव :-</u>

(I) राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवपुर्व सराव शिबीराकरिता विद्यापीठाने आंतर विभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धेअंती प्रसिध्द केलेल्या निवड यादीनुसार स्पर्धक विद्यार्थ्यांनी व संघव्यवस्थापकांनी विद्यापीठाने विहित केलेल्या मुदतीत व वेळेत सराव शिबीर ज्या महाविद्यालयात आयोजित केले असेल त्या आयोजक महाविद्यालयात / स्थळी पोहचणे आवश्यक असेल. क्रीडा महोत्सव पुर्व सराव शिबीर आयोजनाकरीता आयोजक महाविद्यालयाची निवड विद्यापीठ करेल. सराव शिबीर आयोजक महाविद्यालयातील क्रीडा शिक्षकाची मानद स्वरुपात सराव शिबीर समन्वयक म्हणुन नियुक्ती करण्यात येईल.

(II) सराव शिबीर व क्रीडा महोत्सवाकरिता निवड झालेले खेळाडू जन्मतारखेचा पुरावा म्हणुन माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.-१० वी) किंवा उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (H.S.C.-१२ वी) उत्तीर्ण प्रमाणपत्र (ज्यामध्ये जन्मतारखेची नोंद असेल), मागिल वर्षाचे उर्त्तीण/पदवी प्रमाणपत्र, महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, ओळखपत्राची छायाप्रत वगैरे आवश्यक व मागणी केल्यानुसार दस्तऐवजांच्या स्वयंसाक्षांकीत छायाप्रती संघ व्यवस्थापकांकडे सुपूर्त करतील. सदर छायाप्रती संबंधित विद्यार्थी ज्या महाविद्यालयात शिक्षण घेत असेल त्या महाविद्यालयाच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांनी देखील शिक्क्यासह साक्षांकीत केलेल्या असाव्यात.

(III) निवड यादीतील स्पर्धक विद्यार्थी सराव शिबीराकरिता विहीत दिनांकास व वेळेत उपस्थित राहणे आवश्यक असेल. एखादा स्पर्धक उपस्थित राहु शकत नसल्यास त्याच्या अनुपस्थिती बाबत शिबिर समन्वयकाने विद्यापीठास त्वरीत अवगत करावे.

(IV) सराव शिबिर साधारणपणे १९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर असे एकुण सात दिवस कालावधीचे किंवा विद्यापीठ वेळोवेळी निर्धारीत करेल त्या कालावधीत आयोजित करण्यात यावे. एखाद्या खेळाडूस विहीत मुदतीत काही अपरिहार्य कारणास्तव सराव शिबिरास उपस्थित राहणे शक्य नसल्यास

त्याबाबत विद्यापीठास ई-मेलद्वारे त्वरीत कळवुन पुढील उपस्थितीबाबत/ अनुपस्थितीबाबत विद्यापीठाची पुर्वपरवानगी घेण्यात यावी.

(V) सराव शिबिराकरिता उपस्थित व अनुपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांची यादी सराव शिबीर समन्वयक विद्यापीठास सादर करेल.

(VI) अनुपस्थित स्पर्धक विद्यार्थ्यांच्या जागी निवड यादीतील क्रमवारीनुसार राखीव विद्यार्थ्यांशी सराव शिबीर समन्वयक व क्रीडा संघ व्यवस्थापक यांनी संपर्क साधुन संबंधीत विद्यार्थ्यांना सराव शिबीराकरिता उपस्थितीबाबत कळवु शकतील व विद्यापीठास त्याबाबत तात्काळ माहिती सादर करतील.

(VII) प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक हे सराव शिबीर व क्रीडा महोत्सव कालावधीत आपआपल्या संघांसोबत उपस्थित राहु शकतात.

(VIII) सराव शिबीर व क्रीडा महोत्सव याकरिता लागणारी सर्व व्यवस्था सराव शिबीर आयोजक महाविद्यालयाने करावी.

(IX) क्रीडा महोत्सव आयोजक विद्यापीठाकरिता लागणारा पत्र व्यवहार विद्यापीठाच्या निर्देशांनुसार क्रीडा संघ व्यवस्थापक व सराव शिबीर समन्वयक यांनी करावा.

(X) सराव शिबीर समन्वयक व क्रीडा संघ व्यवस्थापक यांनी विद्यापीठ संघासह क्रीडा महोत्सव आयोजक विद्यापीठाकडे सराव शिबीरानंतर विहीत दिनांकास व वेळेत सर्व संघांसह उपस्थित रहावे.

(XI) सराव शिबीर व क्रीडा महोत्सवात सर्व स्पर्धक, संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक यांनी शिस्तीचे पालन करावे. यामध्ये दोषी आढळल्यास संबंधीतांवर चौकशीअंती यथोचित कारवाई करण्याचे विद्यापीठास अधिकार असतील.

(XII) क्रीडा महोत्सव पुर्व सराव शिबीर (Coaching Camp) आयोजनाकरीता आयोजक महाविद्यालयाकरीता व क्रीडा महोत्सवासाठी विद्यापीठ निधीतुन अनुज्ञेय खर्चाचा तपशील खालीलप्रमाणेः-

आंतरविभागीय निवड चाचणी स्पर्धेतुन सराव शिबीराकरिता निवड झालेला संघ क्रीडा महोत्सवाकरीता पाठविण्याच्या अनुषंगाने क्रीडा महोत्सव पुर्व सराव करणेसाठी सराव शिबीराचे आयोजन व नियोजन करणे व

सरावाच्या ठिकाणाहून सर्व स्पर्धक, समन्वयक, संघव्यवस्थापक व इतर यांच्यासह क्रीडा महोत्सवाच्या ठिकाणी घेवुन जाणेकरीता खालीलप्रमाणे खर्च अनुज्ञेय असेल.

| अ. क्र | तपशिल | प्रस्तावित खर्च |
|---|---|---|
| १ | क्रीडांगणे तयार करणे (शक्यतो सराव शिबीर आयोजक महाविद्यालयाचे ठिकाणी) कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल प्रत्येकी दोन - क्रीडा प्रकारानुसार | रु.३०,०००/- |
| २ | क्रीडांगणाबाबत 'अ' किंवा 'ब' यापैकी कोणताही एक पर्याय स्विकारावा. | |
| अ | क्रीडांगण भाडे (बास्केटबॉल व ॲथेलेटीक्स) | रु.१०,०००/- |
| ब | क्रीडांगण तयार करणे (बास्केटबॉल व ॲथेलेटीक्स) | रु.२०,०००/- |
| ३ | तज्ञ प्रशिक्षकांचे (बाहय) मानधन (रु. ५००/- × ५ व्यक्ती × ७ दिवस) | रु.१७,५००/- |
| ४ | अ) विद्यापीठ नियुक्त संघव्यवस्थापक १५ (५ खेळ × ३ संघव्यवस्थापक प्रत्येक खेळासाठी × २५००/- मानधन एक रक्कमी पुर्ण कालावधीसाठी (सराव शिबीर ते क्रीडा महोत्सव) | रु. ३७,५००/- |
| | ब) आयोजक महविद्यालयाच्या क्रीडा शिक्षकाचे मानधन (स्पर्धेच्या पुर्ण कालावधीकरीता) | रु. २,०००/- |
| ५ | क्रीडा साहीत्य खरेदी (व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, भाला, गोळा, थाळी इ.) | रु.२०,०००/- |
| ६ | प्रथमोपचार व वैद्यकीय सहाय्य | रु.१०,०००/- |
| ७ | निवास व्यवस्थेसाठी गादी, बेडशीट, सतरंजी, चादर, उशी इ. भाडे प्रती संच रु.६०/- × अंदाजे १३५ (स्पर्धक व संघ व्यवस्थापक/ बाहय प्रशिक्षक) × ०७ दिवस (मंगल कार्यालय/आश्रम शाळा व इ. भाडे देय नाही.) | रु.५६,७००/- |
| ८ | स्थानिक प्रवास खर्च (रु. २,०००/- प्रति दिन × जास्तीत जास्त ७ दिवस) निवास व्यवस्थेपासुन ते सराव शिबीर क्रीडा स्थळी | रु.१४,०००/- |
| ९ | अ) सराव शिबीर ते क्रीडा महोत्सव स्थळापर्यंतचा अंदाजे १५० कि.मी. पर्यंत अंतर असल्यास प्रवास खर्च प्रति कि.मी. रु २०/- प्रमाणे | रु.३०,०००/- |
| | ब) अथवा सराव शिबिर व क्रीडा महोत्सव स्थळ एकाच शहरात असल्यास खेळाडू विद्यार्थ्यांना सराव शिबीर स्थळ ते क्रीडा महोत्सव स्थळापर्यंत जाणे करिताचा एका वेळेचा येणारा खर्च मंजुर करण्यात येईल. | रु.३,०००/- ते रु.५०००/- पर्यंत |
| १० | चहा, नाश्ता व भोजन खर्च २ वेळा (प्रती दिन प्रती विद्यार्थी, संघ व्यवस्थापक, प्रतिनिधी व इतर संबंधीत व्यक्तींसाठी) १४० व्यक्ती × रु. २५० × ०७ दिवस = रु. २,४५,०००/- (अंदाजे) | रु.२,४५,०००/- |
| ११ | ५ मदतनीस - मैदानाच्या पूर्व तयारीसाठी (५ व्यक्ती × ७ दिवस × रु. २००/- = रु. ७,०००/-) | रु.७,०००/- |
| १२ | बॅनर्स, छायाप्रती, स्टेशनरी, फेटे व इ. | रु.७,०००/- |
| १३ | एच.आय.व्ही. एड्स जनजागृती रॅलीसाठी येणारा खर्च | रु.१५,०००/- |
| १४ | स्पर्धक विद्यार्थ्यांनसाठी ट्रॅक सुट/टी-शर्ट/शॉर्ट खरेदी खर्च (१२० स्पर्धक विद्यार्थी) | (प्रचलितदराने) |

| | | |
|---|---|---|
| १५ | संघव्यवस्थापक, प्रशिक्षक, अधिकारी यांच्यासाठी ब्लेझर/ट्रॅक सुट (संघव्यस्थापक १५ व प्रशिक्षक, समन्वयक, विद्यापीठ संघ व्यवस्थापक व संचालक, विद्यार्थी कल्याण वगैरे (५)) एकुण २० | (प्रचलितदराने) |
| १६ | उद्घाटन व समारोप समारंभासाठी खर्च | रु.३,०००/- |
| १७ | इतर तात्कालीक व आकस्मिक खर्च (मा. संचालक विद्यार्थी कल्याण यांच्या पूर्व परवानगीने) ई-मेल द्वारे त्वरीत परवानगी | रु.५,०००/- |

(**XIII**) सराव शिबीर आयोजक महाविद्यालयापासून ते राज्यस्तरीय क्रीडा महोत्सव आयोजक विद्यापीठापर्यंत/ठिकाणापर्यंत जाण्यासाठी सराव शिबीर व्यवस्थापकाने उपलब्ध करुन दिलेली वाहतुक व्यवस्था सर्व सदस्यांना (स्पर्धक विद्यार्थी, संघव्यवस्थापक व इतर संबंधीत व्यक्तींना) मान्य करावी लागेल. त्याकरीता सराव शिबीर व्यवस्थापकाने सुस्थितीतील ०२ बस (५० ते ५५ आसनी) वाहन व ०१ मिनी बस (१७ ते ३२ आसनी) उपलब्ध करावी / भाडयाने घ्यावीत. सदर वाहन व्यवस्थेच्या भाडयापोटी विद्यापीठातर्फे पुढील प्रमाणे खर्च अनुज्ञेय असेल. सराव शिबीर आयोजक महाविद्यालयापासून ते क्रीडा महोत्सव आयोजक विद्यापीठापर्यंतचे अंतर ०२ बस (५० ते ५५ आसनी) ४०० कि.मी. पर्यंत असल्यास रु. ४०/- प्रति कि.मी. या दराने वाहन व मिनीबस करिता रु.३०/- रुपये प्रती कि.मी. प्रमाणे भाडयाचे दर अनुज्ञेय असतील. तसेच टोलची रक्कम आकारण्यात आलेल्या नुसार अदा करण्यात येतील. त्याकरीता मुळ टोल पावत्या देयका सोबत सादर करणे अनिवार्य असेल. अथवा सराव शिबीर व क्रीडा महोत्सव स्थळ एकाच शहरात असल्यास खेळाडू विद्यार्थ्यांना सराव शिबीर स्थळ ते क्रीडा महोत्सवस्थळापर्यंत जाणे करिताचा एका वेळेचा येणारा प्रत्यक्ष खर्च मंजुर करण्यात येईल. तथापि, असा खर्च रु. ५,०००/- पेक्षा जास्त नसावा.

(**XIV**) उपरोक्त नियमात विहीत मानधन व खर्चाची रक्कम पुनर्निधारीत करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(९.६) <u>भारतीय विद्यापीठ संघातर्फे आयोजित आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेकरीता संघ निवड चाचणी स्पर्धा</u>

(I) भारतीय विद्यापीठ संघाद्वारे (AIU) दरवर्षी आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ (All India Inter Universtiy) व पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ (West Zone Inter University) या राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धामध्ये विद्यापीठाचे नेतृत्व करण्यासाठी विद्यापीठ संघ पाठविण्यात येतील. त्याअनुषंगाने विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या संलग्नित महाविद्यालयात ए.आय.यु. निवड चाचणी (बॅडमिंटन (Badminton), टेबल टेनिस (Table Tennis), जलतरण (Swimming), बुध्दीबळ (Chess) व लॉन टेनिस (Lawn Tennis) या क्रीडा प्रकारांकरीताचे आयोजन करण्यात येईल.

(II) भारतीय विद्यापीठ संघाद्वारे (AIU) आयोजित स्पर्धाकरीता संघ निवड चाचणी घेण्यात येईल. संघ निवड चाचणीचे आयोजन न करता राज्य / राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य मिळविलेल्या खेडाळुंना सरळ विद्यापीठ संघात स्थान देण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(III) भारतीय विद्यापीठ संघाद्वारे (AIU) निर्धारीत केलेल्या खालील क्रीडा प्रकारांकरीता विद्यापीठ संघ पाठवु शकते.

खेळ : बॅडमिंटन (Badminton), टेबल टेनिस (Table Tennis), बुध्दीबळ (Chess), जलतरण (Swimming) व लॉन टेनिस (Lawn Tennis) व इ. खालील क्रीडा प्रकारासाठी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील खेळाडुंकरिता सहभाग संख्या पुढीलप्रमाणेः

| अ.क्र. | क्रीडा प्रकार | क्रीडा स्पर्धेकरिता जास्तीत जास्त खेळाडु विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | बॅडमिंटन (Badminton) | ०६ विद्यार्थी (०३ मुले व ०३ मुली) |
| २ | टेबल-टेनिस (Table Tennis) | ०६ विद्यार्थी (०३ मुले व ०३ मुली) |
| ३ | बुध्दीबळ (Chess) | ०४ विद्यार्थी (०२ मुले व ०२ मुली) |
| ४ | जलतरण (Swimming) | ०४ विद्यार्थी (०२ मुले व ०२ मुली) |
| ५ | लॉन टेनिस (Lawn Tennis) | ०४ विद्यार्थी (०२ मुले व ०२ मुली) |

उपरोक्त प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या खेळाडु संख्येपेक्षा महाविद्यालयाकडून अतिरिक्त विद्यार्थी प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच, उपरोक्त नमुद क्रीडा प्रकारांव्यतीरीक्त भारतीय विद्यापीठ संघाद्वारे वेळोवेळी निर्धारीत केल्या जाणाऱ्या क्रीडा प्रकारांकरीता विद्यापीठ आवश्यक तेवढया खेळाडुंचा संघ स्पर्धेकरीता पाठवु शकेल व त्याकरीता आवश्यकतेप्रमाणे खर्चाची रक्कम निर्धारीत करण्याचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असेल.

(**IV**) उक्त खेळांमध्ये प्राविण्य प्राप्त इच्छुक खेळाडु विद्यार्थ्यांनाच निवड चाचणीसाठी पाठविण्यात यावे. तथापी, संबंधीत खेळाच्या निर्धारित खेळाडु संख्येपेक्षा जास्त खेळाडु असल्यास अशा खेळांसाठी महाविद्यालय स्तरावर निवड चाचणी घेवुन निवडक खेळाडु विद्यार्थी / विद्यार्थीनींना ए.आय.यु. निवड चाचणी करिता महाविद्यालयाच्या संघात समावेश करावा. महाविद्यालयाच्या संघासोबत संघव्यवस्थापक असणे अनिवार्य असेल.

(**V**) महाविद्यालयांनी विद्यापीठाने विहित केलेल्या नमुन्यात व मुदतीत प्रवेशिका निवड चाचणी आयोजक महाविद्यालयास पोस्टाने अथवा ई-मेलद्वारे अंतिम तारखेपर्यंत पोहचतील अशा पध्द्तीने पाठवाव्यात. विहित अंतिम दिनांकापर्यंत निवड चाचणी आयोजक महाविद्यालयास प्रवेशिका न पोहोचल्यास संबंधीत महाविद्यालयास निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

(**VI**) स्पर्धक खेळाडुंसाठी वयाच्या पात्रतेसंबंधी भारतीय विद्यापीठ संघ (AIU) यांनी वेळोवेळी निर्धारीत केलेल्या नियमावलीस अनुसरुन निवड चाचणी करीता पात्र असलेल्या खेळाडु विद्यार्थ्याच्या वयाचा पुरावा म्हणुन माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.-१० वी) किंवा उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (H.S.C.-१२ वी) उत्तीर्ण प्रमाणपत्र /जन्म दाखल्याची छायांकीत प्रत व आवश्यक त्या मागणी केल्यानुसारच्या दस्तऐवंजाच्या छायांकीत प्रती संबंधित विद्यार्थी ज्या महाविद्यालयात शिक्षण घेत असेल त्या महाविद्यालयाच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने साक्षांकीत करुन प्रवेशिकेसोबत जोडणे अनिवार्य असेल.

(**VII**) ए.आय.यु. स्पर्धेसाठी संघ निवडीकरीता निवड चाचणी मध्ये सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांस आपआपल्या संघाचा प्रवास खर्च, चहापान व भोजन खर्च तसेच क्रीडा साहित्याचा खर्च स्वतः करावा लागेल. यासाठी विद्यापीठाकडुन कुठलाही खर्च अनुज्ञेय नसेल.

(**VIII**) सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांना निवड चाचणी करिता आयोजक महाविद्यालयात आपआपल्या संघ व्यवस्थापकांसोबत स्पर्धेच्या नियोजित दिनांकाच्या अगोदरच्या दिवशी सायंकाळी निर्धारीत वेळेत स्पर्धा स्थळी उपस्थित राहुन नोंदणी करावी लागेल. नोंदणीसाठी संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रमाणित केलेली खेळाडु विद्यार्थी प्रवेशिका यादी सादर करणे आवश्यक असेल.

(**IX**) प्रत्येक क्रीडा प्रकारासाठी विद्यापीठ नियुक्त गठीत निवड समिती असेल व निवड समितीचा निर्णय अंतिम असेल.

(**X**) प्रत्येक खेळासाठी मुले व मुली यांच्या स्वतंत्र प्रवेशिका / याद्या असाव्यात. तसेच, स्पर्धेच्या वेळी विद्यार्थ्यांनी अधिष्ठाता/प्राचार्यांची स्वाक्षरी असलेले महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक असेल.

(**XI**) ए.आय.यु. क्रीडा स्पर्धेसाठी संघ निवडीकरीता घेण्यात येणाऱ्या निवड चाचणी स्पर्धेचे परिपत्रक वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(**XII**) सदर निवड चाचणी स्पर्धा संपन्न झाल्यानंतर निवड करण्यात आलेले संघनिहाय खेळाडु विद्यार्थी यांची यादी, सर्व उपस्थित स्पर्धक विद्यार्थी यांची यादी, स्पर्धेचा स्वतंत्र अहवाल इ. दस्तऐवज विद्यापीठास त्वरीत ई-मेल व टपालाद्वारे सादर करण्यात येईल.

(**XIII**) सदर निवड चाचणी स्पर्धेमधुन ए.आय.यु. व पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता ०५ खेळाडु मुले व ०५ खेळाडु मुली व प्रत्येकी ०३ मुले/मुली राखीव अशा रितीने विद्यापीठ संघ निवडण्यात येईल.

(**XIV**) विद्यापीठ नियुक्त निवड समितीने निवड केलेला ए.आय.यु. संघ व पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता पाठविणेचा अंतिम निर्णय विद्यापीठाचा असेल.

(XV) सर्व खेळांसाठी अखिल भारतीय विद्यापीठ संघाने (ए.आय.यु.) घालुन दिलेल्या स्पर्धेच्या नियमांचा कटाक्षाने अवलंब करण्यात येईल. गैरवर्तणुक व शिस्तभंग करणाऱ्या स्पर्धकास प्राथमिक चौकशीअंती निलंबीत करण्यात येईल.

(XVI) भारतीय विद्यापीठ संघातर्फे (ASSOCIAITON OF INDIAN UNIVERSITIES) आयोजित आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या संघ निवड चाचणी करीता आयोजक महाविद्यालयास विद्यापीठ निधीतुन अनुज्ञेय खर्चाचा तपशील खालीलप्रमाणेः

(अ) ए.आय.यु. (AIU) बॅडमिंटन (Badminton) निवड चाचणी स्पर्धाः–

| अ.क्र | तपशिल | प्रस्तावित खर्च |
|---|---|---|
| १ | बॅडमिंटन हॉल आणि कोर्ट भाडे<br>(रु. ५०००/– प्रती दिवस × २ दिवस) | रु. १०,०००/– |
| २ | क्रीडा साहित्य खरेदी खर्च – शटल कॉक | रु. १६,०००/– |
| ३ | वैद्यकीय प्रथमोपचार | रु. १०,०००/– |
| ४ | बिछायत खर्च –<br>(अंदाजे १०० विद्यार्थी × रु.६० ×०२ दिवस) | रु. १२,०००/– |
| ५ | साउंड सिस्टीम | रु. ४,०००/– |
| ६ | पंच मानधन<br>(०४ कोर्ट × ०४ पंच × रु.५००/– × ०२ दिवस) | रु.१६,०००/– |
| ७ | अ) विद्यापीठ निवड समिती सदस्य मानधन<br>(०२ सदस्य × रु.५००/– × ०२ दिवस) | रु.२,०००/– |
| | ब)आयोजक महाविद्यालयाच्या क्रीडा शिक्षकाचे मानधन (स्पर्धेच्या पुर्ण कालावधीकरीता) | रु.१,०००/– |
| ८ | अंतर्गत निवड समिती सदस्य मानधन<br>(०२ सदस्य × रु. ५००/– ×०२ दिवस) | रु.२,०००/– |
| ९ | इतर किरकोळ खर्च<br>(स्टेशनरी, बॅनर, फोटोग्राफी अणि अल्पोपहार) | रु.१,५००/– |
| १० | लेखापरिक्षण शुल्क | रु.१,०००/– |

(ब) ए.आय.यु. (AIU) टेबल टेनिस (Table Tennis) निवड चाचणी स्पर्धा:-

| अ.क्र | तपशिल | प्रस्तावित खर्च |
|---|---|---|
| १ | टेबल टेनिस हॉल भाडे आणि टेबल भाडे<br>(रु. ५०००/- प्रती दिवस × २ दिवस) | रु. १०,०००/- |
| २ | क्रीडा साहित्य खरेदी खर्च - टेबल टेनिस बॉल | रु. ३,५००/- |
| ३ | वैद्यकीय प्रथमोपचार | रु. २,०००/- |
| ४ | बिछायत खर्च<br>(अंदाजे १०० विद्यार्थी × रु.६० ×०२ दिवस) | रु. १२,०००/- |
| ५ | साउंड सिस्टीम | रु. ४,०००/- |
| ६ | पंच मानधन<br>(०४ टेबल × ०४ पंच × रु.५००/- × ०२ दिवस) | रु.१६,०००/- |
| ७ | अ) विद्यापीठ निवड समिती सदस्य मानधन<br>(०२ सदस्य × रु.५००/- × ०२ दिवस) | रु.२,०००/- |
| | ब) आयोजक महाविद्यालयाच्या क्रीडा शिक्षकाचे मानधन<br>(स्पर्धेच्या पुर्ण कालावधीकरीता) | रु.१,०००/- |
| ८ | अंतर्गत निवड समिती सदस्य मानधन<br>(०२ सदस्य × रु. ५००/- ×०२ दिवस) | रु.२,०००/- |
| ९ | इतर किरकोळ खर्च<br>(स्टेशनरी, बॅनर, फोटोग्राफी अणि अल्पोपहार) | रु.१,५००/- |
| १० | लेखापरिक्षण शुल्क | रु.१,०००/- |

(क) ए.आय.यु. (AIU) बुध्दीबळ (Chess) निवड चाचणी स्पर्धा:-

| अ.क्र | तपशिल | प्रस्तावित खर्च |
|---|---|---|
| १ | घडयाळ आणि बुध्दीबळ बोर्ड भाडे<br>(रु. २०००/- प्रती दिवस × २ दिवस) | रु. ४,०००/- |
| २ | क्रीडा साहित्य खरेदी खर्च | ——— |
| ३ | वैद्यकीय प्रथमोपचार | रु. २,०००/- |
| ४ | बिछायत खर्च<br>(अंदाजे १०० विद्यार्थी × रु.६० ×०२ दिवस) | रु. १२,०००/- |
| ५ | साउंड सिस्टीम | रु. ४,०००/- |
| ६ | पंच मानधन<br>(०४ पंच × रु.५००/- × ०२ दिवस) | रु.४,०००/- |
| ७ | अ) विद्यापीठ निवड समिती सदस्य मानधन<br>(०२ सदस्य × रु.५००/- × ०२ दिवस) | रु.२,०००/- |
| | ब)आयोजक महाविद्यालयाच्या क्रीडा शिक्षकाचे मानधन<br>(स्पर्धेच्या पुर्ण कालावधीकरीता) | रु.१,०००/- |
| ८ | अंतर्गत निवड समिती सदस्य मानधन<br>(०२ सदस्य × रु. ५००/- ×०२ दिवस) | रु.२,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ९ | इतर किरकोळ खर्च<br>(स्टेशनरी, बॅनर, फोटोग्राफी अणि अल्पोपहार) | रु.१,५००/- |
| १० | लेखापरिक्षण शुल्क | रु.१,०००/- |

## (ड) ए.आय.यु.(AIU) जलतरण (Swimming) निवड चाचणी स्पर्धाः-

| अ.क्र | तपशिल | प्रस्तावित खर्च |
|---|---|---|
| १ | जलतरण तलाव भाडे<br>(रु. ५०००/- प्रती दिवस × २ दिवस) | रु. १०,०००/- |
| २ | क्रीडा साहित्य खरेदी खर्च | ——— |
| ३ | वैद्यकीय प्रथमोपचार | रु. २,०००/- |
| ४ | बिछायत खर्च<br>(अंदाजे १०० विद्यार्थी × रु.६० ×०२ दिवस) | रु. १२,०००/- |
| ५ | साउंड सिस्टीम | रु. ४,०००/- |
| ६ | पंच मानधन<br>(१० पंच × रु.५००/- × ०२ दिवस) | रु.१०,०००/- |
| ७ | अ) विद्यापीठ निवड समिती सदस्य मानधन<br>(०२ सदस्य × रु.५००/- × ०२ दिवस) | रु.२,०००/- |
| | ब)आयोजक महाविद्यालयाच्या क्रीडा शिक्षकाचे मानधन (स्पर्धेच्या पुर्ण कालावधीकरीता) | रु.१,०००/- |
| ८ | अंतर्गत निवड समिती सदस्य मानधन<br>(०२ सदस्य × रु. ५००/- ×०२ दिवस) | रु.२,०००/- |
| ९ | इतर किरकोळ खर्च<br>(स्टेशनरी, बॅनर, फोटोग्राफी अणि अल्पोपहार) | रु.१,५००/- |
| १० | लेखापरिक्षण शुल्क | रु.१,०००/- |

## (इ) ए.आय.यु.(AIU) लॉन टेनिस(Lawn Tennis) निवड चाचणी स्पर्धाः-

| अ.क्र | तपशिल | प्रस्तावित खर्च |
|---|---|---|
| १ | लॉन टेनिस कोर्ट भाडे<br>(रु. ५०००/- प्रती दिवस × २ दिवस) | रु. १०,०००/- |
| २ | क्रीडा साहित्य खरेदी खर्च - लॉन टेनिस बॉल | रु. ३,०००/- |
| ३ | वैद्यकीय प्रथमोपचार | रु. २,०००/- |
| ४ | बिछायत खर्च<br>(अंदाजे १०० विद्यार्थी × रु.६० ×०२ दिवस) | रु. १२,०००/- |
| ५ | साउंड सिस्टीम | रु. ४,०००/- |
| ६ | पंच मानधन<br>(१० पंच × रु.५००/- × ०२ दिवस) | रु.१०,०००/- |
| ७ | अ) विद्यापीठ निवड समिती सदस्य मानधन<br>(०२ सदस्य × रु.५००/- × ०२ दिवस) | रु.२,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | ब)आयोजक महाविद्यालयाच्या क्रीडा शिक्षकाचे मानधन (स्पर्धेच्या पुर्ण कालावधीकरीता) | रु.१,०००/- |
| ८ | अंतर्गत निवड समिती सदस्य मानधन (०२ सदस्य × रु. ५००/- ×०२ दिवस) | रु.२,०००/- |
| ९ | इतर किरकोळ खर्च (स्टेशनरी, बॅनर, फोटोग्राफी अणि अल्पोपहार) | रु.१,५००/- |
| १० | लेखापरिक्षण शुल्क | रु.१,०००/- |

(XVII)ए.आय.यु. निवड चाचणी स्पर्धेमधुन निवड झालेले संघ व निवड चाचणी व्यतिरीक्त इतर स्पर्धेकरीता पश्चिम विभागीय / अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा आयोजक विद्यापीठांकडे पाठविणे करिता विद्यापीठ निधीतुन अनुज्ञेय खर्चाचा तपशीलः

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात ए.आय.यु. स्पर्धेकरीता संघ निवड चाचणी स्पर्धामधुन निवड करण्यात आलेले विद्यापीठाचे संघ भारतीय विद्यापीठ संघाद्वारे (AIU) आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ व पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ या राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व/नेतृत्व करण्यासाठी पाठविण्यात येईल. निवड चाचणी व्यतिरीक्त सदर विद्यापीठाचे संघ अखिल भारतीय विद्यापीठ पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ/अखिल भारतीय स्पर्धांकरीता पाठविण्यात येतील.

| अ.क्र. | तपशिल | | प्रस्तावित खर्च |
|---|---|---|---|
| १ | प्रवास भत्ता खर्च | विद्यार्थ्यांकरीता - ०३/- प्रती कि.मी. (ए.आय.यु क्रीडा स्पर्धांकरीता विद्यापीठाचा निवड विद्यार्थ्यांचा (पुरुष/महिला) संघ) | प्रवास भत्ता विद्यापीठ नियमानुसार |
| | | संघ व्यवस्थापक/प्रशिक्षक करीता - रु.०५/- प्रती कि.मी. (ए.आय.यु. स्पर्धांकरीता विद्यापीठाने नियुक्त केलेले संघ व्यवस्थापक/प्रशिक्षक) | |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | भोजन खर्च / आहार भत्ता | विद्यापीठ संघ आणि संघ व्यवस्थापक/प्रशिक्षक | प्रती व्यक्ती / खेळाडु रु.२५०/- प्रती दिवस |
| ३ | क्रीडा सामग्री (SportsKit) (ट्रॅकसुट/टी-शर्ट/शॉर्ट्स) | सहभागी विद्यार्थी - ५<br>संघ व्यवस्थापक - ०१<br>प्रशिक्षक - ०१<br>(०७×रु.१,२००/-) | रु. ८,४००/- |
| ४ | क्रीडा साहित्य | शटल कॉक बॉक्स, टेनिस बॉल व इत्यादी. | रु. ५,०००/- |
| ५ | सहभाग/ठेव शुल्क इ. | (प्रती सामना / संघ) | ए.आय.यु. नियमानुसार |
| ६ | वैद्यकीय प्रथमोपचार | - - - | रु. २,०००/- |
| ७ | संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक मानधन (स्पर्धेच्या संपुर्ण कालावधीकरीता) | - - - | रु. २,०००/- प्रत्येकी |
| ८ | आकस्मिक / किरकोळ खर्च | स्टेशनरी, बॅनर, फोटोग्राफी इत्यादी | रु. १,५००/- |
| ९ | लेखा परिक्षण शुल्क | - - - | रु. १,०००/- |

(**XVIII**) भारतीय विद्यापीठ संघ क्रीडा स्पर्धा वेळापत्रकानुसार विद्यापीठ नियुक्त समितीने निवड केलेला संघ (AIU) पश्चिम विभागीय/ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता पाठविण्याचा अंतिम निर्णय विद्यापीठाचा असेल.

(**XIX**) विद्यापीठ संघासोबत संघव्यवस्थापकांची नेमणुक विद्यापीठ करेल. गरज भासल्यास प्रशिक्षकांची देखील नेमणूक करण्यात येईल. संघव्यवस्थापकास परिस्थितीनुरुप खर्चाकरीता अग्रीम रक्कम देण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार कुलगुरु यांना असेल.

९.७) इतर क्रीडा स्पर्धा-

(**I**) उपरोक्त नमुद क्रीडा स्पर्धाव्यतिरिक्त इतर क्रीडा स्पर्धांचे (जिल्हास्तरीय/ आंतरविद्यापीठ/ राज्यस्तरीय/ खेलो इंडीया/ राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा) विद्यापीठाच्या संघाच्या समावेशाकरीता निमंत्रण किंवा माहिती संबंधीत विद्यापीठ / शासन / प्राधिकरणांकडुन प्राप्त झाल्यास अशा क्रीडा स्पर्धांबाबत विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयांना किंवा राज्यस्तरीय क्रीडा

स्पर्धांमध्ये विद्यापीठातर्फे सहभागी झालेल्या / यश संपादित केलेल्या खेळाडुंना किंवा त्यांच्या महाविद्यालयांना कळविण्यात येईल.

(II) अशा क्रीडा स्पर्धांकरीता विद्यापीठाचे खेळाडु / संघ निवड करण्याचा विद्यापीठास अधिकार असेल. निवडीबाबतचे नियम हे त्या-त्या वेळी परिस्थितीनुरुप ठरविल्यानुसार असतील. निवड केलेल्या खेळाडु / संघास विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी पाठविण्यात येईल.

(III) अशा क्रीडा स्पर्धांकरीता विद्यापीठाचे खेळाडु / संघासोबत विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या क्रीडा शिक्षकास संघव्यवस्थापक म्हणुन पाठविण्यात येईल. संघव्यवस्थापकास परिस्थितीनुरुप खर्चाकरीता अग्रिम रक्कम देण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार कुलगुरु यांना असेल.

(IV) संघामध्ये महिला / विद्यार्थीनी खेळाडुंचा समावेश असल्यास एक महिला संघव्यवस्थापक (शिक्षक किंवा शिक्षकेत्तर कर्मचारी) पाठविण्यात येईल. महिला संघव्यवस्थापक नसल्यास महिला / विद्यार्थीनी खेळाडुंच्या संमतीने कुठल्याही एका महिला / विद्यार्थीनी खेळाडुच्या आईला क्रीडा स्पर्धा आयोजकांच्या नियमांचे अधिन राहुन संघासोबत "Female Support Staff" म्हणुन पाठविण्यात येईल. सदर नियम राज्याबाहेर आयोजित कुठल्याही क्रीडा स्पर्धेकरीता लागु असेल.

९.८) प्रवास व दैनिक भत्ता (TA/DA), मानधन (Honorarium), क्रीडा साहित्य व अग्रिम रक्कमेच्या समायोजनाबाबतचे व इतर नियमः

(I) प्रवास व दैनिक भत्ता (TA/DA):

(अ) विभागीय क्रीडा स्पर्धा, आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा, सराव शिबिर, क्रीडा महोत्सव व ए.आय.यु. स्पर्धेकरीता संघ निवड चाचणी स्पर्धेकरिता, ए.आय.यु. स्पर्धेकरीता किंवा इतर क्रीडा स्पर्धांकरीता खेळाडु / संघ निवडीकरीता विद्यापीठ नियुक्त निवड समिती सदस्य, स्थानिक पंच, स्थानिक निवड समिती सदस्य (बाहय), विद्यापीठ क्रीडा शिक्षक, विभागीय समन्वयक, आंतरविभागीय समन्वयक, सराव शिबिर समन्वयक,

संघव्यवस्थापक, खेळाडु विद्यार्थी – विद्यार्थीनी, Female Support Staff आणि विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी यांना विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल. त्याव्यतिरिक्त जे व्यक्ती/कर्मचारी सदर क्रीडा स्पर्धा/निवड चाचणी/सराव शिबिराकरीता विद्यापीठाच्या निर्देशांनुसार कामकाज करतील त्यांना विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेयतेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार कुलगुरु यांना असेल.

(ब) ज्या क्रीडा स्पर्धांकरीता स्पर्धक व इतरांची प्रवासाची व्यवस्था समन्वयक करतील व प्रवासाकरीता वापरण्यात येणाऱ्या साधनांच्या भाडयापोटी विद्यापीठाकडुन रक्कम तरतुदीनुसार अनुज्ञेय असेल अशा तरतुद असेल अशा ठिकाणी सर्वांची एकत्रित प्रवासव्यवस्था शक्य न झाल्यास स्पर्धक खेळाडु व संघव्यवस्थापक यांना विद्यापीठ नियमानुसार प्रवासभत्ता अनुज्ञेय असेल.

(**II**) <u>मानधन **(Honorarium)**:–</u>

(अ) विभागीय क्रीडा स्पर्धा, आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा, सराव शिबिर, क्रीडा महोत्सव, ए.आय.यु. क्रीडा स्पर्धा व इतर क्रीडा स्पर्धांकरीता उपरोक्त तक्त्यांमध्ये नमुद केल्याप्रमाणे मानधन अनुज्ञेय असेल.

(ब) कुठल्याही क्रीडा स्पर्धांशी निगडीत ज्या व्यक्तीचे मानधन निर्धारीत केलेले नसेल ते निर्धारीत करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(क) उपरोक्त नियमात विहीत मानधनाच्या रक्कमेचा वेळोवेळी आढावा घेऊन त्याचे पुनर्निधारण करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(**III**) राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवाकरीता जर विद्यापीठ आयोजक असेल तर विद्यापीठ स्तरावर गठीत सुकाणु समिती, आयोजन समिती व इतर समित्यांमधील शिक्षक, प्राधिकरण सदस्य व विद्यापीठाचे अधिकारी व

कर्मचारी यांना अतिरिक्त कामकाजाचा आर्थिक मोबदला निर्धारीत करण्याचे व अदा करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील व त्यावरील खर्च यथोचित लेखाशिर्षातर्गत करण्यात येईल.

(**IV**) क्रीडा साहित्य व संघाच्या प्रवासादरम्यानचा खर्चः- उक्त नियमावलीत नमुद सर्व क्रीडा स्पर्धेकरिता सहभागी महाविद्यालयांनी आपआपल्या संघाचा प्रवासादरम्यानचा खर्च (चहापान व भोजन खर्च) तसेच क्रीडा साहित्याचा खर्च (विद्यापीठातर्फे अनुज्ञेय असलेल्या साहित्याव्यतिरिक्त) स्वतः करावा. तसेच, स्पर्धकांनी आपआपल्या क्रीडा प्रकारासाठी आवश्यक असलेले क्रीडा साहित्य उदा. रॅकेट्स, बुध्दीबळ पट इ. संबंधीत क्रीडा साहित्य स्वतःचे स्वतः आणणे बंधनकारक असेल. खेळाच्या साहित्याच्या खरेदीसाठी विद्यापीठ यथोचित प्रक्रियेचा अवलंब करुन दर कराराद्वारे पुरवठादाराची निश्चिती करु शकेल. अशा प्रकारे विद्यापीठाने पुरवठादाराची नियुक्ती केल्यास ज्या क्रीडास्पर्धांकरीता खेळाच्या साहित्याचा खर्च विद्यापीठातर्फे अनुज्ञेय असेल असे क्रीडा साहित्य, ट्रॅक सुट, पेहराव, बुट वगैरे सदर पुरवठादारामार्फत पुरविण्यात येतील व त्यावरील खर्चाची अदायगी विद्यापीठामार्फत सरळ संबधित पुरवठादारास करण्यात येईल.

(**V**) ए.आय.यु. संघ निवड चाचणी करीता सहभागी होण्यासाठी महाविद्यालयांनी आपआपल्या संघाचा प्रवासखर्च, चहापान व भोजन खर्च तसेच क्रीडा साहित्याचा खर्च स्वतः करावा. त्यासाठी विद्यापीठाकडुन कुठलेही अनुदान अनुज्ञेय नसेल.

(**VI**) विभागीय क्रीडा स्पर्धा, आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा, सराव शिबिर व क्रीडा महोत्सव, ए.आय.यु. संघ निवड चाचणी क्रीडा, ए.आय.यु. क्रीडा स्पर्धा व इतर क्रीडा स्पर्धाकरीता संबंधीताने घेतलेल्या अग्रिम रक्कमेच्या हिशोबाच्या समायोजनासाठीचे नियमः

(अ) विभागीय क्रीडा स्पर्धा, आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा, सराव शिबिर व क्रीडा महोत्सव, ए.आय.यु. निवड चाचणी क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी विद्यापीठाद्वारे अंदाजित मान्यता प्राप्त अग्रीमाची रक्कम रुपये १,००,०००/-

(रुपये एक लक्ष मात्र) पेक्षा कमी असेल अशा रक्कमेसाठी लेखा परीक्षण शुल्क रु. १,०००/-+ कर (Tax) अनुज्ञेय असेल. अशा प्रकारच्या अग्रिम रक्कमेच्या समायोजनाच्या प्रस्तावासोबत नोंदणीकृत सनदी लेखापालाची (Chartered Accountant) लेखा परीक्षण शुल्क मिळाल्याची मुळ पावती जोडणे आवश्यक असेल.

(ब) विभागीय क्रीडा स्पर्धा, आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा, सराव शिबिर व क्रीडा महोत्सव व ए.आय.यु. निवड चाचणी क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी विद्यापीठाद्वारे अंदाजित मान्यता प्राप्त रक्कम रुपये १,००,०००/- (रुपये एक लक्ष मात्र) किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा रक्कमेसाठी लेखा परीक्षण शुल्क रु. १५००/-+ कर (Tax) अनुज्ञेय असेल. अशा प्रकारच्या अग्रिम रक्कमेच्या समायोजनाच्या प्रस्तावासोबत नोंदणीकृत सनदी लेखापालाची (Chartered Accountant) लेखा परीक्षण शुल्क मिळाल्याची मुळ पावती जोडणे आवश्यक असेल.

(क) विभागीय क्रीडा स्पर्धा, आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा, सराव शिबिर व क्रीडा महोत्सव, ए.आय.यु. निवड चाचणी क्रीडा स्पर्धा व इतर क्रीडा स्पर्धांकरीता घेतलेल्या अग्रिम रक्कमेच्या समायोजनासाठी खालील नमुद दस्तऐवज बंधनकारक असतीलः-

(एक) नोंदणीकृत सनदी लेखापालाच्या (Chartered Accountant) स्वाक्षरी व शिक्क्यासह सदर अग्रिम रक्कमेच्या जमा खर्चाचा हिशेब व उपयोगिता प्रमाणपत्र.

(दोन) समायोजनाच्या प्रस्तावासोबत सर्व मुळ देयके, पावत्या, व्हाउचर्स इत्यादी.

(तीन) समायोजनासाठी विद्यापीठाने वेळोवेळी नमुद केलेल्या कार्यपध्दतीची अंमलबजावणी करणे बंधनकारक असेल.

(ड) विभागीय क्रीडा स्पर्धा, आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा, सराव शिबिर व क्रीडा महोत्सव, ए.आय.यु. निवड चाचणी क्रीडा व इतर क्रीडा स्पर्धांकरिता

खर्चाकरीता अनुज्ञेय रक्कमेच्या जास्तीत जास्त ८० टक्के रक्कम अग्रिम म्हणुन संबंधीत आयोजक महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य यांना अदा करण्यात येईल. अधिष्ठाता / प्राचार्य व क्रीडा शिक्षक / विभागीय समन्वयक / आंतरविभागीय समन्वयक विहित मर्यादेत व विहित प्रक्रिया / पध्दतीचा अवलंब करुन आयोजनाकरीता सदर रक्कम खर्च करु शकतील. विहित खर्चाव्यतिरिक्त अतिरिक्त करण्यात आलेला खर्च प्रतिपुर्तीकरीता / समायोजनाकरीता अनुज्ञेय नसेल. विद्यापीठ विहित कार्यपध्दतीनुसार व विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार खर्च करण्यात यावा. स्पर्धा संपन्न झाल्यानंतर दोन महिन्यांच्या आत अग्रिम रक्कमेंच्या समायोजनाचा प्रस्ताव व स्पर्धेचा स्वतंत्र अहवाल विद्यापीठास सादर करणे अनिवार्य असेल. तद्नंतर उर्वरीत प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम किंवा २० टक्के रक्कम महाविद्यालयास अनुज्ञेय असेल.

(ई) विभागीय क्रीडा स्पर्धा, आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा, सराव शिबिर, व क्रीडा महोत्सव, ए.आय.यु. निवड चाचणी क्रीडा स्पर्धा व इतर स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या संघात सहभागी होणाऱ्या विद्यार्थी स्पर्धकास काही गंभीर स्वरुपाची दुखापत/अपघात झाल्यास त्याच्या उपचारासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च किंवा जास्तीत जास्त रु.५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम विद्यापीठातर्फे अनुज्ञेय असेल. उपचारासाठी जास्त खर्च झाल्यास रु. ५०,०००/- वरील खर्च संबंधित खेळाडु विद्यार्थ्यास करावा लागेल. अशा अतिरीक्त खर्चास विद्यापीठ जबाबदार नसेल.

(फ) ज्या ठिकाणी खर्चाचे दर नमुद नसतील किंवा काही ठिकाणी खर्चाच्या दरामध्ये तफावत असेल त्या ठिकाणी कुलगुरुंच्या आदेशान्वये कार्यवाही करण्यात येईल. कुलगुरु यांना विशेष परिस्थितीत वाढीव खर्चाच्या मान्यतेबाबत व प्रकरणपरत्वे निकडीची वस्तुस्थिती विचारात घेऊन इतर यथोचित निर्णय घेण्याचा अधिकार असेल.

# प्रकरण क्र. ४: विद्यार्थ्यांकरीता कौशल्य विकास कार्यक्रम

१०) <u>व्यावसायिक मार्गदर्शन</u>

(१०.१) प्रस्तावनाः- आरोग्य विज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त झाल्यावर वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी आवश्यक ते मागदर्शन तज्ञांमार्फत दिले जावे जेणेकरुन समाजास उत्तम वैद्यकीय व्यावसायिक मिळेल व नैतिकतेचा अवलंब करुन वैद्यकीय व्यवसाय करण्यास पदवी धारकास उपयोग होईल या उद्देशाने सदर उपक्रम निर्धारीत करण्यात आलेला असुन त्याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(१०.२) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये आरोग्य विज्ञानाच्या विविध विद्याशाखेंतर्गत पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावर "व्यावसायिक मार्गदर्शन" करण्याकरीता संबंधित महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करतील.

(१०.३) व्यावसायिक मार्गदर्शनाच्या कार्यशाळेकरीता तज्ञ व्याख्याते ठरविण्याचे सर्व अधिकार महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य व महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीस असतील.

(१०.४) व्यावसायिक मार्गदर्शनाच्या कार्यशाळेकरीता सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्याकडुन महाविद्यालय कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारणार नाही.

(१०.५) महाविद्यालयाने एकदिवसीय व्यावसायिक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करावे व त्यानंतर पंधरा दिवसांचे आत कार्यशाळेकरीता आलेल्या प्रशासकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा परिपुर्ण प्रस्ताव विद्यापीठास सादर करावा.

(१०.६) व्यावसायिक मार्गदर्शनाच्या कार्यशाळेच्या आयोजनाकरीता विद्यापीठ एका आर्थिक वर्षात एका संलग्नित महाविद्यालयास प्रत्यक्षात झालेला खर्च किंवा जास्तीत जास्त रक्कम रु.१०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रक्कमेची महाविद्यालयास प्रतिपुर्ती अनुज्ञेय असेल.

(१०.७) कार्यशाळेच्या खर्चाचे लेखापरिक्षण करणेकरीता उपरोक्त रक्कमेव्यतिरीक्त रु.५००/- सनदी लेखापालाच्या शुल्काची प्रतिपुर्ती अनुज्ञेय असेल.

(१०.८) व्यावसायिक मार्गदर्शनाची कार्यशाळा आयोजनास महाविद्यालयाद्वारे विद्यापीठाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक असेल.

(१०.९) प्रत्येक आर्थिक वर्षात व्यावसायिक मार्गदर्शनाच्या कार्यशाळांकरीता नियोजीत लेखाशिर्षातर्गतच्या उपलब्ध निधीच्या आधीन राहुन आयोजनास मान्यता घेतलेल्या महाविद्यालयांचे प्रतिपुर्ती स्वरुपात अनुदानाचे प्रस्ताव मान्य करण्यात येतील. तथापी, पुर्व मान्यता न घेतलेल्या महाविद्यालयांचे प्रतिपुर्तीचे प्रस्ताव मान्य करणे अथवा अमान्य करणे याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार कुलगुरु यांना असतील.

(१०.१०) सदर प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे दस्तऐवज जोडुन सादर करणे आवश्यक असेल.

(I) महाविद्यालयाच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांचे स्वाक्षरी व शिक्क्यासह प्रस्ताव शिर्षपत्र.

(II) आयोजित केलेल्या व्यावसायिक मार्गदर्शनाच्या कार्यशाळेबाबत थोडक्यात माहिती (स्थळ, वेळ, दिनांक, तज्ञ व्याख्यात्यांची नावे व माहिती, उपस्थित विद्यार्थ्यांची त्यांच्या स्वाक्षरीनिशी नावांची यादी, वृत्तपत्रात कार्यक्रमाबाबत बातमी प्रसिध्द् झाली असल्यास त्यांच्या कात्रणाची छायाप्रत वगैरे).

(III) कार्यशाळा आयोजनाकरीता विद्यापीठाच्या मान्यतेच्या पत्राची स्वयंस्वाक्षांकीत प्रत.

(IV) कार्यशाळा आयोजनाकरीता आलेल्या प्रशासकीय खर्चाची देयके व व्हाऊचर्स (मुळ प्रति).

(V) तज्ञ व्याख्यात्यांना देण्यात आलेल्या प्रवास भत्ता व मानधनाची देयके/व्हाऊचर्स (मुळ प्रति).

(**VI**) कार्यशाळेकरीता झालेल्या खर्चाचे सनदी लेखापालाने केलेल्या ऑडीटेड स्टेटमेंटची मुळ प्रत.

(**VII**) सनदी लेखापालाच्या रु.५००/- शुल्काची अदायगी झाल्याची मुळ पावती.

(**VIII**) वेळोवेळी विद्यापीठाने विहीत केलेली इतर अनुषंगिक दस्तऐवज.

(१०.११) ज्या महाविद्यालयांनी सदर योजनेचा यापुर्वी लाभ घेतला नसेल/कमीत कमी वेळा लाभ घेतला असेल अशा महाविद्यायांना प्रथम प्राधान्य देवुन विद्यापीठाच्या अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतुदीच्या कमाल मर्यादेत अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

(१०.१२) महाविद्यालयाने प्रस्तावासोबत महाविद्यालयाचे ज्या बॅंकेत खाते आहे त्या बॅंकेचे नाव, खाते क्रमांक, आय.एफ.एस्.सी. कोड, शाखा, पुर्ण पत्ता वगैरे माहिती प्रस्तावासोबत विद्यापीठास सादर करावी.

(१०.१३) विद्यापीठास प्राप्त प्रस्तावांची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येऊन परिपुर्ण प्रस्तावाबाबत प्रतिपुर्ती स्वरुपात अनुदानाची रक्कम निर्गमित करणे करीता तयार करण्यात आलेल्या कार्यालयीन टिप्पणीस कुलगुरु यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्ताव व आवश्यक माहिती / दस्तऐवज वित्त व लेखा अधिकारी यांना पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित करण्यात यावेत. परिपुर्ण प्रस्तावाचे तपासणीनंतर वित्त व लेखाधिकारी यांनी अनुदानाची रक्कम संबंधित महाविद्यालयाच्या खात्यात जमा करावी व त्याबाबत विद्यार्थी कल्याण विभागास सुचना पाठवावी.

(१०.१४) सदर योजनेंतर्गत अनुदान रक्कमेतून कोणत्याही स्वरुपाच्या भेटवस्तूची रक्कम प्रतिपूर्तीस अनुज्ञेय नसेल.

(१०.१५) सदर योजनेंतर्गत अनुदानाच्या रक्कमेतून बदल करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

## ११) व्यक्तिमत्व विकास समुपदेशन, प्रभावी शिक्षण व संवाद कौशल्य

(११.१) प्रस्तावना : विद्यापीठांतर्गत आरोग्य विज्ञानाच्या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होणे, शिक्षक व विद्यार्थी आणि विद्यार्थी व रुग्ण यांच्यामधील संबंध व संवाद याबाबतचे कौशल्य अवगत करुन देण्याकरिता विद्यापीठातर्फे किंवा संलग्नीत महाविद्यालयांमार्फत समुपदेशन कार्यशाळांचे आयोजन करण्याचा सदर उपक्रमाचा उद्‌देश असुन त्याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(११.२) विद्यापीठांतर्गत आरोग्य विज्ञानाच्या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना व्यक्तीमत्व विकास समुपदेशन, प्रभावी शिक्षण व संवाद कौशल्य अवगत करुन देण्याकरिता विद्यापीठ कार्यशाळांचे आयोजन करेल. अशाप्रकारच्या कार्यशाळा विद्यापीठ निर्धारीत करेल, त्याठिकाणी आयोजित करण्यात येतील.

(११.३) विद्यापीठ अशाप्रकारच्या कार्यशाळांचे ऑनलाईन प्रणालीद्वारे (Webinar) थेट प्रक्षेपण करु शकेल. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे अधिष्ठाता / प्राचार्य हे अशाप्रकारे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यशाळेचे थेट प्रक्षेपण आपआपल्या महाविद्यालयात प्रसारीत करण्याची व्यवस्था करतील.

(११.४) अशाप्रकारच्या कार्यशाळांचे ऑनलाईन प्रणालीद्वारे (Webinar) थेट प्रक्षेपण करण्याकरिता विद्यापीठ योग्य त्या प्रक्रियेचा अवलंब करुन यथोचित संस्थेशी करार करेल.

(११.५) व्यक्तीमत्व विकास समुपदेशन, प्रभावी शिक्षण व संवाद कौशल्य या विषयावरील कार्यशाळा ही एक दिवसाची असावी. सदर कार्यशाळेकरिता उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठ योग्य त्या तज्ञ व्यक्तीस / व्यक्तींना मार्गदर्शक म्हणुन आमंत्रित करेल.

(११.६) कार्यशाळेच्या प्रस्तावित खर्चास विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक असेल. अंदाजपत्रकाव्यतिरिक्त निकड व आवश्यकता विचारात घेऊन अतिरिक्त खर्चास विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहून मंजुरी देण्याचे अधिकार कुलगुरु यांना असतील.

(११.७) व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेला कार्यशाळेकरिताचा खर्च विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येईल.

(११.८) तज्ञ मार्गदर्शकास कमाल रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार मात्र) पर्यंत मानधन अनुज्ञेय असेल. तसेच, तज्ञ मार्गदर्शकाच्या निवासस्थळापासून ते कार्यक्रमाच्या ठिकाणी किंवा कार्यशाळा जर ऑनलाईन प्रणालीद्वारे (Webinar) थेट प्रक्षेपणाच्या माध्यमातून होणार असेल तर स्टुडिओच्या ठिकाणापर्यंत येण्या-जाण्याकरिता विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

११.९) अशाप्रकारच्या कार्यशाळेच्या ठिकाणी उपस्थित राहण्याकरिता निमंत्रित शिक्षक, विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांचे सदस्य आणि आवश्यक विद्यापीठाचे अधिकारी/कर्मचारी यांना विद्यापीठाने वळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल. आवश्यकता भासल्यास अशा कार्यशाळांचे आयोजन संलग्नीत महाविद्यालयांमार्फत करण्याचे व त्याकरीताचा खर्च करण्याचे विद्यापीठास अधिकार असतील.

११.१०) व्यवहार्य असेल तेथवर विद्यापीठ व्यक्तीमत्व विकास समुपदेशन, प्रभावी शिक्षण व संवाद कौशल्य या विषयांबाबतच्या एका शैक्षणिक वर्षात विद्यापीठ किमान चार कार्यशाळांचे आयोजन करेल.

११.११) व्यक्तीमत्व विकास समुपदेशन, प्रभावी शिक्षण व संवाद कौशल्य याबाबतच्या कार्यशाळांच्या / कार्यक्रमांच्या आयोजनाबाबतच्या इतर अटी व शर्ती कुलगुरु यांनी वेळोवेळी निर्धारीत केल्यानुसार असतील.

१२) <u>स्पंदन</u>

(१२.१) प्रस्तावनाः- विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणारे आरोग्य विज्ञानाच्या विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या सुप्त कलागुणांना संधी उपलब्ध करुन देवुन त्यांचा विकास करणे हा "स्पंदन" या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा उद्‌देश असुन त्याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(१२.२) व्यवहार्य असेल तेथवर सर्वसाधारणपणे प्रत्येक वर्षी "स्पंदन" हा सांस्कृतिक कार्यक्रम विद्यापीठ आयोजित करेल.

(१२.३) "स्पंदन" हया विद्यापीठस्तरीय सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत विद्यापीठ शक्यतोवर किमान ६० दिवस अगोदर परिपत्रक निर्गमित करेल.

(१२.४) "स्पंदन" हया सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक संलग्नित महाविद्यालयास सर्वसाधारणपणे एकुण २८ कला प्रकारांकरीता स्पर्धक, संगीत साथीदार व संघव्यवस्थापक असे एकुण कमाल ४० स्पर्धकांचा संघ पाठविता येईल. प्रत्येक संघासोबत दोन संघव्यवस्थापक (एक महिला व एक पुरुष) पाठवणे व सोबत स्पर्धकांचा विहीत नमुन्यातील नोंदणी अर्ज, सांघिक स्पर्धेसाठीचा अर्ज व संघ व्यवस्थापकांची माहिती भरुन विद्यापीठास सादर करणे आवश्यक असेल.

(१२.५) सहभागी होवू इच्छिणाऱ्या प्रत्येक महाविद्यालयाने विहीत नमुन्यातील प्रवेशिकेसोबत विद्यापीठ वेळोवेळी विहित करेल असे शुल्क "कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ" (Registrar, MUHS, Payable at Nashik) या नावाने नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाद्वारे किंवा ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या बँक खात्यात भरणे आवश्यक असेल.

(१२.६) महाविद्यालय व स्पर्धक विद्यार्थ्यांना महत्वाच्या सुचना, सांस्कृतिक पथसंचलनाबाबत सुचना, संघ व्यवस्थापकांसाठी सुचना व सर्वसाधारण विजेतेपद याकरिताची नियमावली व माहितीपत्रक, विविध कलाप्रकारांची यादी याबाबतची

माहिती व नियमावली तसेच, विविध नमुना अर्ज हे विद्यापीठ परिपत्रकासोबत प्रसिध्द करण्यात येतील.

(१२.७) महाविद्यालयीन संघ व स्पर्धानिहाय स्पर्धक संख्या मर्यादीत असल्यामुळे "प्रथम नोंदणी प्रथम प्राधान्य" (First Come First Served) या तत्वाने संघांना / स्पर्धकांना स्पर्धेकरीता प्रवेश देण्यात येईल.

(१२.८) विद्यापीठाच्या "स्पंदन" आयोजनाबाबतचे परिपत्रक महाविद्यालयांनी सुचना फलकावर प्रदर्शित करावे. तसेच, विद्यार्थी प्रतिनिधी, सर्व विद्यार्थी, सांस्कृतिक समन्वयक व संबंधितांना त्याबाबत अवगत करावे. विद्यापीठ सदर परिपत्रक व संपुर्ण सहपत्रे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देईल.

(१२.९) स्पंदन कार्यक्रमातील प्रत्येक कला प्रकाराकरीता विद्यापीठ आवश्यक तेवढया परिक्षकांची नियुक्ती करेल. सदर परिक्षकांचे मानधन विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारीत केल्याप्रमाणे असेल.

(१२.१०) आयोजक महाविद्यालय :- स्पंदन कार्यक्रमाच्या आयोजनापुर्वी शक्यतो किमान ९० दिवस अगोदर ज्या विभागात स्पंदन कार्यक्रमाचे आयोजन करणे प्रस्तावित असेल, त्या विभागातील संलग्नित महाविद्यालयांना आयोजकत्वाबाबतचा प्रस्ताव सादर करणेविषयी कळविण्यात येईल. विहीत मुदतीत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांपैकी ज्या महाविद्यालयाकडे जास्तीत-जास्त सोयीसुविधा उपलब्ध असतील अशा महाविद्यालयास आयोजकत्व देण्यात येईल.

(१२.११) <u>सुकाणु समिती, स्थानिक आयोजन समिती व इतर समित्याः-</u>

(I) सुकाणु समितीः- "स्पंदन" या कार्यक्रमाकरीता विद्यापीठस्तरीय सुकाणु समिती खालील प्रमाणे असेल

| | | |
|---|---|---|
| अ) | कुलगुरु | अध्यक्ष |
| ब) | प्रतिकुलगुरु | सदस्य |
| क) | अधिसभा व व्यवस्थापन परिषदेचे कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले प्रत्येकी एक सदस्य | सदस्य |
| ड) | पुर्वीच्या स्पंदन कार्यक्रमात महत्वाची भुमिका यशस्वीपणे पार पाडलेले दोन सदस्य (कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| इ) | कुलसचिव | सदस्य |
| फ) | वित्त व लेखाधिकारी | सदस्य |
| ग) | कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले उपकुलसचिव किंवा सहा. कुलसचिव किंवा समकक्ष दर्जाचे दोन विद्यापीठ अधिकारी | सदस्य |
| ह) | स्थानिक आयोजन समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव | सदस्य |
| आय) | संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग | सदस्य |
| जे) | विभाग प्रमुख, विद्यापीठ जनसंपर्क विभाग | सदस्य सचिव |

सुकाणु समिती आयोजक महाविद्यालयाची निवड, कार्यक्रमाची रुपरेषा, खर्चाचे अंदाजपत्रक, उप-समित्यांचे गठण व त्यांचे कामकाज व जबाबदाऱ्या निश्चित करणे अशा प्रकारचे कामकाज करेल. कार्यक्रम आयोजनाशी निगडीत सर्व महत्वाचे निर्णय घेण्याचे कामकाज सुकाणु समिती करेल.

(II) स्पंदन कार्यक्रमाचे आयोजनाकरीता कुलगुरु हे स्थानिक आयोजन समितीचे गठण करतील. कुलगुरु यांना आवश्यक वाटतील अशा अधिकारी / स्थनिक प्राधिकरण सदस्य/महाविद्यालयाचे अधिष्ठाता, प्राचार्य, शिक्षक / कलाकार / संबंधीत क्षेत्रातील तज्ञ यांची स्थानिक आयोजन समितीवर नियुक्ती करतील. स्थानिक आयोजन समिती स्पंदन कार्यक्रमाचे व त्यामधील कला स्पर्धाचे नियोजन करेल.

(III) स्पंदन कार्यक्रमाच्या नियोजित दिनांकापुर्वी सुकाणु समिती व स्थानिक आयोजन समितीच्या वेळोवेळी बैठका आयोजनाची जबाबदारी सदर समितीच्या सचिवांची असेल.

(IV) स्थानिक आयोजन समिती कार्यक्रमाचे सुक्ष्म नियोजन करेल व सुकाणु समितीच्या मान्यतेस्तव सादर करेल.

(V) सदर कार्यक्रमाचे आयोजनाकरीता आवश्यक वाटतील अशा उप-समित्या जसे निवास समिती, भोजन समिती, वाहतुक समिती, कला स्पर्धा नियोजन समिती, व्यासपीठ समिती, प्रसिध्दी समिती, सुरक्षा समिती वगैरे गठीत करण्यात येतील.

(VI) कार्यक्रमाच्या नियोजित दिनांकाच्या एक दिवस अगोदरपासुन ते कार्यक्रम संपेपर्यंत स्थानिक आयोजन समिती सदस्य कार्यक्रमाच्या आयोजक महाविद्यालयात/कार्यक्रमस्थळी पुर्णवेळ उपस्थित असतील.

(१२.१२) स्पंदन कार्यक्रमाच्या नियोजित दिनांकाच्या अगोदरच्या दिवसाचा व कार्यक्रमाच्या कालावधी दरम्यान सहभागी संघ, संघ व्यवस्थापक, परीक्षक, समिती सदस्य, निमंत्रित, विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी यांचा निवास, चहापान, न्याहारी व भोजन (दुपारचे व रात्रीचे) यांचा खर्च विद्यापीठ करेल.

(१२.१३) स्पर्धेदरम्यान विद्यार्थी स्पर्धकांना विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या नियमांचे व शिस्तीचे अनुपालन करणे बंधनकारक असेल. शिस्तभंग प्रकरणी चौकशीअंती दोषी विद्यार्थी स्पर्धकास शासन/शिक्षा करण्याचे विद्यापीठास अधिकार असतील.

(१२.१४) स्पंदन कार्यक्रमाकरीता विद्यापीठ स्तरावर गठित सुकाणु समिती, स्थानिक आयोजन समिती व इतर समित्यांमधील शिक्षक, प्राधिकरण सदस्य व विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी यांना अतिरिक्त कामकाजाचा आर्थिक मोबदला निर्धारीत करणे व अदा करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील व त्यावरील खर्च सदर कार्यक्रमाकरीताच्या निर्धारीत लेखाशिर्षांतर्गत करण्यात येईल.

(१२.१५) प्रवास व दैनिक भत्ताः-

(I) आयोजक महाविद्यालयात/कार्यक्रमास्थळी येण्या-जाण्याकरीता प्रत्येक सहभागी महाविद्यालय आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी स्पर्धक संघाचा व संघव्यवस्थापकांचा खर्च करेल. त्याकरीता विद्यापीठाकडुन विद्यार्थी स्पर्धकांना व संघव्यवस्थापकांना कुठल्याही प्रकारचा प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय नसेल.

(II) विद्यापीठाने नियुक्त केलेल्या सर्व समित्यांचे सदस्य, परिक्षक व निमंत्रितांना विद्यापीठाने त्या-त्या वेळी निर्धारीत केलेल्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(१२.१६) याव्यतिरिक्त "स्पंदन" कार्यक्रमाच्या आयोजनाबाबतच्या इतर अटी व शर्ती विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारीत केल्यानुसार असतील.

१३) निबंध स्पर्धा

(१३.१) प्रस्तावनाः- विद्यापीठांतर्गत आरोग्य विज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील लेखन कौशल्य वृध्दींगत करण्याचा सदर स्पर्धेचा उद्‌देश असुन त्याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(१३.२) विद्यापीठ व्यवहार्य असेल तेथवर प्रत्येक वर्षी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता निबंध स्पर्धेचे आयोजन करेल.

(१३.३) निबंध स्पर्धेचे आयोजन व्यवहार्य असेल तेथवर सर्वसाधारणपणे तीन स्तरांवर करण्यात येईल.

(I) महाविद्यालय स्तर;

(II) विभागीय स्तर; आणि

(III) विद्यापीठ स्तर.

(१३.४) निबंध स्पर्धेच्या आयोजनाबाबत विविध अटी व शर्तीचा समावेश असलेले परिपत्रक विद्यापीठ निर्गमित करेल.

(१३.५) निबंध स्पर्धा आयोजनाबाबत विद्यापीठाने परिपत्रक निर्गमित केल्यानंतर ईच्छुक महाविद्यालयांनी आपआपल्या स्तरावर विद्यापीठाने विहीत केलेल्या मुदतीत निबंध स्पर्धेचे आयोजन करावे. महाविद्यालय स्तरावरील निबंध स्पर्धेचे आयोजन संबंधित महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य यांचे मार्गदर्शनाखाली होईल. महाविद्यालयातील तीन शिक्षकांची परिक्षक समिती गठीत करुन अधिष्ठाता/प्राचार्य विद्यार्थ्यांच्या निबंधांचे परिक्षण करुन घेईल व प्राप्त निबंधांमधुन क्रमवारीने उत्कृष्ट तीन निबंधांची निवड करेल व त्याबाबत विद्यापीठास कळवेल.

(१३.६) महाविद्यालय स्तरावर निबंध स्पर्धेत प्रथम, द्वीतीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे अनुक्रमे रु.१,०००/-, रु.७००/- व रु.५००/- चे पारितोषिक देण्यात येईल.

(१३.७) विहीत मुदतीत सहभागी सर्व महाविद्यालयाने निबंध स्पर्धेतील क्रमवारीने तीन विजेत्यांची नावे, विजेत्या तीनही विद्यार्थ्यांना पारितोषिक रक्कम अदा केल्याच्या विद्यार्थ्यांची स्वाक्षरी असलेल्या मुळ पावत्या व महाविद्यालयाच्या बॅंक खात्याचे विवरण सादर केल्यावर प्राप्त दस्तऐवज तपासुन सदर रक्कम (प्रती महाविद्यालय एकुण रु.२,२००/- मात्र) संबंधित महाविद्यालयांना देण्याबाबतचा प्रस्ताव व कार्यालयीन टिप्पणी तयार करण्यात येईल. सदर प्रस्तावास कुलगुरु यांची मान्यता प्राप्त झाल्यावर सदर रक्कम संबंधित महाविद्यालयाचे बॅंक खात्यावर ईलेक्ट्रॉनिक ट्रान्सफरद्वारे वर्ग करण्यासाठी आवश्यक दस्तऐवजांसह प्रस्ताव विद्यापीठाच्या वित्त व लेखाअधिकारी यांना अग्रेषित करण्यात येईल.

(१३.८) महाविद्यालय स्तरावरील तीन विजेते विद्यार्थी त्यांचे महाविद्यालय राज्याच्या ज्या महसुल विभागाच्या कार्यक्षेत्रात असेल त्या विभागातील स्पर्धेत सहभागी होण्यास पात्र असतील. अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे विभागीय स्पर्धेबाबतचे परिपत्रक निर्गमीत झाल्यानंतर त्यामध्ये विहीत मुदतीत आपआपले निबंध विद्यापीठास प्रत्यक्ष/टपालाने सादर करावेत. उशीराने प्राप्त झालेले निबंध विचारात घेतले जावु नयेत. सदर निबंधांचे परिक्षण करण्याकरीता कुलगुरु आवश्यक तेवढया परिक्षकांची नियुक्ती करतील. सदर परिक्षक प्रत्येक विभागातुन तीन उत्कृष्ट निबंधांची निवड करुन त्यांची क्रमवारी लाऊन विद्यापीठास अहवाल सादर करतील. प्रत्येक विभागातुन निबंध स्पर्धेत प्रथम, द्वीतीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे अनुक्रमे रु.५,०००/-, ४,०००/- व ३,०००/- चे पारितोषिक व प्रशस्तीपत्र देण्यात येईल. सदर पारितोषकाची रक्कम संबंधित विजेत्यांच्या खात्यावर विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागामार्फत यथोचित प्रशासकीय प्रक्रीयेअंती जमा करण्यात येईल. प्रशस्तीपत्र टपालाद्वारे संबंधित विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयास पाठविण्यात येईल.

(१३.९) विभागीय स्तरावरील विजेत्यांकरीता विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल. विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेचे परिपत्रक निर्गमित झाल्यानंतर त्यामध्ये विहीत मुदतीत विभागीय स्तरावरील विजेते विद्यार्थी विद्यापीठास प्रत्यक्ष/टपालाद्वारे निबंध सादर करु शकतील. उशीराने प्राप्त झालेले निबंध विचारात घेतले जाणार नाहीत. प्राप्त निबंधांचे परिक्षण करण्याकरीता कुलगुरु आवश्यक तेवढया परिक्षकांची नियुक्ती करतील. सदर परिक्षकांचे मंडळ प्राप्त प्रत्येक निबंधाचे परिक्षण व तपासणी करुन विद्यापीठ स्तरावरील क्रमवारीने तीन उत्कृष्ट निबंधांची निवड करतील. क्रमवारीनुसार प्रथम, द्वीतीय व तृतीय निबंधाकरीता विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु.११,०००/-, ९,०००/- व ७,०००/- रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्र देण्यात येईल.

(१३.१०) विभागीय व विद्यापीठ स्तरावर नव्याने स्पर्धा न घेता महाविद्यालय स्तरावर स्पर्धेदरम्यान सादर केलेले विजेत्यांचे निबंध विभागीय व त्यानंतर विद्यापीठस्तरीय स्पर्धेकरीता निवडीस ग्राहय धरण्याचे व त्यानुसार स्पर्धेचे आयोजन करण्याचे अधिकार विद्यापीठास असतील. तसेच, महाविद्यालय व विभागीय स्तरावर स्पर्धा न घेता थेट विद्यापीठ स्तरावर निबंध स्पर्धा आयोजित करण्याचे अधिकार देखील विद्यापीठास असतील.

(१३.११) विभागीय व विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेच्या नियुक्त परिक्षकांना परिक्षणाच्या संपुर्ण कामकाजाकरीता अनुक्रमे रु. १,०००/- व रु. २,०००/- मानधन अनुज्ञेय असेल.

(१३.१२) प्रवास व दैनिक भत्ताः- विभागीय व विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेच्या नियुक्त परिक्षकांना विद्यापीठ नियमानुसार प्रवासभत्ता व दैनिकभत्ता अनुज्ञेय असेल. तसेच, विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयातुन / निवासस्थानापासुन विद्यापीठात / बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थित राहणेकरीता विद्यापीठ नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(१३.१३) निबंध स्पर्धेबाबत उपरोक्त विहित नियमांव्यतिरिक्तच्या अटी व शर्ती कुलगुरु यांनी वेळोवेळी निर्धारीत केल्याप्रमाणे असतील.

(१३.१४) पारितोषिकांच्या रक्कमेमध्ये बदल करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

१४) <u>सामाजिक जनजागृती उपक्रम</u>

(१४.१) प्रस्तावनाः- राज्यामध्ये आधुनिक वैद्यक व भारतीय वैद्यक पध्दती यामध्ये यथायोग्य आणि पध्दतशीर शिक्षण, अध्यापन, प्रशिक्षण व संशोधन या प्रयोजनाकरिता विद्यापीठाची स्थापना झालेली असल्यामुळे विद्यापीठाकडून असलेल्या सामाजिक अपेक्षांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने विद्यापीठ विविध सामाजिक जनजागृती उपक्रम राबवेल. अशा उपक्रमांमध्ये प्रामुख्याने अवयवदान, कुपोषण, स्वच्छ मुख अभियान, ग्राम दत्तक योजना व इतर आरोग्य विषयक जनजागृती उपक्रम राबविणे हा सदर उपक्रमाचा उद्देश असुन त्याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(१४.२) सामाजिक जनजागृती उपक्रमांतर्गत समाजाशी निगडीत किंवा समाज जागृतीकरीताच्या विषयांवर उपक्रम, कार्यशाळा, व्याख्यानमाला, रॅली, शिबीर, स्पर्धा इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येतील. सदर कार्यक्रमांव्यतिरिक्त सामाजिक जनजागृती उपक्रमांतर्गत इतर कार्यक्रम कुलगुरु यांच्या परवानगीने राबविण्यात येतील.

(१४.३) सामाजिक जनजागृती उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांकरिता संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग हे समन्वयक म्हणुन कामकाज पाहतील. सदर उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाकरिताच्या प्रस्तावित खर्चास विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक असेल.

(१४.४) सदर उपक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी कुलगुरु / कुलसचिव यांच्या मान्यतेने प्राधिकरणाचे सदस्य व विद्यापीठातील आवश्यक असलेल्या इतर अधिकारी / कर्मचारी यांची मदत घेण्यात येईल.

(१४.५) सदर उपक्रमांतर्गत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात कार्यक्रम आयोजित करणे प्रस्तावित असल्यास, सदर महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य व आवश्यक शिक्षक वर्गाची मदत घेण्यात येईल.

(१४.६) सदर उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमास विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकानुसार खर्च करणे आवश्यक असेल. अंदाजपत्रकाव्यतिरिक्त निकड व आवश्यकता विचारात घेवुन अतिरिक्त खर्चास व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहुन मंजुरी देण्याचे अधिकार कुलगुरु यांना असतील.

(१४.७) सदर उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमास विद्यापीठाने निमंत्रित केलेल्या अतिथी, तज्ञ व महनीय व्यक्ती, प्राधिकरणाचे सदस्य, शिक्षक, विद्यार्थी प्रतिनिधी व विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी यांना विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(१४.८) सदर उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या आयोजनाबाबतच्या इतर अटी व शर्ती कुलगुरु यांनी वेळोवेळी निर्धारीत केल्याप्रमाणे असतील.

१५) स्व. डॉ. दौलतराव आहेर राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय व्याख्यानमाला

(१५.१) प्रस्तावनाः- राज्यात स्वतंत्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवणारे नाशिक जिल्हयाचे भूमिपुत्र तथा महाराष्ट्र राज्याचे माजी सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री स्वर्गीय डॉ. दौलतरावजी आहेर यांच्या नांवाने विद्यापीठांतर्गतच्या आरोग्य विज्ञानाच्या विविध विद्याशाखेतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या तज्ञांना निमंत्रीत करुन विद्यार्थी, शिक्षक व समाजास त्यांच्या ज्ञानाचा लाभ होईल यादृष्टीने सदर व्याख्यानमालेचे आयोजन करणे हा उद्‌देश असुन त्याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(१५.२) सदर व्याख्यानमालेचे जेथवर शक्य आहे तेथवर एका शैक्षणिक वर्षात किमान एकदा आयोजन करण्यात यावे. सदर व्याख्यानमालेकरीता खालीलप्रमाणे व्याख्यानमाला संयोजन समिती असेलः-

| | | |
|---|---|---|
| १ | कुलगुरु | अध्यक्ष |
| २ | प्रति कुलगुरु | सदस्य |
| ३ | कुलसचिव | सदस्य |
| ४ | राज्यातील सर्व आरोग्य विज्ञानाच्या परिषदांचे अध्यक्ष | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला एक व्यवस्थापन परिषदेचा व एक अधिसभेचा सदस्य. | सदस्य |
| ६ | संचालक, विद्यार्थी कल्याण | सदस्य सचिव |

(१५.३) व्याख्यानमालेचे स्वरुप व आयोजनः

(I) व्याख्यानमाला राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील असेल व त्यामध्ये किमान दोन व्याख्यानांचा समावेश असेल.

(II) वैद्यकीय क्षेत्रातील विविध शाखांचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, अध्यापक, वैद्यकीय व्यावसायिक व वैद्यकीय क्षेत्रातील संशोधक व तज्ञ यांना लाभ होईल या दृष्टीने व्याख्यानमालेचे आयोजन विद्यापीठ मुख्यालय किंवा विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या ठिकाणी करण्यात येईल.

(III) संयोजन समितीच्या निर्णयानुसार व्याख्यानमाला विद्यापीठ मुख्यालय, विद्यापीठ विभागीय केंद्र किंवा एखादया संलग्नीत महाविद्यालयात आयोजित करण्यात येईल किंवा ऑनलाईन स्वरुपात देखील आयोजित करण्यात येईल.

(१५.४) सर्वसाधारणपणे व्याख्यानाचे विषय खालील विषयांशी निगडीत असतील.

(I) सार्वजनिक व सामाजिक आरोग्य;

(II) आरोग्य विज्ञानाचे शिक्षण;

(III) आधुनिक वैद्यकीय उपचार पध्द्ती;

(IV) विविध वैद्यकीय चिकीत्सा पध्द्तीचा समन्वय ;

(V) आरोग्य विज्ञान क्षेत्रातील संशोधन.

(१५.५) तज्ञ व्याख्यात्यांच्या मान्यतेने व्याख्यानानंतर प्रश्न-उत्तरांच्या स्वरुपात एक प्रकट मुलाखत आयोजित करण्यात येईल.

(१५.६) व्याख्यानाच्या विषयास अनुसरुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या ज्या तज्ञ व्याख्यात्यांचा सदर विषयात गाढा व विशेष अभ्यास व कार्य असेल अशा व्याख्यात्यांची निवड संयोजन समिती करेल.

(१५.७) परिस्थितीनुरुप व्याख्यानाचे प्रसारण दृकश्राव्य माध्यमांद्वारे सर्व संलग्नित महाविद्यालयात व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर करण्यात येईल. व्याख्यानमालेस व्यापक स्वरुपात प्रसिध्द्‌ी देण्यात येईल.

(१५.८) संयोजन समितीने निर्धारीत केल्यानुसार तज्ञ व्याख्यातांचे मानधन, स्मृतिचिन्ह व आवश्यक असल्यास मानपत्र देऊन सत्कार करण्यात येईल. तथापी, प्रती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्याख्यात्यांच्या मानधनाची रक्कम अनुक्रमे रु. १५,०००/- व रु.२५,०००/- पेक्षा जास्त नसेल.

(१५.९) प्रवास भत्ता व दैनिक भत्ताः-

(I) विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार तज्ञ व्याख्यात्यांना प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(II) विद्यापीठ नियमानुसार व्यवस्थापन परिषदेच्या पुर्वमान्यतेने राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्याख्यात्यांना विमान प्रवास अनुज्ञेय असेल.

(III) तज्ञ व्याख्यात्याची निवास व्यवस्था विद्यापीठातर्फे करण्यात येईल.

१६) <u>इंद्रधनुष्य</u>

(१६.१) प्रस्तावनाः- विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणारे आरोग्य विद्यापीठाचे विद्यार्थी म्हणजेच भावी डॉक्टरांमध्ये दडलेल्या सुप्त कला गुणांचा विकास करण्यासाठी विद्यापीठातर्फे स्पंदन या सांस्कृतिक कार्यक्रमामधुन अथवा स्वतंत्र निवड चाचणी घेऊन राज्यातील आंतरविद्यापीठ स्तरावर आयोजित केल्या जाणाऱ्या "इंद्रधनुष्य" या राज्यस्तरीय सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी विविध कला प्रकारांसाठी विद्यापीठाचा संघ पाठविण्यात येईल. इंद्रधनुष्य या कार्यक्रमाबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(१६.२) स्पंदन हया विद्यापीठाच्या सांस्कृतिक कार्यक्रमामधील विविध कला प्रकारात पारितोषिक प्राप्त विजेते / विजेते संघ त्यानंतर आयोजित होणाऱ्या राज्यस्तरीय सांस्कृतिक कार्यक्रम इंद्रधनुष्य मध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करतील.

(१६.३) "इंद्रधनुष्य" हया सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागाकरीता सदर कार्यक्रमातील कला प्रकारांकरीता  स्पर्धक, संगीत साथीदार व संघ व्यवस्थापक असे एकुण कमाल ४० स्पर्धकांचा विद्यापीठाचा संघ किंवा सदर कार्यक्रमाच्या नियमावलीत विहित केलेल्या मर्यादेपर्यंतचा संघ पाठविण्यात येईल. विद्यापीठ संघासोबत दोन संघव्यवस्थापक (एक महिला व एक पुरुष) पाठवेल. संघ व्यवस्थापकांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार कुलगुरु यांना असतील.

(१६.४) नामनिर्देशित संघ व्यवस्थापक हे संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या मार्गदर्शनानुसार संघातील सर्व स्पर्धकांचा विहीत नमुन्यातील नोंदणी अर्ज, सांघिक स्पर्धेसाठीचा अर्ज व संघ व्यवस्थापकांची माहिती भरुन आयोजक विद्यापीठास विहित मुदतीत सर्व आवश्यक दस्तऐवजांसह सादर करतील.

(१६.५) इंदधनुष्य कार्यक्रमापुर्वी एक वर्ष कालावधीत जर विद्यापीठाने विद्यापीठस्तरीय स्पंदन या कार्यक्रमाचे आयोजन केले नसेल तर त्यापुर्वी आयोजित केलेल्या स्पंदन या कार्यक्रमातील विजेत्यांना इंद्रधनुष्य कार्यक्रमात विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी पाठविण्याबाबत किंवा इंद्रधनुष्य कार्यक्रमपुर्व महाविद्यालय स्तरावर निवड चाचणीचे आयोजन करुन त्यामधुन इंद्रधनुष्य कार्यक्रमात विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी विद्यापीठाच्या संघाची निवड करण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार विद्यापीठास असेल. इंद्रधनुष्य कार्यक्रमपुर्व महाविद्यालय स्तरावर निवड चाचणी आयोजित करण्याचे प्रस्तावित असल्यास निवड चाचणी घेण्याबाबतचे सर्व नियम व अटी ठरविण्याचे अधिकार देखील विद्यापीठास असतील.

(१६.६) संघ व्यवस्थापकांना व स्पर्धक विद्यार्थ्यांना महत्वाच्या सुचना, सांस्कृतिक पथसंचलनाबाबत सुचना याबाबतची माहिती व नियमावली विद्यापीठाने वेळोवेळी प्रसिध्द केल्यानुसार असेल.

(१६.७) इंद्रधनुष्य कार्यकमाबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

(१६.८) स्पर्धेदरम्यान विद्यार्थी स्पर्धकांना आयोजक विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या नियमांचे व शिस्तीचे अनुपालन करणे बंधनकारक असेल. शिस्तभंग

प्रकरणी चौकशीअंती दोषी आढळलेल्या विद्यार्थी स्पर्धकास शासन करण्याचे विद्यापीठास अधिकार असतील.

(१६.९) इंद्रधनुष्य कार्यक्रमाकरीता जर विद्यापीठ आयोजक असेल तर विद्यापीठ स्तरावर गठित सुकाणु समिती, आयोजन समिती व इतर समित्यांमधील शिक्षक, प्राधिकरण सदस्य व विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी यांना अतिरिक्त कामकाजाचा आर्थिक मोबदला निर्धारीत करण्याचे व अदा करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील व त्यावरील खर्च सदर विद्यापीठस्तरीय स्पंदन या कार्यक्रमाकरीताच्या लेखाशिर्षांतर्गत करण्यात येईल.

(१६.१०) संघ व्यवस्थापकांना विद्यापीठ वेळोवेळी निर्धारीत करेल त्याप्रमाणे मानधन अनुज्ञेय असेल.

(१६.११) प्रवास व दैनिक भत्ता :- आयोजक विद्यापीठात / कार्यक्रमास्थळी येण्या-जाण्याकरीता प्रत्येक सहभागी विद्यार्थी स्पर्धकास, संघ व्यवस्थापकांना व विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी यांना विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या / करण्यात येणाऱ्या नियमांनुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

१७) <u>युवा महोत्सव सहभाग:-</u>

(१७.१) "इंद्रधनुष्य" या राज्यस्तरीय सांस्कृतिक कार्यक्रमात विविध कला स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणारा विजेता / विद्यापीठाचा विजेता संघ राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सवात विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करेल.

(१७.२) त्याव्यतिरीक्त एखादया कला प्रकारात स्पंदन अथवा इतर कार्यक्रमात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांस / संघास युवा महोत्सवात विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी पाठविण्याचे अधिकार विद्यापीठास असतील.

(१७.३) विद्यापीठाच्या संघासोबत विद्यापीठ नामनिर्देशनाने संघ व्यवस्थापकाची नियुक्ती करेल. संघामध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनी या दोघांचा समावेश असल्यास एक पुरुष संघव्यवस्थापक व एक महिला संघ व्यवस्थापकाची नामनिर्देशनाने नियुक्ती करण्याचे अधिकार कुलगुरु यांना असतील.

(१७.४) युवा महोत्सव या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेकरीता विहित केलेल्या नियमांचे व शिस्तिचे पालन करणे विद्यापीठाच्या संघातील स्पर्धक विद्यार्थ्यास बंधनकारक असेल. शिस्तभंग प्रकरणी चौकशीअंती दोषी आढळलेल्या विद्यार्थी स्पर्धकास शासन करण्याचे विद्यापीठास अधिकार असतील.

(१७.५) विद्यापीठाच्या संघातील स्पर्धक विद्यार्थी व संघ व्यवस्थापक यांची स्पर्धेदरम्यान निवास व भोजनाची व्यवस्था आयोजक महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था करेल.

(१७.६) याव्यतिरीक्त युवा महोत्सव या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेकरीता संबंधीत संस्था / प्राधिकरणाने व विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेले नियम बंधनकारक असतील.

(१७.७) संघ व्यवस्थापकांना विद्यापीठ वेळोवेळी निर्धारीत करेल त्याप्रमाणे स्पर्धा कालावधीकरीता मानधन अनुज्ञेय असेल.

(१७.८) प्रवास भत्ताः- विद्यापीठाच्या संघातील स्पर्धक विद्यार्थी व संघ व्यवस्थापक यांना स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

१८) विद्यापीठ आरोग्य बॅंकः-

(१८.१) प्रस्तावनाः- विद्यापीठाच्या स्थापनेचा उद्‌देश विचारात घेता शिक्षण व संशोधनाच्या हेतूने ग्रामीण भागातील रहिवाशांच्या आरोग्याशी निगडीत समस्या जाणुन घेवून व सदर समस्या निवारण्यासाठी जनजागृती करण्याकरीता आरोग्यविषयक विविध विषयांवर मार्गदर्शन, शिक्षण व प्रबोधन करण्याकरिता निवड करण्यात आलेल्या खेडे गांवातील किमान एका सुशिक्षित व्यक्तीस मुलभूत आवश्यक प्रशिक्षण देऊन जेथवर शक्य असेल तेथवर सदर उद्‌देश साध्य करण्यासाठी "विद्यापीठ आरोग्य बॅंक" या योजनेची संकल्पना अस्तित्वात आलेली असुन त्याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(१८.२) विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या क्षेत्रातील खेडे गावांमध्ये सदर गांवाचे सरपंच / पोलिस पाटील यांच्याशी विचारविनियम करुन एका सुशिक्षीत इच्छुक व्यक्तीची मानद स्वरुपात "आरोग्यमित्र" म्हणुन नेमणूक करता येईल. सदर

आरोग्यमित्र हा विद्यापीठाचा कर्मचारी नसेल. त्याच्यामध्ये व विद्यापीठात मालक व नोकर असा संबंध नसेल.

(१८.३) अशाप्रकारे मानद स्वरुपात नियुक्त करावयाच्या आरोग्यमित्राची किमान शैक्षणिक अर्हता १२ वी (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा - एच.एस.सी.) उत्तीर्ण अशी असावी.

(१८.४) तज्ञ प्रशिक्षकांमार्फत आरोग्यमित्रास खालील बाबींच्या अनुषंगाने मुलभुत प्राथमिक प्रशिक्षण देण्यात येईल.

(I) आरोग्यविषयक जनजागृती.

(II) मुलभूत आजारांविषयी प्राथमिक माहिती.

(III) उपचारासंबंधात व आर्थिक मदत मिळविण्यासाठी मार्गदर्शन.

(IV) आजारांच्या उपचारांकरीता राज्य व राष्ट्रीय योजनांची माहिती.

(V) आपत्कालीन परिस्थितीमध्ये मदत व मार्गदर्शन.

(VI) गर्भवती माता व नवजात बालकाची निगा व पोषण आहार याबाबतची माहिती.

(VII) योगा प्रशिक्षण.

(VIII) याव्यतिरिक्त इतर आवश्यक मुलभुत बाबींचा समावेश करण्याचे अधिकार विद्यापीठास असतील.

(१८.५) आरोग्य बॅंक या योजनेंतर्गत माहिती पुस्तिका छपाई, बैठका व दैनिक भत्ता यावरील खर्च, जाहिरात खर्च, प्रथमोपचार पेटी वितरण खर्च, कार्यशाळेचा खर्च तज्ञांचे मानधन वगैरे बाबींकरीता वार्षिक प्रस्तावित खर्च अंदाजपत्रकात नमुद केलेल्या यथोचित लेखाशिर्षांतर्गत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने करण्यात येईल.

अशा प्रकारचा निधी व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (Corporate Social Respocibility) या माध्यमातुन देखील मिळविण्याचा विद्यापीठ प्रयत्न करेल.

(१८.६) प्रशिक्षित आरोग्यमित्रास विद्यापीठाने निर्धारीत केल्यानुसारचे साहित्य असलेली प्रथमोपचार पेटी वगैरे साहित्य विद्यापीठातर्फे देण्यात येईल.

(१८.७) सदर उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकानुसार खर्च अनुज्ञेय असेल. अंदाजपत्रकाव्यतिरिक्त

निकड व आवश्यकता विचारात घेऊन अतिरिक्त खर्चास व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहून मंजुरी देण्याचे अधिकार कुलगुरु यांना असतील.

(१८.८) सदर योजना विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत गावदत्तक योजनेच्या माध्यामातुन कार्यक्रम अधिकाऱ्यांमार्फत देखील राबविली जावू शकते. त्याबाबतचे नियम व अटी स्वतंत्र परिपत्रकान्वये विहीत करण्याचे विद्यापीठास अधिकार असतील.

(१८.९) याव्यतिरिक्त सदर उपक्रमाकरीता विद्यापीठास वेळोवेळी नियम विहित करण्याचे अधिकार असतील.

# प्रकरण क्र. ६ : संशोधन कार्यक्रम व उपक्रम

१९) अविष्कार निवड चाचणी

(१९.१) प्रस्तावनाः- विद्यापीठाशी संलग्नीत आरोग्य विज्ञानाच्या महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांमध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी व संशोधक वृत्तीला चालना मिळावी या उद्‌देशाने मा. राज्यपाल यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ अविष्कार स्पर्धेकरीता विद्यापीठाचा संघ निर्धारीत करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर अविष्कार निवड चाचणीचे आयोजन करण्यात येईल. सदर अविष्कार निवड चाचणी बाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(१९.२) अविष्कार निवड चाचणी ही मा. राज्यपाल यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ अविष्कार स्पर्धेकरीता विद्यापीठाचा संघ निर्धारीत करण्यासाठी घेण्यात येत असल्यामुळे मा. राज्यपाल कार्यालयाने सदर स्पर्धेकरीता वेळोवेळी निर्धारीत केलेले नियम व त्यामधील बदल विचारात घेऊन विद्यापीठ स्तरावर प्रत्येकवर्षी अविष्कार निवड चाचणीचे आयोजन करण्यात येईल.

(१९.३) सदर निवड चाचणी करीता पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, पदव्युत्तर पदवी नंतरचे उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी व शिक्षक अशा चार निर्धारीत गटांमध्ये अविष्कार निवड चाचणी घेण्यात येईल.

(१९.४) अविष्कार निवड चाचणी खाली दिलेल्या सहा संवर्गातील संशोधन प्रकल्पांकरीता किंवा मा. राज्यपाल कार्यालयामार्फत वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा संवर्गातील संशोधन प्रकल्पाकरीता आयोजित करण्यात येईल.

(I) अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभाग (Engineering and Technology)

(II) औषधी द्रव्ये व औषधनिर्माण शास्त्र विभाग (Medicine and Pharmacy)

(III) विज्ञान विभाग (Pure Science)

(IV) मानव्यविद्या, भाषा, ललीत कला व इतर विभाग (Humanitites Language, Fine Art etc. )

(V) शेतकीशास्त्र व पशुसंवर्धन विभाग (Agricultural Sciences and Animal Husbandry)

(VI) वाणिज्य, व्यवस्थापन, विधी व इतर विभाग (Commerce, Management, Law and other Department)

(१९.५) अविष्कार निवड चाचणी आयोजनाबाबत विद्यापीठ परिपत्रक निर्गमित करुन विहित मुदतीत इच्छुक पात्र स्पर्धकांकडुन आवेदन व त्यासोबत त्यांच्या संशोधन प्रकल्पाची संक्षिप्त माहितीची मागणी करेल.

(१९.६) विहित मुदतीत इच्छुक पात्र स्पर्धकांकडुन प्राप्त झालेल्या आवेदन व त्यासोबत प्राप्त झालेल्या संशोधन प्रकल्पांच्या संक्षिप्त माहितीची छाननी करण्याकरीता छाननी समितीचे गठण करण्यात येईल. स्पर्धकाची माहिती व त्यांनी सादर केलेल्या प्रकल्पाची योग्यता व सदर प्रकल्प कोणत्या संवर्गात मोडतो याबाबतची छाननी सदर छाननी समिती करेल. छाननी समितीच्या शिफारशी विचारात घेऊन स्पर्धकास अविष्कार स्पर्धेत सहभागी होण्याची संधी देण्यात यावी किंवा कसे व स्पर्धकाच्या संशोधन प्रकल्पाच्या संवर्गाबाबत विद्यापीठ योग्य तो निर्णय घेईल. सदर निर्णय संबंधीत स्पर्धकास बंधनकारक असेल.

(१९.७) विद्यापीठ निर्धारीत करेल त्याठिकाणी व त्यावेळेत अविष्कार निवड चाचणीचे आयोजन करण्यात येईल.

(१९.८) प्रकल्पासाठी लागणारे संपुर्ण साहित्य व उपकरणे स्पर्धकाने स्वतः आणणे आवश्यक असेल.

(१९.९) प्रकल्प मांडणी करण्याची व विद्युत व्यवस्थेची सोय विद्यापीठामार्फत पुरविण्यात येईल.

(१९.१०) प्रत्येक संवर्गातील प्रकल्पांचे परीक्षण करुन त्यामधुन आवश्यक तेवढया योग्य प्रकल्पांची निवड करण्याकरीता कुलगुरु हे परीक्षक / परीक्षक

मंडळाची नियुक्ती करतील. परीक्षक / परीक्षक मंडळाने प्रकल्प निवडीबाबत घेतलेला निर्णय अंतिम असेल.

(१९.११) अविष्कार निवड चाचणीच्या निर्धारीत दिनांकास सहभागी स्पर्धक, परीक्षक/परीक्षक मंडळातील सदस्य व विद्यापीठाचे संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना चहापान व भोजनाची व्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात येईल.

(१९.१२) अविष्कार निवड चाचणीमध्ये निवड झालेल्या स्पर्धकास विद्यापीठाच्या संघात सहभागी होऊन अविष्कार स्पर्धेसाठी आवश्यक त्या दस्तऐवजांसह निर्धारीत ठिकाणी व वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक असेल. विद्यापीठांतर्गत / राज्यात पी.एच्.डी. अभ्यासक्रम नोंदणी नसणाऱ्या शिक्षकांना मा. राज्यपाल कार्यालयाने निर्धारीत केलेल्या नियमानुसार अविष्कार स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या संघात समाविष्ट करता येणार नाही.

(१९.१३) विद्यापीठ वेळोवेळी निर्धारीत करेल त्याप्रमाणे परीक्षक / परीक्षक मंडळातील सदस्यांना मानधन अनुज्ञेय असेल.

(१९.१४) प्रवास व दैनिक भत्ताः-

(I) अविष्कार निवड चाचणीकरीता प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्याकरीता गठित समितीमधील सदस्यांना, प्रकल्पांची निवड करण्याकरीता नियुक्त परीक्षक / परीक्षक मंडळातील परीक्षकांना व विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी यांना विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(II) अविष्कार निवड चाचणी मध्ये सहभागी स्पर्धकांना प्रवास व दैनिक भत्ता विद्यापीठातर्फे अनुज्ञेय नसेल.

२०) <u>अविष्कार पुर्व प्रशिक्षण शिबीर</u>

(२०.१) प्रस्तावनाः- अविष्कार निवड चाचणी मधुन प्रत्येक संवर्गातुन निवड करण्यात आलेल्या विद्यार्थी, पी.एच्.डी. अभ्यासक्रम नोंदणी असलेल्या व शिक्षक मान्यता असलेल्या शिक्षकांना विद्यापीठाच्या संघात स्थान देण्यात येत असुन ते जे संशोधन प्रकल्प अविष्कार स्पर्धेदरम्यान सादर करणार असतील ते संशोधन प्रकल्प व संशोधनाचे सादरीकरण याबाबत त्यांना तज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन देण्याकरीता अविष्कार स्पर्धापुर्व अविष्कार प्रशिक्षण शिबीराचे आयोजन विद्यापीठ करु शकेल. त्याकरीताचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(२०.२) अविष्कार स्पर्धेसाठी मा. राज्यपाल कार्यालयाने निर्धारीत केलेल्या प्रत्येक संवर्गातुन पदवी, पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदवी पुढील उच्च शिक्षण घेणारा विद्यार्थी व शिक्षक यांच्या संशोधन प्रकल्पांपैकी आवश्यक तेवढया ज्या संशोधन प्रकल्पांची निवड चाचणीदरम्यान निवड करण्यात आलेली असेल त्या सर्व स्पर्धकांना त्यांचे संशोधन प्रकल्प व सादरीकरण या अनुषंगाने मागदर्शन करण्याकरीता संशोधन क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शकांचे कुलगुरु नामनिर्देशन करतील.

(२०.३) विद्यापीठ निर्धारीत करेल त्या दिनांकास व ठिकाणी अविष्कार प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येईल. सदर प्रशिक्षण शिबिरादरम्यान कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले संशोधन क्षेत्रातील तज्ञ विद्यापीठाने अविष्कार स्पर्धेकरीता निवडलेल्या संघातील स्पर्धकांना मार्गदर्शन करतील.

(२०.४) अविष्कार प्रशिक्षण शिबिराच्या निर्धारीत दिनांकास सहभागी स्पर्धक व विद्यापीठाचे संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना चहापान व भोजनाची व्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात येईल.

(२०.५) प्रवास व दैनिक भत्ताः-

(I) प्रशिक्षण शिबिरादरम्यान मार्गदर्शन करण्याकरीता बोलाविण्यात आलेल्या तज्ञांना विद्यापीठ नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

II) अविष्कार पुर्व प्रशिक्षण शिबिरास उपस्थित राहण्यासाठी स्पर्धकांना प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय नसेल.

२१) अविष्कार

(२१.१) विद्यापीठाने अविष्कार स्पर्धेकरीता निवडलेल्या संघातील स्पर्धकांनी अविष्कार स्पर्धा ज्या विद्यापीठात / ठिकाणी आयोजित केलेली असेल त्या ठिकाणी संबंधीत आयोजक विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या दिनांकास व वेळेस उपस्थित राहणे आवश्यक असेल. विद्यापीठाच्या संघासोबत नामनिर्देशनाने दोन संघव्यवस्थापकांची (एक महिला व एक पुरुष) नियुक्ती केली जाईल. संघ व्यवस्थापकांनी स्पर्धेदरम्यान पुर्ण वेळ संघासोबत उपस्थित राहणे बंधनकारक असेल.

(२१.२) स्पर्धेदरम्यान स्पर्धकांनी शिस्तीचे पालन करणे बंधनकारक असेल. शिस्तीचे उल्लंघन केल्यास चौकशीअंती दोषी स्पर्धक विद्यार्थी / शिक्षक शिक्षेस पात्र असेल.

(२१.३) अविष्कार स्पर्धेदरम्यान विद्यापीठाच्या संघातील स्पर्धक व संघव्यवस्थापक यांच्या चहापान, भोजनाची व निवासाची व्यवस्था आयोजक विद्यापीठ करेल.

(२१.४) अविष्कार स्पर्धेकरीता मा. राज्यपाल कार्यालय व मा. राज्यपाल यांनी नियुक्त केलेल्या समितीने वेळोवेळी विहित केलेले नियम बंधनकारक असतील.

(२१.५) प्रवास दैनिक भत्ता, पोस्टर करीता अनुदान व मानधनः-

(I) अविष्कार स्पर्धेकरीता विद्यापीठाच्या संघातील स्पर्धकास अविष्कार प्रशिक्षण शिबिराचे ठिकाणापासुन किंवा त्यांचा ज्या महाविद्यालयात प्रवेश असेल त्या महाविद्यालयाचे ठिकाणापासुन ते अविष्कार स्पर्धा ज्या विद्यापीठात / महाविद्यालयात / ठिकाणी आयोजित असेल त्याठिकाणापर्यंतचे येण्या-जाण्याकरीता विद्यापीठ नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल. तसेच, पोस्टरच्या खर्चापोटी प्रती स्पर्धक रु. ५००/- अनुदान अनुज्ञेय असेल.

(II) अविष्कार स्पर्धेकरीता संघव्यवस्थापक व विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी यांना स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठ नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(III) संघ व्यवस्थापकांना स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठ वेळोवेळी निर्धारीत करेल त्याप्रमाणे स्पर्धा कालावधीकरीता मानधन अनुज्ञेय असेल.

२२) अविष्कार फेलोशिप

(२२.१) राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ अविष्कार स्पर्धेमध्ये निवड झालेल्या पुरस्कार प्राप्त स्पर्धकास मा. राज्यपाल कार्यालयामार्फत वेळोवेळी निर्धारीत केल्याप्रमाणे संशोधनाकरीता अविष्कार फेलोशिप प्रदान करण्यात येईल.

(२२.२) अविष्कार फेलोशिपची रक्कम व त्याबाबतचे नियम हे मा. राज्यपाल कार्यालयामार्फत वेळोवेळी निर्धारीत केल्याप्रमाणे असतील.

(२२.३) अविष्कार स्पर्धा आयोजक विद्यापीठाकडुन निवड झालेल्या पुरस्कार प्राप्त स्पर्धकास अदा करावयाची फेलोशिपची रक्कम प्राप्त झाल्यानंतर सदर विद्यार्थी विद्यापीठाच्या ज्या संलग्नीत महाविद्यालयात शिक्षण घेत असेल त्या महाविद्यालयातील अधिष्ठाता / प्राचार्य व दोन यथोचित शिक्षकांचा समावेश असलेल्या समितीची विद्यापीठ नामनिर्देशनाने मार्गदर्शक तथा निरीक्षक म्हणुन नेमणुक करेल.

(२२.४) अधिष्ठाता / प्राचार्य व दोन यथोचित शिक्षकांच्या समितीने विजेत्या फेलोशिपप्राप्त स्पर्धक विद्यार्थ्याच्या संशोधन कार्याबाबतचा अहवाल विद्यापीठ निर्देशित करेल त्या कालावधीत विद्यापीठास सादर करणे बंधनकारक असेल. विद्यापीठास अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची तपासणी करुन फेलोशिपची रक्कम विद्यापीठ निर्धारीत करेल तेवढया हप्त्यांमध्ये महाविद्यालयाच्या अधिष्ठाता / प्राचार्य यांचे मार्फत संबंधीत स्पर्धक विद्यार्थ्यास अदा करण्यात येईल.

(२२.५) संशोधन कार्य पुर्ण झाल्यानंतर किंवा विद्यापीठाने विहित केलेल्या कालावधीनंतर मार्गदर्शन तथा निरीक्षण करण्याकरीता गठित समिती सदस्यांच्या

स्वाक्षरीने संबंधीत विद्यार्थी त्याबाबतचा पुर्णत्व अहवाल विद्यापीठास सादर करेल. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभाग फेलोशिपच्या रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) तयार करेल व सदर प्रमाणपत्र विद्यार्थी कल्याण विभागामार्फत संबंधीत विद्यापीठास सादर करण्यात येईल.

२३) <u>अन्वेषण</u>

(२३.१) राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ अविष्कार स्पर्धेतुन निवड झालेले पुरस्कार प्राप्त स्पर्धक विद्यार्थी अन्वेषण या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करतील.

(२३.२) विद्यापीठाच्या संघासोबत विद्यापीठ नामनिर्देशनाने संघ व्यवस्थापकाची नियुक्ती करेल. संघामध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनी या दोघांचा समावेश असल्यास एक पुरुष संघव्यवस्थापक व एक महिला संघ व्यवस्थापकाची नियुक्ती करेल.

(२३.३) अन्वेषण या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेकरीता विहित केलेल्या नियमांचे व शिस्तिचे पालन करणे विद्यापीठाच्या संघातील स्पर्धक विद्यार्थ्यास बंधनकारक असेल.

(२३.४) विद्यापीठाच्या संघातील स्पर्धक विद्यार्थी व संघ व्यवस्थापक यांची स्पर्धेदरम्यान निवास व भोजनाची व्यवस्था आयोजक महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था करेल.

(२३.५) प्रवास व दैनिक भत्ताः- विद्यापीठाच्या संघातील स्पर्धक विद्यार्थी व संघ व्यवस्थापक यांना स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(२३.६) संघ व्यवस्थापकांना विद्यापीठ वेळोवेळी निर्धारीत करेल त्याप्रमाणे स्पर्धा कालावधीकरीता मानधन अनुज्ञेय असेल.

(२३.७) याव्यतिरीक्त अन्वेषण या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेकरीता संबंधीत संस्था / प्राधिकरणाने व विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेले किंवा करण्यात येणारे नियम बंधनकारक असतील.

## प्रकरण क्र. ७ : रॅगिंग प्रतिबंध व विद्यार्थी परिषद

२४) <u>रॅगिंग विरोधी समिती व उपक्रम</u>

(२४.१) प्रस्तावनाः- विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थांमध्ये रॅगिंगच्या घटना घडु नयेत याकरीता मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला न्यायनिवाडा, विश्वविद्यालय अनुदान आयोग, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली, व इतर यथोचित प्राधिकणांनी दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे अनुपालन करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने रॅगिंग विरोधी जागरुकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्याकरीता व रॅगिंगची घटना घडल्यास करावयाची कार्यवाही संक्षिप्त स्वरुपात विहित करण्याच्या उद्देशाने याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(२४.२) विद्यापीठाशी संलग्नीत प्रत्येक महाविद्यालयाने व मान्यताप्राप्त संस्थेने त्यांच्या महाविद्यालयात रॅगिंगच्या घटना रोखण्यासाठी "रॅगिंग प्रतिबंधक समिती" स्थापन करावी. अशा प्रकारे गठित रॅगिंग प्रतिबंधक समितीच्या सदस्यांची नांवे, भ्रमणध्वनी क्रमांक व इतर आवश्यक माहिती दरवर्षी विद्यापीठास सादर करणे अनिवार्य असेल.

(२४.३) रॅगिंग प्रतिबंधक समितीच्या सदस्यांची नांवे व भ्रमणध्वनी क्रमांक याबाबतचा फलक महाविद्यालयात दर्शनी भागात लावावा.

(२४.४) रॅगिंगच्या घटना रोखण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्रमांक ८८७/२००९ मध्ये दिनांक ११/०२/२००९ रोजीच्या निर्णयान्वये दिलेले निर्देश, विश्वविद्यालय अनुदान आयोग, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली व इतर यथोचित प्राधिकरणांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे, नियमांचे व सुचनांचे काटेकोरपणे अनुपालन करणे सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांना बंधनकारक असेल. असे निर्देश, नियम व सुचना विद्यापीठ वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करुन त्याच्या प्रती सर्व संलग्नीत महाविद्यालयांना व मान्यताप्राप्त संस्थांना उपलब्ध करुन देईल.

(२४.५) रॅगिंगच्या घटना रोखण्यासाठी व त्याबाबत विद्यार्थी व समाजात जागरुकता निर्माण करण्यासाठी विद्यापीठ विविध प्रकारची भित्तीपत्रके मुबलक प्रमाणात छापुन दरवर्षी सर्व संलग्नीत महाविद्यालयांना व मान्यताप्राप्त संस्थांना उपलब्ध करुन देईल.

(२४.६) रॅगिंगच्या घटना रोखण्यासाठी व त्याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी विद्यापीठ वेळोवेळी विद्यापीठस्तरावर, विद्यापीठाच्या विभागीय केंद्राचे ठिकाणी अथवा संलग्नीत महाविद्यालयांच्या ठिकाणी रॅगिंग प्रतिबंधक समितीच्या सदस्यांकरीता व विद्यार्थ्यांकरीता मार्गदर्शनपर एक दिवसीय कार्यशाळेचे / व्याख्यानाचे आयोजन करेल. अशा कार्यशाळांकरीता तज्ञ मार्गदर्शकांचे मानधन, उपस्थितांचा चहापान व भोजन खर्च, तज्ञ मार्गदर्शक, विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी यांचा निवासाचा खर्च, प्रवास व दैनिक भत्ता व अनुषंगिक इतर सर्व प्रशासकीय खर्च विद्यापीठ करेल.

(२४.७) रॅगिंगच्या घटना रोखण्यासाठी व त्याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी कुलगुरु व विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद वेळोवेळी निर्देशित करेल त्याप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. सदर कार्यक्रमांच्या प्रस्तावित खर्चास विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्यात येऊन मान्यतेनुसार खर्च अनुज्ञेय असेल.

(२४.८) विद्यापीठाने संलग्नीत महाविद्यालयांना व मान्यताप्राप्त संस्थांना उपलब्ध करुन दिलेली भित्तीपत्रके व रॅगिंगविरोधी तरतुदी याबाबतची माहिती महाविद्यालय व रुग्णालयाच्या आवारात विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येतील अशा ठिकाणी दर्शनी भागात लावावीत. प्रत्येक संलग्नीत महाविद्यालयात आरोग्य विज्ञानाच्या अभ्यासक्रमास नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची बैठक आयोजित करुन त्यांना रॅगिंग विरोधी नियमांची माहिती दयावी व रॅगिंग प्रतिबंधक समितीची ओळख करुन दयावी. तसेच, प्रत्येक शैक्षणिक वर्षात किमान तीन वेळा रॅगिंग प्रतिबंधक समितीची बैठक घेऊन बैठकीचे इतिवृत्त तयार करुन अभिलेखात ठेवावे.

(२४.९) रॅगिंग संबंधी विद्यार्थ्याकडुन लेखी अथवा मौखिक तक्रार प्राप्त होताच महाविद्यालय प्रमुखाने (अधिष्ठाता / प्राचार्य) सदर तक्रारीची तात्काळ दखल घ्यावी. त्याव्यतिरिक्त रॅगिंगचा प्रकार शिक्षक अथवा महाविद्यालयातील कुणाही कर्मचाऱ्याच्या निदर्शनास आल्यास तो तात्काळ महाविद्यालय प्रमुखास कळवावा. अशा प्रकारे तक्रार अथवा रॅगींगची माहिती प्राप्त झाल्यास महाविद्यालय प्रमुख तात्काळ रॅगिंग प्रतिबंधक समितीची बैठक आयोजित करेल.

(२४.१०) रॅगिंगच्या गंभीर घटनेबाबत महाविद्यालय प्रमुखाने (अधिष्ठाता / प्राचार्य) तात्काळ नजिकच्या पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करावी व त्याबाबत विद्यापीठास अवगत करावे.

(२४.११) रॅगिंगच्या घटनेबाबत महाविद्यालय स्तरावरील रॅगिंग प्रतिबंधक समिती तात्काळ अशा प्रकरणाची सखोल चौकशी करुन निरीक्षणे व शिफारशींचा अहवाल महाविद्यालय प्रमुखास सादर करेल.

(२४.१२) रॅगिंगच्या घटनेबाबत महाविद्यालय स्तरावरील रॅगिंग प्रतिबंधक समितीने केलेल्या चौकशीच्या अहवालातील शिफारशीनुसार महाविद्यालय प्रमुख (अधिष्ठाता / प्राचार्य) तात्काळ कार्यवाही करेल व केलेल्या कार्यवाही बाबत चौकशी अहवालाच्या प्रतीसह विद्यापीठास अवगत करेल.

(२४.१३) रॅगिंगच्या घटनेबाबत चौकशी करतांना, चौकशीचा अहवाल तयार करतांना व सदर अहवालानुसार कार्यवाही करतांना प्रत्येक संबंधीताने त्याबाबतचा कायदा, नियम, निर्देश व सुचना यांचे अनुपालन करावे.

(२४.१४) कुलगुरु विद्यापीठ स्तरावर रॅगिंग प्रतिबंधक समितीचे नामनिर्देशनाने गठण करतील. संलग्नीत महाविद्यालय / मान्यता प्राप्त संस्थेमध्ये घडलेली रॅगिंगची घटना, घटनेची महाविद्यालयाच्या रॅगिंग प्रतिबंधक समितीने अथवा विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीने केलेली चौकशी व चौकशी अहवालानुसार केलेली कार्यवाही याबाबत सदर समितीच्या बैठकीत चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल. महाविद्यालय / संस्था स्तरावर झालेली चौकशी व चौकशी अहवालानुसार करण्यात आलेली कार्यवाही योग्य असल्याची विद्यापीठ स्तरीय रॅगींग प्रतिबंधक समितीची खात्री झाल्यास अशा कार्यवाहीची समिती नोंद

घेईल. रॅगिंगच्या घटना रोखण्यासाठी व त्याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम व कार्यक्रम यांच्या आयोजनाबाबत सदर समितीच्या बैठकीत चर्चा करुन नियोजन करण्यात येईल.

(२४.१५) संलग्नीत महाविद्यालय / मान्यता प्राप्त संस्थेमध्ये रॅगिंगच्या घटनेची योग्य दखल घेतली गेली नसल्यास किंवा योग्य प्रकारे चौकशी झाली नसल्यास किंवा चौकशी अंती यथोचित कार्यवाही झाली नसल्याची खात्री झाल्यास अथवा महाविद्यालयातील रॅगींग प्रतिबंधक समितीने केलेल्या चौकशी व्यतिरिक्त चौकशी केली जावी अशी कुलगुरु यांची धारणा असल्यास अशा प्रकरणी कुलगुरु सदर घटनेच्या चौकशी करीता स्वतंत्र समितीचे गठण करतील. सदर चौकशी समितीमध्ये विद्यापीठस्तरीय रॅगिंग प्रतिबंधक समितीचा किमान एक सदस्य असेल.

(२४.१६) कुलगुरु यांनी गठित केलेली समिती प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन तक्रारदार, गैरतक्रारदार, महाविद्यालय प्रमुख व सर्व संबंधीत शिक्षक व विद्यार्थी यांची चौकशी करुन निरिक्षणे व शिफारशींचा अहवाल कुलगुरु यांना सादर करेल. सदर चौकशी योग्य प्रकारे झालेली आहे व अहवालातील निरिक्षणे व शिफारशी योग्य असल्याबाबत कुलगुरु यांची खात्री झाल्यास सदर अहवाल स्विकारुन त्यामधील शिफारशींच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करणेबाबत महाविद्यालय प्रमुखास व सर्व संबंधीतांस तात्काळ निर्देशित करण्यात येईल. अशा प्रकरणी निर्देशांचे अनुपालन न झाल्यास दोषींवर/ कसुरदारांवर यथोचित कारवाई करण्याचे कुलगुरु यांना अधिकार असतील.

(२४.१७) कुलगुरु यांनी गठित केलेल्या चौकशी समितीतील सदस्यांना विद्यापीठ नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(२४.१८) रॅगिंगच्या घटनेबाबत विद्यार्थी अथवा यथोचित प्राधिकरणाकडुन विद्यापीठास तक्रार प्राप्त झाल्यास अशा तक्रारीची महाविद्यालय स्तरावर त्वरीत चौकशी करण्याचे निर्देश देण्याचे अथवा तक्रार गंभीर स्वरुपाची असल्यास विद्यापीठ स्तरावरील चौकशी समितीचे गठण करण्याचे कुलगुरु यांना अधिकार असतील.

(२४.१९) रॅगिंगच्या घटनेबाबत प्रकरणपरत्वे अथवा घटनेचे गांभिर्य विचारात घेऊन उपरोक्त नियमांव्यतिरिक्त योग्य ती दखल घेण्याचे व कार्यवाही करण्याचे कुलगुरु यांना अधिकार असतील.

२५) <u>विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवडणुक व विद्यार्थी परिषदेची कार्यशाळा</u>

(२५.१) प्रस्तावनाः- विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थेत आरोग्य विज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसीत व्हावा, विद्यार्थ्यांना त्यांच्या समस्या यथोचित प्राधिकरणांकडे मांडता याव्यात तसेच, विद्यार्थी व विद्यापीठ यांच्यामध्ये समन्वय राहावा या उद्देशाने विद्यार्थी परिषदेचे गठण करण्यात येऊन त्यांना मार्गदर्शन करण्याकरीता कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे. त्याबाबत नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(२५.२) विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयात विद्यार्थी परिषदेचे (Student Council) गठण करण्यात येईल. त्याबाबतचे नियम विद्यापीठाने अध्यादेशाद्वारे प्रख्यापीत केल्यानुसार असतील. विद्यार्थी परिषदेच्या गठणाबाबतची माहिती विहित मुदतीत व नमुन्यात विद्यापीठास सादर करणे आवश्यक असेल.

(२५.३) महाविद्यालयाकडुन विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या माहितीवरुन विद्यापीठ अध्यादेशात विषद केल्यानुसार विद्यापीठ स्तरावर "विद्यापीठ विद्यार्थी परिषद" गठित करण्यात येईल.

(२५.४) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे गठण, कालावधी, निवडणुक प्रक्रिया, कर्तव्ये व जबाबदारी, बैठका याबाबतचे नियम विद्यापीठ अध्यादेशात विहित केल्यानुसार असतील.

(२५.५) विद्यापीठ अध्यादेशातील नियमांचा अर्थ लावणे, ज्या बाबींविषयी नियम विहित नाहीत त्याबाबींविषयी नियम विहित करणे व विहित नियमांचा विस्तार करणारे अतिरिक्त नियम परिपत्रकान्वये विहित करण्याचा कुलगुरु यांना अधिकार असेल.

विद्यार्थी परिषद कार्यशाळा

(२५.६) विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेच्या जेथवर व्यवहार्य असेल तेथवर एका शैक्षणिक वर्षातुन किमान एका कार्यशाळेचे विद्यापीठ आयोजन करेल.

(२५.७) अशा कार्यशाळांचे स्थळ व वेळ निर्धारीत करण्याचा अधिकार कुलगुरु यांना असेल. तसेच, आवश्यकता भासल्यास अशा कार्यशाळेंकरीता सर्व संलग्नीत महाविद्यालयाच्या गठित विद्यार्थी परिषदेच्या सचिवांना देखील आमंत्रित करण्यात येईल.

(२५.८) अशी कार्यशाळा एक दिवसीय असेल व विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी, विद्यापीठ प्राधिकरणाचे सदस्य व तज्ञांमार्फत विद्यार्थी कल्याणाच्या योजना, रॅगिंग प्रतिबंधक उपाययोजना, परीक्षा पध्दती, विविध बाबींविषयी समुपदशेन, अभ्यासक्रमातील बदल वगैरे बाबींविषयी सदर कार्यशाळेंद्वारे मार्गदर्शन करण्यात येईल.

(२५.९) अशा कार्यशाळेकरीता चहापान व भोजनाची व्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात येईल.

(२५.१०) अशा कार्यशाळेत मार्गदर्शन करण्याकरीता येणाऱ्या प्राधिकरण सदस्य, तज्ञ किंवा अधिकाऱ्यांची नांव / नांवे निर्धारीत करण्याचे अधिकार विद्यापीठास असतील. विद्यापीठ अधिकारी व प्राधिकरणाच्या सदस्यांव्यतिरिक्त इतर बाहय तज्ञांना मानधन देण्याचे व ते निर्धारीत करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(२५.११) प्रवास भत्ता व दैनिक भत्ता :-

(I) अशा कार्यशाळेच्या ठिकाणी येण्या-जाण्याकरीता विद्यार्थी परिषदेचे पदाधिकारी व सदस्यांना विद्यापीठ नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(II) विद्यापीठ अधिकारी व कर्मचारी तसेच कार्यशाळेस मार्गदर्शन करण्याकरीता आमंत्रित प्राधिकरणाचे सदस्य / तज्ञांना विद्यापीठ नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

# प्रकरण क्र. ८ : राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.)

२६) राष्ट्रीय सेवा योजना, अंशदान/शुल्क व अनुदान वाटप

(२६.१) प्रस्तावनाः- महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगिण व्यक्तीमत्व विकास घडवुन आणण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या युवा कल्याण, विकास व क्रीडा मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना राबविण्यात येते. राष्ट्रीय सेवा योजना संहितेमध्ये नमुद नियमांव्यतिरिक्त आवश्यक ते विद्यापीठस्तरीय नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(२६.२) विद्यापीठांतर्गतच्या सर्व राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककांना राष्ट्रीय सेवा योजनेचे तत्वज्ञान, उद्दिष्टे, नियमित कार्यक्रम, विशेष शिबिर कार्यक्रम, प्रशासकीय संरचना, कार्यक्रमाचे नियोजन, कार्यक्रमांची अंमलबजावणी, प्रशिक्षण, अभिमुखता, संशोधन आणि मुल्यांकन, वित्त व लेखे, याबाबतचे नियम भारत सरकारच्या युवा कल्याण, विकास व क्रीडा मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या "राष्ट्रीय सेवा योजना संहिता-२००६" व त्यामध्ये होणाऱ्या वेळोवेळीच्या सुधारणा व बदल जसेच्या तसे लागु असतील.

(२६.३) विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांना राज्य शासनाच्या राष्ट्रीय सेवा योजना मंत्रालयांतर्गत मंजुर केलेल्या विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत अनुदानित एककांचे वाटप करण्याचे अधिकार कुलगुरु यांना असतील. महाविद्यालयाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेनुसार त्या महाविद्यालयाला दयावयाच्या एककातील विद्यार्थी स्वयंसेवकांची संख्या निर्धारीत करण्याचे अधिकार कुलगुरु यांना असतील.

(२६.४) राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्दिष्टपुर्ती करीता केंद्र व राज्य शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या उद्दिष्टपुर्तीचे कामकाज त्याअनुषंगीक नियमांच्या आधीन राहुन महाविद्यालयातील एककाने करणे बंधनकारक असेल.

(२६.५) संलग्नीत महाविद्यालयाला मंजुर करण्यात आलेल्या एककाच्या विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत विद्यार्थी स्वयंसेवकांची निवड करण्याची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाच्या कार्यक्रम अधिकाऱ्याची असेल. कार्यक्रम अधिकाऱ्याचे अधिकार,

जबाबदाऱ्या व कर्तव्ये "राष्ट्रीय सेवा योजना संहिता -२००६" मध्ये विहित केल्याप्रमाणे असतील.

(२६.६) विद्यापीठ स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेकरीता एक विद्यापीठ सल्लागार समिती असेल. अशा समितीचे गठण, बैठका, मर्यादा, अधिकार व कर्तव्ये "राष्ट्रीय सेवा योजना संहिता-२००६" मध्ये विहित केल्याप्रमाणे असतील.

(२६.७) राज्य शासनामार्फत विद्यापीठास प्राप्त होणारी राष्ट्रीय सेवा योजनेच्या अनुदानाची रक्कम (नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर या करीता विद्यापीठास मंजुर स्वयंसेवक संख्येनुसार) संबंधीत महाविद्यालयांना राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गतच्या नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरांकरीता शासनाच्या नियमांनुसार विद्यापीठामार्फत वाटप करण्यात येईल.

(२६.८) महाविद्यालयाकडुन प्राप्त होणारी अंशदानाची रक्कम व राज्य शासनामार्फत प्राप्त होणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेकरीता विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद निर्धारीत करेल अशा राष्ट्रीयकृत बँकेत विद्यापीठाची एक किंवा दोन स्वतंत्र खाते असतील. अशा बँक खात्यांचा स्वतंत्र हिशेब ठेवण्यात येईल व लेखा परिक्षण करवुन घेण्यात येईल.

(२६.९) राष्ट्रीय सेवा योजना एककांना अनुदानाचे वितरण, बँक खाते व अनुदान वाटपाचा हिशेब ठेवणे व त्याबाबतचे स्वतंत्र लेखापरिक्षण विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी यांच्या मागर्दशनानुसार "राष्ट्रीय सेवा योजना संहिता २००६" मधील नियमांनुसार करण्यात येईल.

(२६.१०) महाविद्यालयांनी "राष्ट्रीय सेवा योजना संहिता-२००६" मध्ये अंतर्भुत नियमांनुसार व विद्यापीठाच्या निर्देशानुसार नियमित कार्यक्रम राबविणे व विशेष शिबिराचे आयोजन करणे व त्याकरीता विहित मर्यादेत खर्च करणे बंधनकारक असेल. अशा प्रकारे राबविलेल्या नियमित कार्यक्रम व आयोजित केलेल्या विशेष शिबिराकरीता करण्यात आलेल्या खर्चाचा सनदी लेखापालाकडुन तयार केलेला लेखा परिक्षण अहवाल विद्यापीठास विहीत मुदतीत सादर करणे बंधनकारक असेल. मंजुर रक्कम व विहित खर्चाव्यतिरिक्त नियमित कार्यक्रम

किंवा विशेष शिबिरास करण्यात आलेल्या अतिरिक्त खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय नसेल.

(२६.११) जी एकके राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर कार्यक्रम राबविणार नाहीत, नियमांशी किंवा ध्येयधोरणांशी विसंगत कामकाज करीत असतील किंवा अंशदानाची/शुल्काची रक्कम विद्यापीठास विहित मुदतीत जमा करणार नाहीत अशा महाविद्यालयाला मंजुर करण्यात आलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे अनुदानित एकक काढुन घेण्याचे किंवा यथोचित शास्ती करण्याचे कुलगुरु यांना अधिकार असतील.

(२६.१२) विद्यापीठातर्फे ज्या महाविद्यालयांना राष्ट्रीय सेवा योजनेचे अनुदानित एकक मंजुर करण्यात आलेले असेल अशा महाविद्यालयांना सदर एककाकरीता राष्ट्रीय सेवा योजना संहिता-२००६ मधील नियम, सदर नियमात वेळोवेळी होणारे बदल, केंद्रशासन, राज्यशासन व विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजनेबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक असेल.

२७) राष्ट्रीय सेवा योजना ( स्वयंनिर्वाह एकक)

(२७.१) प्रस्तावनाः- राष्ट्रीय सेवा योजना ही विविध उपक्रमाद्वारे सामाजिक सेवेतुन विद्यार्थ्यांचा परीपुर्ण विकास करणारी एकमेव योजना असल्यामुळे सदर योजनेत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा या दृष्टीकोनातुन राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार स्वयंनिर्वाह राष्ट्रीय सेवा योजना एककांची स्थापना झालेली असुन त्याकरीता अतिरिक्त नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(२७.२) राष्ट्रीय सेवा योजनेच्या तत्वप्रणालीस अनुसरुन स्वयंनिर्वाह एककाची कार्यप्रणाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या संहितेनुसार असेल.

(२७.३) विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांना राज्य शासनाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंनिर्वाह एककाचे वाटप करण्याचे अधिकार कुलगुरु यांना असतील. महाविद्यालयाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेनुसार त्या महाविद्यालयाला दयावयाच्या एककातील विद्यार्थी संख्या निर्धारीत करण्याचे अधिकार कुलगुरु यांना असतील.

(२७.४) राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्दिष्टपुर्ती करीता केंद्र व राज्य शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या उद्दिष्टपुर्तीचे कामकाज त्याअनुषंगीक नियमांच्या अधिन राहुन महाविद्यालयातील स्वयंनिर्वाह एककाने करणे बंधनकारक असेल.

(२७.५) संलग्नीत महाविद्यालयाला मंजुर करण्यात आलेल्या एककाच्या विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत विद्यार्थी स्वयंसेवकांची निवड करण्याची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाच्या कार्यक्रम अधिकाऱ्याची असेल. कार्यक्रम अधिकाऱ्याचे अधिकार, जबाबदाऱ्या व कर्तव्ये "राष्ट्रीय सेवा योजना संहिता -२००६" मध्ये विहित केल्याप्रमाणे असतील.

(२७.६) विद्यापीठांतर्गत सर्व संलग्नीत महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याकडुन अंशदानाची/शुल्काची रक्कम प्रती विद्यार्थी प्रती वर्ष शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार असेल. अशी रक्कम संबंधीत महाविद्यालतील कार्यक्रम अधिकाऱ्याने जमा करुन महाविद्यालयाच्या अधिष्ठाता / प्राचार्य यांचे मार्फत एकत्रित रक्कमेचा धनाकर्ष विद्यापीठास प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबर पावेतो विद्यापीठास सादर करणे बंधनकारक असेल. सदर शुल्क विद्यापीठाने "राष्ट्रीय सेवा योजना-स्वयंनिर्वाह एकक" या शिर्षकाखाली जमा करावी.

(२७.७) याव्यतिरिक्त नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर राबविणे करीता स्वयंनिर्वाह एककास प्रतीवर्ष प्रती विद्यार्थी दयावयाचे अनुदान, प्रशासकीय/कार्यालयीन खर्च, स्वयंनिर्वाह एककाचा लेखा परिक्षण अहवाल, कार्यालयीन साहित्य खरेदीसाठी विद्यापीठाने वापरावयाचा निधी वै. बाबींविषयक नियम शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी विहित केल्यानुसार असतील.

(२७.८) स्वयंनिर्वाह एककांना दयावयाची अनुदानाची रक्कम निर्धारित करण्याचे अधिकार विद्यापीठास असतील. अनुदानाच्या रक्कमेव्यतिरिक्त नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर कार्यक्रम यावर होणारा खर्च संबंधीत महाविद्यालयास करावा लागेल.

(२७.९) स्वयंनिर्वाह एककांतर्गत राबविण्याचे नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर, त्याकरीताचा खर्च, खर्चाचे लेखा परिक्षण, अनुदानाच्या रक्कमेचा विनीयोग याबाबतचे नियम अनुदानित राष्ट्रीय सेवा योजना एककांबाबत नियमात विहित केल्याप्रमाणे असतील.

(२७.१०) जी एकके राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर कार्यक्रम राबविणार नाहीत किंवा अंशदानाची/शुल्काची रक्कम विद्यापीठास विहित मुदतीत जमा करणार नाहीत अशा महाविद्यालयाला मंजुर करण्यात आलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंनिर्वाह एकक काढुन घेण्याचे किंवा यथोचित शास्ती करण्याचे कुलगुरु यांना अधिकार असतील.

(२७.११) विद्यापीठातर्फे ज्या महाविद्यालयांना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंनिर्वाह एकक मंजुर करण्यात आलेले असेल अशा महाविद्यालयांना सदर एककाकरीता राष्ट्रीय सेवा योजना संहिता-२००६ मधील नियम, सदर नियमात वेळोवेळी होणारे बदल, केंद्रशासन, राज्यशासन व विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजनेबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक असेल.

# प्रकरण क्र. ९ : माजी विद्यार्थी संघ

२८) विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ

(२८.१) विद्यापीठाचा एक नोंदणीकृत "विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ" असेल.

(२८.२) अनुभवांचे आदान-प्रदान, ज्ञानवर्धन, संशोधनवृत्तीत वाढ व जोपासना, सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविणे, निधीची उभारणी व विनियोग, उद्‌देशपुर्ती करीता आवश्यक ती साधने व सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे/ खरेदी करणे, दान / विश्वस्त व्यवस्था / मृत्युपत्र याद्वारे चल / अचल संपत्ती धारण करणे, बैठका, विविध कार्यक्रम व उपक्रम आयोजित करणे वगैरे विद्यापीठाने निर्धारित केल्याप्रमाणे योग्य त्या उद्‌देशांकरीता सदर संघ कार्यरत असेल.

(२८.३) सदर नियमावली लागु झाल्याच्या दिनांकापासुन पुढे विद्यापीठाच्या पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी, फेलोशिप किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम, एम्. फील किंवा पी.एच्.डी. अभ्यासक्रमाच्या अंतिम परीक्षेस प्रवेशित विद्यार्थी जेव्हा पदवी प्रमाणपत्राकरीता अर्ज करेल त्यावेळी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघाच्या सभासदत्वाचा देखील अर्ज करु शकेल व सभासदत्वाच्या अर्जासोबत निर्धारित रक्कम रु. ५००/- (रुपये पाचशे मात्र) शुल्क जमा करेल. असे शुल्क जमा करणाऱ्या विद्यार्थ्यांची विद्यापीठ "विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ" याकरीताच्या प्रयोजनासाठीच्या नोंदवहित नोंद करेल.

(२८.४) नोंदणी शुल्कात वेळोवेळी बदल करण्याचे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असतील व ते परिपत्रकान्वये प्रख्यापीत करण्यात येईल. असे परिपत्रक उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येईल.

(२८.५) विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थेमधुन आरोग्य विज्ञानाचा अभ्यासक्रम पुर्ण करेल अशा विद्यार्थ्यास केवळ ऐकवेळसच नोंदणी करावी लागेल. उदा. पदवीची परीक्षा उत्तिर्ण होतांना पदवी प्रमाणपत्राच्या अर्जासोबत संघाच्या नोंदणीचा अर्ज भरुन नोंदणी झाल्यानंतर अशा विद्यार्थ्याने पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतला व पदव्युत्तर

पदवीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यास नव्याने नोंदणी करणे आवश्यक नसेल. तथापि, पदवी अभ्यासक्रम इतर विद्यापीठातुन पुर्ण केलेला असेल व विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास फेलोशिप किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम, एम्. फील किंवा पी.एच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास नोंदणी करता येईल.

(२८.६) उक्त नियमावली लागु होण्यापुर्वी ज्या विद्यार्थ्यांनी या विद्यापीठांतर्गत पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी, फेलोशिप किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम, एम्. फील किंवा पी.एच्.डी. अभ्यासक्रम पुर्ण केला असेल अशा विद्यार्थ्यांना "विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ" याकरीता ऑनलाईन नोंदणीसाठी विद्यापीठ संकेतस्थळावर लिंक उपलब्ध असेल. असे विद्यार्थी अशा लिंकवर अर्ज भरुन, आवश्यक ते दस्तऐवज सादर करुन व निर्धारीत शुल्क जमा करुन नोंदणी करु शकतील. अशाप्रकारे नोंदणीबाबत जागरुकतेकरीता विद्यापीठ राज्यातील डॉक्टर्सची नोंदणी करणाऱ्या परिषदा, महाविद्यालये व विद्यापीठे यांना कळवेल व मुबलक प्रसिध्दी देईल.

(२८.७) विद्यापीठ माजी विद्यार्थी संघाची पहिली कार्यकारी समिती कुलगुरु नामनिर्देशनाने गठित करतील व तिचा कार्यकाळ गठण झाल्यापासुन तीन वर्षांचा असेल. त्यानंतर दर तीन वर्षांनी किंवा संघ नोंदणीच्या घटनेत नोंद असेल त्या कालावधीनंतर निवडणुकीद्वारे संघाच्या कार्यकारी समितीचे गठण होईल. सदर निवडणुकीकरीता विद्यापीठाचे कुलसचिव हे निवडणुक निर्णय अधिकारी असतील.

(२८.८) कार्यकारी समितीमध्ये मा. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेल्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व अधिसभेचा प्रत्येकी एक सदस्य कार्यकारी समिती सदस्य असतील व संचालक, विद्यार्थी कल्याण हे पदसिध्द् सदस्य असतील.

(२८.९) सदर संघाच्या नोंदणीच्या घटनेत संघाचे नांव, कार्यकक्षा, उद्देश सभासद नोंदणी, नोंदणी शुल्क व वार्षिक शुल्क, कार्यकारी समितीचे गठण, निवडणुकीची पध्दती, कार्यकारी समितीचे अधिकार व कर्तव्ये, निष्कासन, बरखास्ती वगैरे नोंदणीकरीताच्या आवश्यक तरतुदींचा समावेश असेल.

(२८.१०) सभासद नोंदणी व वार्षिक शुल्काच्या जमा होणाऱ्या निधीतुन संघाच्या उद्देशपुर्तीकरीता संघाच्या कार्यकारी समितीच्या व विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयांनुसार विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ कार्यक्रम व उपक्रम राबवेल.

२९) <u>महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ</u>

(२९.१) विद्यापीठाशी संलग्नीत प्रत्येक महाविद्यालयात व मान्यताप्राप्त संस्थेमध्ये (जेथे पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविले जातात) नोंदणीकृत "माजी विद्यार्थी संघ" असेल व अशा महाविद्यालय किंवा संस्थेमधुन आरोग्य विज्ञानाची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी घेतलेले विद्यार्थी सदर संघाचे सभासद होण्यास पात्र असतील.

(२९.२) सदर संघाचे उद्देश हे विद्यापीठ माजी विद्यार्थी संघाच्या उद्देशांशी साधर्म्य असणारे असतील. तसेच, सदर संघाच्या कार्यकारी समितीमध्ये कुलगुरु नामनिर्देशित एक सदस्य असणे आवश्यक असेल.

(२९.३) महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे सभासद नोंदणी शुल्क प्रती विद्यार्थी रु. ५००/- (रुपये पाचशे मात्र) पेक्षा जास्त नसावे व वार्षिक शुल्क असल्यास ते त्यापेक्षा कमी असावे.

(२९.४) महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाची नोंदणी झाल्यानंतर माजी विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याची पध्दत, संघाच्या पहिल्या कार्यकारी मंडळाचे गठण, निवडणुकीची पध्दत, कार्यकारी समितीचे अधिकारी व कर्तव्ये, सदस्यांचे निष्कासन बाबतचे नियम घटनेत विहित केल्याप्रमाणे असतील.

# प्रकरण क्र. १० : समन्वयक

३०) <u>क्रीडा समन्वयक</u>

(३०.१) प्रस्तावनाः- विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपुर्ण महाराष्ट्र राज्य असुन विविध क्रीडा स्पर्धांचे नियोजन करण्याकरीता त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची आवश्यकता विचारात घेता संलग्नीत महाविद्यालयातील क्रीडा शिक्षकाची मानद व सावधी स्वरुपात तात्पुरती विभागीय क्रीडा समन्वयक म्हणुन निवड व नियुक्ती करुन त्यांच्या माध्यमातुन अशा विविध क्रीडास्पर्धांचे नियोजन करवुन घेण्याच्या उद्देशाने त्याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(३०.२) विविध क्रीडा स्पर्धांच्या अनुषंगाने वेळोवळी निर्देशित केल्यानुसार कामकाज करण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरु राज्याच्या प्रत्येक महसुल विभागातुन विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील क्रीडा शिक्षकांकडुन आवेदन मागवुन एका योग्य क्रीडा शिक्षकाचे त्या महसुल विभागातील संलग्नीत महाविद्यालयांकरीता "विभागीय क्रीडा समन्वयक" म्हणुन नामनिर्देशनाने मानद स्वरुपात नियुक्ती करतील.

(३०.३) अशा प्रकारे नामनिर्देशनाने निवड व मानद स्वरुपात नियुक्त केलेला क्रीडा समन्वयक हा विद्यापीठाचा कर्मचारी नसेल. तथापि, कुलगुरु, कुलसचिव व संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांचे निर्देशांनुसार विविध क्रीडा स्पर्धा व क्रीडा सराव शिबीरांकरीता निर्देशित केल्यानुसार अस्थायी स्वरुपाचे कामकाज करेल.

(३०.४) क्रीडा समन्वयकाच्या मानद नियुक्तीचा कालावधी दोन वर्षाकरीता असेल व तो पुनर्नियुक्तीस पात्र असेल. तथापि, अशा प्रकारची मानद नियुक्ती कुठल्याही स्तरावर पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे विद्यापीठास अधिकार असतील.

(३०.५) अशा प्रकारे मानद स्वरुपात नियुक्त केलेल्या क्रीडा समन्वयकास वेळोवेळी क्रीडा स्पर्धांशी निगडीत जी जबाबदारी देण्यात येईल त्यानुसार कामकाज करण्याकरीता रु.५,०००/- वार्षिक मानधन अदा करण्यात येईल. सदर

मानधनाची रक्कम वेळोवेळी पुनर्निधारीत करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतिल.

(३०.६) याव्यतिरिक्त क्रीडा समन्वयकाची मानद नियुक्ती करणे, मानद नियुक्ती रद्द करणे, कामकाज, मानधन निश्चिती व निगडीत अनुषंगीक बाबींकरीता विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी घेतलेले निर्णय लागु असतील.

३१) <u>महाविद्यालय समन्वयक</u>

(३१.१) विद्यार्थी कल्याण विभागांतर्गतच्या विद्यार्थ्यांकरीताच्या विविध योजना, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतीक कार्यक्रम व उपक्रम यांचे नियोजन याबाबतचा पत्रव्यवहार, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, खर्च, व खर्चाचे समायोजन या अनुषंगाने महाविद्यालय व विद्यापीठ यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी प्रत्येक संलग्नीत महाविद्यालयात एका महाविद्यालय समन्वयकाची मानद स्वरुपात नियुक्ती करण्याच्या उद्देशाने त्याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(३१.२) संबंधित संलग्नीत महाविद्यालयाच्या अधिष्ठाता / प्राचार्य यांनी महाविद्यालय समन्वयक म्हणुन नियुक्ती करण्यासाठी वर्ग ३ (गट-क) संवर्गातील एका सक्षम व गुणवत्ताधारक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या नांवाची विद्यापीठास शिफारस करावी. सदर शिफारशीच्या आधारे संबंधीत शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची त्या महाविद्यालयाकरीता समन्वयक म्हणुन मानद स्वरुपात विद्यापीठ नियुक्ती करेल.

(३१.३) अशा प्रकारे संबंधीत महाविद्यालयाच्या अधिष्ठाता / प्राचार्य यांच्या शिफारशीनुसार मानद स्वरुपात नियुक्त केलेला महाविद्यालय समन्वयक हा विद्यापीठाचा कर्मचारी नसेल. तथापि, कुलसचिव व संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांचे निर्देशांनुसार वेळोवेळी महाविद्यालयाशी निगडीत निर्देशित केल्याप्रमाणे अस्थायी स्वरुपाचे कामकाज करेल.

(३१.४) विद्यार्थी कल्याणाच्या विद्यापीठाच्या योजनांची सविस्तर माहिती महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचेल याची जबाबदारी महाविद्यालय समन्वयकाची असेल. तसेच, अशा प्रकारच्या योजनांचा विद्यापीठास सादर

करण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडुन परिपुर्ण प्रस्ताव तयार करवुन घेण्याच्या कामकाजात कार्यक्रम समन्वयक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व मदत करतील.

(३१.५) महाविद्यालयीन समन्वयकाच्या मानद नियुक्तीचा कालावधी दोन वर्षांकरीता असेल व तो पुनर्नियुक्तीस पात्र असेल. तथापि, अशा प्रकारची मानद नियुक्ती कुठल्याही स्तरावर पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे विद्यापीठास अधिकार असतील.

(३१.६) अशा प्रकारे मानद स्वरुपात नियुक्त केलेल्या महाविद्यालयीन समन्वयकास वेळोवेळी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने निर्धारीत केल्याप्रमाणे वार्षीक मानधन अदा करण्यात येईल.

(३१.७) याव्यतिरिक्त महाविद्यालयीन समन्वयकाची मानद नियुक्ती करणे, नियुक्ती रद्द करणे, कामकाज, मानधन निश्चिती व निगडीत अनुषंगीक बाबींकरीता विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी घेतलेले निर्णय लागु असतील.

## प्रकरण क्र. ११ : प्रो-राटा

३२) <u>क्रीडा महोत्सव शुल्क, क्रीडा शुल्क, तसेच विद्यार्थी कल्याण निधी</u>

(३२.१) प्रस्तावनाः- आंतरविद्यापीठ स्तरावरील क्रीडा महोत्सव, अविष्कार, इंद्रधनुष्य व आव्हान तसेच, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा व सांस्कृतीक स्पर्धामध्ये सहभागी होण्याकरीता व त्याअनुषंगीक खर्चाच्या निधीचे प्रयोजन करण्याकरीता क्रीडा महोत्सव शुल्क, क्रीडा शुल्क, तसेच विद्यार्थी कल्याण निधीचे प्रयोजन करण्यात आलेले असुन त्याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(३२.२) विद्यापीठाशी संलग्नीत सर्व विद्याशाखेंतर्गत सुरु असलेल्या पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका, फेलोशिप व प्रमाणपत्र अभ्यासक्रम, एम् फील व पी.एच.डी. अभ्यासक्रमांना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रथम वर्षाच्या शैक्षणिक शुल्काबरोबर मा. राज्यपाल कार्यालयाने व विद्यापीठाने निर्धारीत केलेले क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विद्यार्थी कल्याण निधीची रक्कम जमा करुन महाविद्यालय एकत्रित रक्कम प्रत्येक वर्षी ३१ डिसेंबर पावेतो विद्यापीठास सादर करेल.

(३२.३) (I) मा. राज्यपाल कार्यालयाने निर्धारीत केलेले क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता रु. ३०/- प्रतीवर्षी प्रती विद्यार्थी याप्रमाणे अभ्यासक्रमाच्या संपुर्ण कालावधी करीताचे शुल्क महाविद्यालय जमा करेल व त्यापैकी रुपये २४/- प्रतीवर्ष प्रती विद्यार्थी या प्रमाणे एकत्रित रक्कम विद्यापीठास सादर करेल. उर्वरीत रुपये ०६/- प्रतीवर्ष प्रती विद्यार्थी इतकी शिल्लक राहिलेली रक्कम महाविद्यालय स्तरावरील क्रीडा व सांस्कृतीक उपक्रमांसाठी खर्च करण्याची महाविद्यालयास मुभा असेल.

अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील एकुण प्रवेशित विद्यार्थी × अभ्यासक्रमाचा संपुर्ण कालावधी × रुपये ३०/- = एकुण क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांकरीताच्या शुल्काची रक्कम (प्रोराटा)

(II) याव्यतिरीक्त विद्यापीठ ज्या क्रीडा स्पर्धाकरीता खर्च करते त्याकरीता क्रीडा स्पर्धा व विद्यार्थी कल्याण निधी याकरीता रु.७०/- प्रतीवर्ष प्रती विद्यार्थी याप्रमाणे अभ्यासक्रमाच्या संपुर्ण कालावधी करीताचे शुल्क महाविद्यालय जमा करेल व एकत्रित रक्कम विद्यापीठास सादर करेल.

*उदा.:- शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता आयुर्वेद अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील एका महाविद्यालयाच्या प्रवेश क्षमतेनुसार प्रवेशित एकुण १०० विद्यार्थी × पाच वर्ष अभ्यासक्रमाचा कालावधी × रुपये १००/- = रुपये ५०,०००/-*

*यामधुन रुपये ०६/- प्रती विद्यार्थी प्रती वर्ष या प्रमाणे होणारी रक्कम रु. ३,०००/- महाविद्यालय स्वतःकडे राखुन ठेवेल व उर्वरीत रक्कम रुपये ४७,०००/- विद्यापीठास दिनांक ३१ डिसेंबर पावेतो सादर करेल.*

(III) उपरोक्त (I) व (II) नुसार एकत्रित शुल्क महाविद्यालय विद्यापीठास सादर करेल.

(३२.४) क्रीडा महोत्सव शुल्क, क्रीडा शुल्क, तसेच विद्यार्थी कल्याण निधीच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रत्येक वर्षी जुलै ते ऑगस्ट महिन्यादरम्यान परिपत्रक निर्गमित करेल.

(३२.५) सदर निधीची एकत्रित रक्कम इलेक्ट्रॉनिक पध्द्तीद्वारे विद्यापीठाच्या बँक खात्यावर महाविद्यालय जमा करेल व त्याबाबतची पावती व यु.टी.आर. क्रमांक विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागास सादर केल्यानंतर विद्यापीठ सदर निधीची संबंधीत महाविद्यालयास पावती देण्याची कार्यवाही करेल.

(३२.६) अशा प्रकारे प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग विभागीय, आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा, सराव शिबीर, आंतरविद्यापीठ स्तरावरील क्रीडा महोत्सव, अविष्कार, इंद्रधनुष्य व आव्हान तसेच, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा व सांस्कृतीक स्पर्धामध्ये विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना सहभागी होण्याकरीता व त्याअनुषंगीक खर्चासाठी करण्यात येईल. सदर प्रयोजनाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांशी निगडीत इतर कार्यक्रम किंवा उपक्रमांकरीता सदर निधीचा विनियोग मा. कुलपती, शासन किंवा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्देशांनुसार करण्यात येईल.

(३२.७) जी महाविद्यालये दिनांक ३१ डिसेंबर पावेतो त्या शैक्षणिक वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांकडुन शुल्क व निधीची रक्कम जमा करुन एकत्रित रक्कम विद्यापीठास सादर करणार नाहीत अशा शैक्षणिक वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे नोंदणी व पात्रता निर्गमित केली जाणार नाही. शुल्क व निधीची एकत्रित रक्कम प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठातर्फे नोंदणी व पात्रतेची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल.

(३२.८) ज्या महाविद्यालयांकडे निधीच्या रक्कमेची थकबाकी असेल अशा संबंधीत महाविद्यालयाचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर महाविद्यालय कुठल्याही यथोचित कारणाशिवाय अशाप्रकारची थकबाकीची रक्कम विद्यापीठास जमा करत नसल्याची बाब सिध्द् झाल्यास महाविद्यालयांविरुध्द् यथोचित कारवाई करण्याचे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असतील.

(३२.९) विद्यापीठाने परिपत्रकान्वये विहित केलेले आवश्यक दस्तऐवज सादर केल्यास विद्यापिठांतर्गत आरोग्य विज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्या भारतीय सैन्य दलातील, पॅरामिलीटरी दलातील व पोलीस यंत्रणेतील शहिद अधिकारी व कर्मचाऱ्याची विधवा पत्नी अथवा पाल्यास सदर निधीचे शुल्क माफ असेल.

(३२.१०) याव्यतिरिक्त सदर निधीच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी विहित केलेले किंवा करण्यात येणारे निर्णय लागु असतील.

३३) <u>विद्यापीठ विकास निधी</u>

(३३.१) प्रस्तावनाः- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ चे कलम ९(२) (क) अंतर्गत विद्यापीठात आवश्यक ती विकासाची कामे करण्याकरीता विद्यापीठ विकास निधीचे प्रयोजन करण्यात आलेले असुन त्याबाबतचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(३३.२) विद्यापीठाशी संलग्नीत सर्व विद्याशाखेंतर्गत सुरु असलेल्या पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका, फेलोशिप व प्रमाणपत्र अभ्यासक्रम, एम्.फील. व पी. एच.डी. अभ्यासक्रमांना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रथम वर्षाच्या शैक्षणिक शुल्काबरोबर विद्यापीठ विकास निधीची

रक्कम जमा करुन एकत्रित रक्कम प्रत्येक वर्षी दिनांक ३१ डिसेंबर पावेतो महाविद्यालय विद्यापीठास सादर करेल.

(३३.३) विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यामध्ये विद्यापीठ मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्याकडुन रुपये १००/- प्रती विद्यार्थी विद्यापीठ विकास निधी जमा करुन महाविद्यालय एकत्रित रक्कम विद्यापीठास क्रीडा महोत्सव शुल्क, क्रीडा शुल्क, तसेच विद्यार्थी कल्याण निधीच्या रक्कमेबरोबरच सादर करेल. संपुर्ण अभ्यासक्रमाच्या कालावधीकरीता एका विद्यार्थ्याकडुन एकदाच विद्यापीठ विकास निधीची रक्कम घेण्यात येईल.

(३३.४) विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार विद्यापीठ विकास निधीच्या संकलीत रक्कमेचा विनियोग करण्यात येईल.

(३३.५) याव्यतिरिक्त क्रीडा महोत्सव शुल्क, क्रीडा शुल्क तसेच विद्यार्थी कल्याण निधीच्या अनुषंगाने विहित केलेले / केले जाणारे नियम विद्यापीठ विकास निधीच्या संकलन, विनीयोग व वसुलीकरीता लागु असतील.

## ३४) आपत्ती व्यवस्थापन निधी

(३४.१) प्रस्तावनाः- आपत्तीच्या परिस्थितीच्या व्यवस्थापनाकरीता आवश्यक असणारा निधी मा. कुलपती कार्यालयाचे निर्देशांनुसार संकलीत करण्याचे व मा. कुलपती / शासनाच्या निर्देशांनुसार सदर निधीचा विनियोग करण्याकरीता आवश्यक ते नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(३४.२) विद्यापीठाशी संलग्नीत सर्व विद्याशाखेंतर्गत सुरु असलेल्या पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका, फेलोशिप व प्रमाणपत्र अभ्यासक्रम, एम्.फील. व पी. एच.डी. अभ्यासक्रमांना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रथम वर्षाच्या शैक्षणिक शुल्काबरोबर आपत्ती व्यवस्थापन निधीची रक्कम जमा करुन एकत्रित रक्कम प्रत्येक वर्षी ३१ डिसेंबर पावेतो महाविद्यालय विद्यापीठास सादर करेल.

(३४.३) विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यामध्ये विद्यापीठ मान्यताप्राप्त सर्व अभ्यासक्रमाच्या एकुण विद्यार्थी संख्येच्या शैक्षणिक शुल्काबरोबरच रुपये १०/- प्रति वर्ष प्रति विद्यार्थी याप्रमाणे अभ्यासक्रमाच्या संपुर्ण कालावधीची आपत्ती व्यवस्थापन निधीची रक्कम महाविद्यालय जमा करेल व जमा होणारी एकत्रित रक्कम प्रत्येक वर्षी दिनांक ३१ डिसेंबर पावेतो विद्यापीठास सादर करेल.

(३४.४) मा. कुलपती / शासन यांच्या निर्देशांनुसार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने आपत्ती व्यवस्थापन निधीच्या संकलीत रक्कमेचा विनियोग करण्यात येईल.

(३४.५) याव्यतिरिक्त क्रीडा महोत्सव शुल्क, क्रीडा शुल्क तसेच, विद्यार्थी कल्याण निधीच्या अनुषंगाने विहित केलेले / केले जाणारे नियम आपत्ती निधीचे संकलन, विनीयोग व वसुलीकरीता लागु असतील.

# प्रकरण क्र. १२ : पुरस्कार आणि शिष्यवृत्ती

३५) <u>उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट विद्यार्थी व विद्यार्थीनी, उत्कृष्ट क्रीडा शिक्षक आणि उत्कृष्ट खेळाडू विद्यार्थी व विद्यार्थीनी</u>

(३५.१) प्रस्तावनाः- विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात कार्यरत मान्यताप्राप्त व पुर्णवेळ तत्वावर शिक्षण देणाऱ्या नियमित अध्यापकांमधुन प्रत्येक विद्याशाखेमधुन एका उत्कृष्ट शिक्षकाची व सर्व विद्याशाखांच्या संलग्नीत महाविद्यालयांत कार्यरत नियमित क्रीडा शिक्षकांमधुन एका उत्कुष्ट शिक्षकाची निवड करुन ते करीत असलेल्या कार्याबद्दल त्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने "उत्कृष्ट शिक्षक" व "उत्कृष्ट क्रीडा शिक्षक" हे पुरस्कार प्रदान करण्यात यावेत. तसेच, विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांमधुन प्रत्येक विद्याशाखेमधुन एका उत्कृष्ट विद्यार्थ्याची व एका उत्कृष्ट विद्यार्थीनीची तसेच, एका उत्कृष्ट खेळाडु विद्यार्थ्याची व एका उत्कृष्ट खेळाडु विद्यार्थीनीची निवड करुन त्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने, "उत्कृष्ट विद्यार्थी/ विद्यार्थीनी" तसेच, "उत्कृष्ट खेळाडु विद्यार्थी/ विद्यार्थीनी" हे पुरस्कार प्रदान करण्यात यावेत. सदर प्रयोजनाकरीताचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(३५.२) सदर पुरस्कारांकरीता व्यवहार्य असेल तेथवर दरवर्षी परिपत्रक प्रसिध्द् करुन प्रस्ताव मागविण्यात यावेत. सदर परिपत्रकासोबत आवेदनाचा नमुना व सर्वसाधारण अटी व शर्तींची माहिती प्रसिध्द् करण्यात येईल.

(३५.३) सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात येईल व सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या सुचना फलकावर प्रसिध्द् करण्याबाबत महाविद्यालयाचे अधिष्ठाता / प्राचार्य यांना निर्देशित करण्यात येईल.

(३५.४) उत्कृष्ट शिक्षक व उत्कृष्ट क्रीडा शिक्षक पुरस्काराकरीता करावयाच्या आवेदनास किमान चार शिक्षकांचे किंवा विद्यापीठाच्या प्राधिकरणाच्या सदस्यांचे व सदर शिक्षक ज्या महाविद्यालयात कार्यरत असेल त्या महाविद्यालयातील किमान दहा विद्यार्थी / विद्यार्थीनींचे अनुमोदन आवश्यक असेल. तसेच, उत्कृष्ट

विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या आवेदनास किमान तीन शिक्षक व तीन विद्यार्थ्यांचे / विद्यार्थीनींचे अनुमोदन आवश्यक असेल.

(३५.५) उत्कृष्ट खेळाडु विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या आवेदनास अनुमोदनाची आवश्यकता नसेल. तथापि, राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावरील शासन अथवा विद्यापिठांमार्फत आयोजित वैध क्रीडास्पर्धांमध्ये विजेते / पुरस्कार प्राप्त खेळाडु, विद्यार्थी व विद्यार्थीनी सदर पुरस्काराकरीता आवेदन करण्यास पात्र असतील.

(३५.६) सदर पुरस्कारांकरीताचे प्रस्ताव संबंधीत शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या महाविद्यालयाच्या अधिष्ठाता/प्राचार्यामार्फत सादर करणे बंधनकारक असेल. एका महाविद्यालयातुन एका पुरस्काराकरीता केवळ एकाच शिक्षकाचा, क्रीडा शिक्षकाचा, विद्यार्थी व विद्यार्थीनीचा तसेच खेळाडु विद्यार्थी व विद्यार्थीनीचा प्रथम प्राप्त होणारा प्रस्ताव विचारात घेण्यात येईल.

(३५.७) विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयामधुन वैद्यकीय, दंत, आयुर्वेद व युनानी, होमिओपॅथी व तत्सम विद्याशाखा अशा पाच विद्याशाखांमधुन प्रत्येकी एका उत्कृष्ट शिक्षकाची, १ उत्कृष्ट खेळाडु व उत्कृष्ट विद्यार्थी / विद्यार्थीनीची निवड करण्यात येईल. तसेच, सर्व विद्याशाखांच्या संलग्नीत महाविद्यालयातुन केवळ एका उत्कृष्ट क्रीडा शिक्षकाची निवड करण्यात येईल.

(३५.८) उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट क्रीडा शिक्षक, उत्कृष्ट विद्यार्थी व विद्यार्थीनी, उत्कृष्ट खेळाडु विद्यार्थी व खेळाडु विद्यार्थीनीच्या निवडीकरीता विद्यापीठ वेळोवेळी निर्धारीत करेल अशा गुणतक्त्यांचा अवलंब करण्यात येईल. विहित मुदतीत प्राप्त प्रस्तावांची प्राथमिक छानणी करण्याकरीता प्रशासकीय स्तारावर कुलगुरु अंतर्गत प्राथमिक छानणी समितीचे गठण करतील. प्राथमिक छानणी पुर्ण झाल्यानंतर गुणांकन निश्चिती करुन आंतिम शिफारस करण्याकरीता खालील प्रमाणे अंतिम शिफारस समिती असेल.

| | |
|---|---|
| प्रति–कुलगुरु | अध्यक्ष |
| मा. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला व्यवस्थापन परिषदेचा व विद्यापरिषदेचा प्रत्येकी एक सदस्य | सदस्य |
| प्रत्येक विद्याशाखेचे अधिष्ठाता | सदस्य |
| कुलसचिव | सदस्य |
| विधी अधिकारी | सदस्य |
| संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग | सदस्य सचिव |

प्रति–कुलगुरु यांच्या अनुपस्थितीत कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला एक विद्याशाखेचा अधिष्ठाता सदर समितीचा अध्यक्ष असेल.

(३५.९) उपरोक्त विहित अंतिम शिफारस समिती प्राप्त प्रस्तावांच्या प्राथमिक छाननीचा अहवाल तपासुन गुणांकनाची अंतिम निश्चिती करुन शिफारशींसह आपला अहवाल कुलगुरु यांना सादर करेल. सदर समितीच्या शिफारशी मान्य करणे अथवा एखादी शिफारस किंवा संपुर्ण शिफारशी पुनर्विचारासाठी समितीकडे परत पाठविण्याचे कुलगुरु यांना अधिकार असतील. कुलगुरु यांनी मान्य केलेली शिफारस विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात येऊन व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने पुरस्कार जाहिर करण्यात येतील.

(३५.१०) निवडीकरीता विहित केलेल्या गुणांकन तक्त्यानुसार उत्कृष्ट शिक्षक व उत्कृष्ट क्रीडा शिक्षक यांच्या निवडीकरीता ६० टक्यांपेक्षा कमी गुण प्राप्त करणारा प्रस्ताव अपात्र समजण्यात येईल. तसेच, उत्कृष्ट विद्यार्थी/ विद्यार्थीनी व खेळाडु विद्यार्थी / विद्यार्थीनीच्या निवडीकरीता ४० टक्यांपेक्षा कमी गुण प्राप्त करणारा प्रस्ताव अपात्र समजण्यात येईल.

तसेच ज्या शिक्षक किंवा विद्यार्थ्यांविरोधात गैरकृत्य, शिस्तभंगाचे प्रकरण किंवा फौजदारी गुन्हा सिध्द झालेला असेल अशा शिक्षक किंवा विद्यार्थ्याचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच गंभीर स्वरुपाच्या गैरकृत्य किंवा फौजदारी गुन्हा प्रलंबित असल्यास देखील संबंधिताचा प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाहीत.

(३५.११) एका शिक्षकाची व क्रीडा शिक्षकाची त्यांच्या संपुर्ण सेवा कालावधीत उत्कृष्ट शिक्षक व उत्कृष्ट क्रीडाशिक्षक पुरस्काराकरीता आणि विद्यार्थी व विद्यार्थीनीची विद्यापीठांतर्गत संपुर्ण शैक्षणिक कालावधीत उत्कृष्ट विद्यार्थी, उत्कृष्ट विद्यार्थीनी, उत्कृष्ट खेळाडु विद्यार्थी व उत्कृष्ट खेळाडु विद्यार्थीनी पुरस्कारांकरीता एकदाच निवड केली जाईल.

(३५.१२) पुरस्काराचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे असेलः-

(I) उत्कृष्ट शिक्षक (प्रत्येक विद्याशाखेतुन एक) व उत्कृष्ट क्रीडा शिक्षक (सर्व विद्याशाखेच्या सर्व संलग्नीत महाविद्यालयातुन एक) - प्रत्येकी ५,०००/- रुपये, प्रमाणपत्र व स्मृती चिन्ह.

(II) उत्कृष्ट विद्यार्थी, उत्कृष्ट विद्यार्थीनी, उत्कृष्ट खेळाडु विद्यार्थी व उत्कृष्ट खेळाडु विद्यार्थीनी - प्रत्येकी ३,०००/- रुपये व प्रमाणपत्र.

(३५.१३) सदर पुरस्कार साधारणपणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात वितरीत केले जातील.

(३५.१४) सदर पुरस्कारांकरीता निवड करणे अथवा न करणे हा पुर्णपणे विद्यापीठाचा अधिकार असेल. त्याबाबतच्या कुठल्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

(३५.१५) निवडीकरीता विद्यापीठातर्फे वेळोवेळी निर्धारीत केले जाणारे नियम बंधनकारक असतील.

(३५.१६) प्रस्तावांची प्राथमिक छाननी व अंतिम गुणांकन, निवड, पुरस्काराचे स्वरुप यामध्ये वेळोवेळी बदल करण्याचे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असतील. असे बदल वेळोवेळी परिपत्रकान्वये विहित केले जातील व सदर परिपत्रक उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येतील.

(३५.१७) प्रवास, दैनिक भत्ता व मानधन :-

(I) पुरस्कारांच्या प्रस्तावांची प्राथमिक छाननी व अंतिम गुणांकन करण्याकरीता गठित समिती सदस्यांना, छाननीच्या बैठकीस

उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठ नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(II) पुरस्कारासाठी निवड झालेल्या उत्कृष्ट शिक्षकांना, उत्कृष्ट क्रीडा शिक्षकांना, उत्कृष्ट विद्यार्थी, उत्कृष्ट विद्यार्थीनी, उत्कृष्ट खेळाडु विद्यार्थी व उत्कृष्ट खेळाडु विद्यार्थीनीस पुरस्काराचे कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(III) मानधन व बैठक भत्ता :-

(अ) प्राथमिक छाननी समितीमधील शिक्षक तसेच गट अ व ब च्या अधिकाऱ्यांना छाननीच्या संपुर्ण कामकाजाकरीता प्रत्येकी रु.५,०००/- व इतर कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रु.३,०००/- अतिरीक्त कामकाजाचा मोबदला अनुज्ञेय असेल.

(ब) अतिम शिफारस समिती सदस्यांना प्रत्येकी रु.५,०००/- बैठक भत्ता अनुज्ञेय असेल.

३६) <u>जीवनगौरव पुरस्कार</u>

(३६.१) प्रस्तावनाः- विद्यापीठांतर्गत संलग्नीत महाविद्यालय व मान्यता प्राप्त संस्थेमध्ये ज्ञानदानाचे विशेष व मोलाचे कार्य सातत्यपुर्णपणे व अतिउत्कृष्टपणे केलेल्या, तसेच, वैद्यकीय क्षेत्रात सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊन उत्कृष्ट व विशेष कार्य करणाऱ्या व त्या कार्यामुळे समाजमनावर ठसा उमटविणाऱ्या पात्र व निवड करण्यात येणाऱ्या तज्ञास त्याच्या कार्याचा गौरव करण्याकरीता विद्यापीठातर्फे "जीवनगौरव पुरस्कार" प्रदान करण्यात येईल. सदर प्रयोजनाकरीताचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(३६.२) जीवनगौरव पुरस्काराकरीता व्यवहार्य असेल तेथवर दरवर्षी परिपत्रक प्रसिध्द करुन प्रस्ताव मागविण्यात येतील. सदर परिपत्रकासोबत सर्वसाधारण अटी व शर्तीची माहिती प्रसिध्द करण्यात येईल. सदर परिपत्रक विद्यापीठाच्या

संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांना पाठविण्यात येईल.

(३६.३) जीवनगौरव पुरस्काराकरीताच्या अटी व शर्ती, पुरस्काराकरीता नामनिर्देशनाची कार्यपध्दती, प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्याकरीता समितीचे गठण, समितीची कार्यपध्द्ती, पुरस्कारांर्थीची संख्या, पुरस्काराचे स्वरुप वगैरे याबाबतचे नियम व सर्वसाधारण अटी व शर्तीची माहिती परिपत्रकासोबत प्रसिध्द करण्यात येईल.

(३६.४) जीवनगौरव पुरस्कारांचे वितरण साधारणपणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात वितरीत केले जाईल. पुरस्काराचे स्वरुप वेळोवेळी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने निर्धारीत केल्यानुसार असेल.

(३६.५) जीवनगौरव पुरस्कारांकरीता निवड करणे अथवा न करणे हा पुर्णपणे विद्यापीठाचा अधिकार असेल. त्याबाबतच्या कुठल्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

(३६.६) निवडीकरीताचे वेळोवेळी निर्धारीत केले जाणारे नियम बंधनकारक असतील.

(३६.७) प्रवास व दैनिक भत्ताः- जीवनगौरव पुरस्काराकरीता निवड झालेल्या सन्मानार्थीस पुरस्कार वितरणाच्या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

३७) <u>राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार</u>

(३७.१) प्रस्तावनाः- विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककांमधुन विद्यापीठ / राज्यस्तरीय कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी स्वयंसेवक व एकक यांनी केलेल्या अतिउत्कृष्ट सामाजिक सेवेचा गौरव करण्याच्या दृष्टीने व सकारात्मक सामाजिक प्रवृत्ती आणि मुल्यांद्वारा व्यक्तिमत्व विकासास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने निर्धारीत धोरणानुसार पुरस्कार प्रदान करण्यात येतील. सदर प्रयोजनाकरीताचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(३७.२) राज्याच्या प्रत्येक महसुल विभागात विद्यापीठाशी संलग्नीत ज्या-ज्या महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना एकक (अनुदानित किंवा स्वयंनिर्वाहित)

कार्यरत असेल अशा महाविद्यालयांमधुन एक उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, दोन उत्कृष्ट स्वयंसेवक (एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनी) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. सद्यस्थितीत राज्याच्या सहा महसुल विभागांमधुन प्रत्येकी एक उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी असे एकुण सहा कार्यक्रम अधिकारी आणि प्रत्येकी दोन उत्कृष्ट विद्यार्थी स्वयंसेवक (एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनी) असे एकुण बारा उत्कृष्ट विद्यार्थी स्वयंसेवक यांना पुरस्कार प्रदान करण्यात येतील. पुरस्कारांच्या संख्येचे पुनर्निधारण करण्याचे विद्यापीठास अधिकार असतील.

(३७.३) पुरस्काराकरीता निवड करण्यात आलेल्या सहा कार्यक्रम अधिकाऱ्यांपैकी निवडीकरीता सर्वात जास्त गुण धारण करणारा कार्यक्रम अधिकारी ज्या महाविद्यालयात कार्यरत असेल त्या एका महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककास "उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना एकक" हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

(३७.४) राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी व उत्कृष्ट स्वयंसेवक निवडीकरीता विद्यापीठ व्यवहार्य असेल तेथवर दरवर्षी परिपत्रक प्रसिध्द् करुन प्रस्ताव मागवेल. प्रस्ताव सादर करण्याच्या मार्गदर्शक सुचना, प्रस्तावासोबत सादर करावयाची माहिती व दस्तऐवज वगैरे याबाबतच्या सविस्तर सुचना परिपत्रकासोबत प्रसिध्द करण्यात येतील.

(३७.५) विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची प्राथमिक छाननीअंती अंतिम मुल्यांकन व शिफारस करण्याकरीता खालीलप्रमाणे समिती असेल.

| | |
|---|---|
| प्रति-कुलगुरु | अध्यक्ष |
| मा. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला व्यवस्थापन परिषदेचा एक सदस्य | सदस्य |
| मा. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला एका विद्याशाखेचा अधिष्ठाता | सदस्य |
| मा. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले दोन सामाजिक क्षेत्रातील तज्ञ | सदस्य |
| संचालक, राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला त्यांचा प्रतिनिधी | सदस्य |

| | |
|---|---|
| कुलसचिव | सदस्य |
| संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग | सदस्य सचिव |

प्रति-कुलगुरु यांच्या अनुपस्थितीत कुलगुरु एका जेष्ठ सदस्याचे समितीचे अध्यक्ष म्हणुन नामनिर्देशन करतील.

(३७.६) उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी व उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्काराकरीता प्राप्त प्रस्तावांचे मुल्यांकन करण्याकरीता स्वतंत्र मुल्यांकन तक्ते असतील. सदर तक्त्यातील शीर्ष व सदर शीर्षांतर्गतचे अधिकतम गुण विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारीत केल्यानुसार असतील.

(३७.७) प्राप्त प्रस्तावांचे विहित पध्दतीने प्राथमिक छाननीअंती अंतिम मुल्यांकन व गुणनिर्धारण निवड समिती करेल. प्रत्येक महसुल विभागातुन सर्वात जास्त गुण प्राप्त करणाऱ्या एका कार्यक्रम अधिकाऱ्याची व विद्यार्थी स्वयंसेवकांची (एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनी) पुरस्काराकरीता निवड समिती शिफारशींसह आपला अहवाल कुलगुरु यांना सादर करेल. सदर शिफारशी मान्य करणे अथवा एखादी किंवा संपुर्ण शिफारशी पुनर्विचारासाठी समितीकडे परत पाठविण्याचे कुलगुरु यांना अधिकार असतील. कुलगुरु यांनी मान्य केलेली शिफारस विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात येऊन व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने पुरस्कार जाहिर करण्यात येईल.

(३७.८) पुरस्काराचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे असेलः-

(I) उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी - एकुण सहा (प्रत्येक महसुल विभागातुन एक) प्रत्येकी ५,०००/- रुपये, प्रमाणपत्र व स्मृती चिन्ह.

(II) उत्कृष्ट विद्यार्थी स्वयंसेवक - एकुण १२ (प्रत्येक महसुल विभागातुन एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनी) प्रत्येकी २,०००/- रुपये व प्रमाणपत्र.

(III) उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना एकक - राज्यातुन एक - १०,०००/- रुपये व प्रमाणपत्र.

(३७.९) मागील तीन वर्षांमध्ये पुरस्कार प्राप्त झालेले कार्यक्रम अधिकारी व रासेयो स्वयंसेवक प्रस्ताव सादर करु शकणार नाहीत.

(३७.१०) सदर पुरस्कार साधारणपणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात वितरीत केले जातील.

(३७.११) सदर पुरस्कारांकरीता निवड करणे अथवा न करणे हा पुर्णपणे विद्यापीठाचा अधिकार असेल. त्याबाबतच्या कुठल्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

(३७.१२) प्रस्तावांची प्राथमिक छानणी व अंतिम गुणांकन, निवड, पुरस्काराचे स्वरुप यामध्ये वेळोवेळी बदल करण्याचे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असतील. असे बदल वेळोवेळी परिपत्रकांन्वये विहित केले जातील व सदर परिपत्रक उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येतील.

(३७.१३) प्रवास व दैनिक भत्ताः-

(i) पुरस्कारांच्या प्रस्तावांची प्राथमिक छानणी व अंतिम गुणांकन करण्यासाठी गठीत समिती सदस्यांना छाननीच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठ नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(ii) पुरस्कारप्राप्त शिक्षक व विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयाचे ठिकाणापासुन ते पुरस्कार वितरणाचे कार्यक्रम स्थळापावेतो येण्या-जाण्याकरीता विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(३७.१४) अधिकतम गुण प्राप्त असलेले प्रस्ताव - राज्यस्तरीय पुरस्काराकरीता शासनास सादर करण्यात येतील.

(i) रासेयो कार्यक्रम अधिकारी (ii) रासेयो स्वयंसेवक

३८) क्रीडा शिष्यवृत्ती

(३८.१) प्रस्तावनाः- विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच खेळाच्या माध्यमातुन त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम रहावे व कौशल्यप्राप्त खेळाडुस खेळामध्ये चालना मिळावी या उद्देशाने विद्यापीठांतर्गत संलग्नीत महाविद्यालयात नियमित स्वरुपात शिक्षण घेणाऱ्या

खेळाडु विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी क्रीडा शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली असुन सदर योजनेचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(३८.२) राज्यस्तरावरील क्रीडा महोत्सव व राष्ट्रीय स्तरावरील खेळाच्या स्पर्धा जसे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा, खेलो इंडीया, आंतरराष्ट्रीय कनिष्ठ जागतिक अजिंक्यपद स्पर्धा, कॉमनवेल्थ गेम्स्, जागतिक अजिंक्यपद स्पर्धा, ऑलंपिक स्पर्धा वै. स्पर्धांमधील खेळात विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करुन प्रथम, द्वितीय किंवा तृतीय पारितोषीक अथवा सुवर्णपदक, रौप्यपदक किंवा कांस्यपदक प्राप्त करणाऱ्या खेळाडुस विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या नियमांच्या अधिन राहुन क्रीडा शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येईल.

(३८.३) क्रीडास्पर्धानिहाय व सदर क्रीडा स्पर्धांमध्ये मिळविलेल्या प्राविण्य निहाय शिष्यवृत्तीची रक्कम सर्वसाधारणपणे खालील तक्यात विहित केल्याप्रमाणे असेल.

| अ. क्र. | स्पर्धेचे नांव | स्पर्धेचा प्रकार | प्रथम क्रमांक किंवा सुवर्ण पदक (First or Gold Medal) | द्वितीय क्रमांक किंवा रौप्य पदक Second or Silver Medal) | तृतीय क्रमांक किंवा कांस्य पदक (Third or Bronz Medal) |
|---|---|---|---|---|---|
| | | | शिष्यवृत्ती रु. | शिष्यवृत्ती रु. | शिष्यवृत्ती रु. |
| १ | महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा - "क्रीडामहोत्सव" (Inter State – Inter University Sports- Krida Mahotsav) | वैयक्तीक | रु. १५,०००/- | रु. १०,०००/- | रु.५,०००/- |
| | | सांघिक प्रती खेळाडू | रु. ३,०००/- | रु. २,०००/- | रु.१,०००/- |
| २ | पश्चिम/दक्षिण विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धा (AIU – All India Inter University West/South Zone Tournament) | वैयक्तीक | रु. १५,०००/- | रु. १०,०००/- | रु.५,०००/- |
| | | सांघिक ०५ खेळाडू पर्यंत | रु. ४,०००/- | रु. ३,०००/- | रु.१,५००/- |
| | | सांघिक ०५ खेळाडू | रु. ३,०००/- | रु. २,०००/- | रु. १,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पेक्षा जास्त | | | |
| ३ | अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा (AIU- All India Inter University Championship) | वैयक्तीक | रु. २०,०००/- | रु. १५,०००/- | रु. १०,०००/- |
| | | सांघिक ०५ खेळाडू पर्यंत | रु. १०,०००/- | रु. ५,०००/- | रु.३,०००/- |
| | | सांघिक ०५ खेळाडू पेक्षा जास्त | रु. ५०००/- | रु.३०००/- | रु. २०००/- |
| ४ | खेलो इंडीया | वैयक्तीक | रु. २५,०००/- | रु. २०,०००/- | रु. १५,०००/- |
| | | सांघिक ०५ खेळाडू पर्यंत | रु. १५,०००/- | रु. १०,०००/- | रु.५,०००/- |
| | | सांघिक ०५ खेळाडू पेक्षा जास्त | रु. १०,०००/- | रु. ७,५००/- | रु.५,०००/- |
| ५ | १.कनिष्ठ जागतिक अजिंक्यपद स्पर्धा (Junior World Championship) २.कॉमनवेल्थ गेम्स (Commonwealth Games) ३. आशियाई अजिंक्यपद स्पर्धा (Asian Games Championship) ४.जागतिक अजिंक्यपद स्पर्धा (World Sport Championship) ५.ऑलिंपिक स्पर्धा (Olympics Games) | वैयक्तीक | रु. ५०,०००/- | रु. ३०,०००/- | रु. २०,०००/- |
| | | सांघिक प्रति खेळाडु | रु. २०,०००/- | रु. १५,०००/- | रु. १०,०००/- |

(३८.४) उपरोक्त तक्त्यात नमुद केलेली शिष्यवृत्तीची रक्कम ही एक वेळेची शिष्यवृत्ती (One Time Scholarship) म्हणुन देण्यात येईल.

(३८.५) सदर शिष्यवृत्तीकरीता व्यवहार्य असेल तेथवर दरवर्षी परिपत्रक प्रसिध्द करुन प्रस्ताव मागविण्यात येतील. सदर परिपत्रकासोबत आवेदनाचा नमुना व सर्वसाधारण अटी व शर्तींची माहिती प्रसिध्द् करण्यात येईल.

(३८.६) सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. व सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्याबाबत महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य यांना निर्देशित करण्यात येईल.

(३८.७) विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येऊन छाननीचा अहवाल कुलगुरु यांना मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. कुलगुरु यांच्या मान्यतेनुसार शिष्यवृत्तीप्राप्त करणाऱ्या खेळाडुंची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(३८.८) सदर क्रीडा शिष्यवृत्ती साधारणपणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात वितरीत केली जाईल.

(३८.९) सदर क्रीडा शिष्यवृत्तीकरीता निवड करणे अथवा न करणे हा पुर्णपणे विद्यापीठाचा अधिकार असेल. त्याबाबतच्या कुठल्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

(३८.१०) निवडीकरीताचे वेळोवेळी निर्धारीत केले जाणारे नियम बंधनकारक असतील.

(३८.११) सदर पुरस्कारांचे नियम व स्वरुप यामध्ये वेळोवेळी बदल करण्याचे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असतील. असे बदल वेळोवेळी परिपत्रकांन्वये विहित केले जातील व सदर परिपत्रक उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येतील.

(३८.१२) प्रवास व दैनिक भत्ताः- क्रीडा शिष्यवृत्तीकरीता निवड झालेल्या खेळाडुंना पुरस्कार वितरणाचे कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

## प्रकरण क्र. १३ : संकिर्ण तरतुदी, विविध अर्जांचे नमुने व प्रपत्र

३९) संकिर्ण तरतुदी

(३९.१) या नियमांमध्ये अंतर्भुत नसलेल्या बाबींविषयी किंवा विहित नियमांची अंमलबजावणी करीत असतांना अडचण उद्‌भवल्यास या नियमांशी विसंगत नसतील असे नियम किंवा कार्यपध्द्ती विहित करण्याचे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असतील.

(३९.२) सदर नियमावलींतर्गत विहित कुठल्याही कल्याणकारी योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यापुर्वी महाविद्यालयाने अथवा विद्यार्थ्याने कोणत्याही प्रकारची आगाऊ नोंदणी महाविद्यालयाकडे किंवा विद्यापीठाकडे करण्याची आवश्यकता नाही.

(३९.३) उक्त नियमावलीत विहित योजना, कार्यक्रम किंवा उपक्रम ज्याकरीता विद्यापीठ आर्थिक अनुदान देत असेल / दिलेले असेल त्याकरीता महाविद्यालयास विद्यार्थ्यांकडुन कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारण्याचा अधिकार नसेल.

(३९.४) सदर नियमांन्वये लागु करण्यात आलेल्या योजना, देण्यात येणारे अनुदान व सोईसुविधा हया विद्यापीठ स्वनिधीतुन देणार असल्याने ती एक अतिरिक्त सवलत असुन त्याचा लाभ हा विद्यार्थी, विद्यार्थीनींचा किंवा महाविद्यालयाचा हक्क नसेल.

(३९.५) सदर नियमांतर्गत विहित कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ कार्यपध्द्तीत बदल केल्याच्या कारणामुळे किंवा कार्यपध्द्तीचा अवलंब करण्यात काही तफावत झाल्याच्या कारणामुळे विधी अग्राहय मानण्यात येणार नाही.

(३९.६) ज्या अर्जाचे नमुने उक्त नियमावलीत नमुद केलेले असतील ते वेळोवेळी विद्यापीठाने प्रसिध्द केल्याप्रमाणे असतील.

(३९.७) सदर नियमावलीतील विहित प्रत्येक आर्थिक बाबींचे परिचालन विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार करण्यात येईल.

(३९.८) सदर नियमावलीतील नियमांचा अर्थ लावण्याचे अधिकार कुलगुरु यांना असतील.

(३९.९) सदर नियमांमध्ये उल्लेख असलेल्या पुरुषार्थी शब्दात सर्व लिंगांचा (All Genders) समावेश असेल.

(३९.१०) सदर नियमावलीतील नियमात सुधारणा, बदल किंवा निरसन करण्याचे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असतील. अशाप्रकारे केल्या जाणाऱ्या सुधारणा किंवा बदल किंवा निरसन वेळोवळी परिपत्रकाद्वारे प्रसिध्द् करण्यात येईल व अशा प्रकारे प्रसिध्द् केलेले परिपत्रक हया नियमावलीचा भाग समजण्यात येतील.

४०) विविध अर्जांचे नमुने / प्रपत्र

सदर नियमावलीत नमुद योजना, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम, उपक्रम व इतर अनुषंगिक कामकाजांबाबतचे अर्जाचे नमुने व प्रपत्र खाली नमुद केल्यानुसार असतील व ते या नियमावलीसोबत सहपत्र म्हणुन जोडण्यात आल्यानुसार असतील. सदर अर्ज व प्रपत्रांच्या नमुन्यामध्ये वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार विद्यापीठास असतील. सहपत्र म्हणुन उक्त नियमावलीसोबत जोडण्यात आलेल्या खालील नमुने व प्रपत्र याव्यतिरिक्त इतर नमुने व प्रपत्र विद्यापीठ वेळोवेळी प्रसिध्द् करेल असे असतील.

| अ.क्र. | अर्ज / योजनेच्या प्रपत्राचा प्रकार | सहपत्र क्र. |
|---|---|---|
| १ | धन्वंतरी विद्याधन योजना नमुना आवेदन अर्ज | सहपत्र "१ - अ" |
| २ | धन्वंतरी विद्याधन योजनेकरीता विद्यार्थ्याने सादर करावाच्या स्वयंघोषणापत्राचा नमुना | सहपत्र "१ - ब" |
| ३ | धन्वंतरी विद्याधन योजनेकरीता बॅंकेचे नमुना पत्र | सहपत्र "१ - क" |
| ४ | बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेंतर्गत प्राचार्यांनी करावयाच्या अर्जाचा नमुना | सहपत्र "२ - अ" |
| ५ | बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेंतर्गत प्रतिपुर्तीस पात्र खर्चाचा तपशिल | सहपत्र "२ - ब" |
| ६ | सावित्रीबाई फुले - मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेचा नमुना अर्ज | सहपत्र "३ -अ" |
| ७ | संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजनेचा नमुना अर्ज | सहपत्र "४ - अ" |
| ८ | संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजनेकरीता वैद्यकीय | सहपत्र "४ - ब" |

| | | |
|---|---|---|
| | प्रमाणपत्राचा नमुना अर्ज | |
| ९ | कमवा व शिका योजनेचा नमुना अर्ज | सहपत्र "५" |

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ चे कलम ५२ अंतर्गत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने सदर नियमावली प्रख्यापीत केल्याच्या दिनांकापासुन लागु असेल.

सहि/-

**कुलसचिव**

**(डॉ. कालीदास द. चव्हाण)**

**दिनांकः- १७/०३/२०२०**

**ठिकाणः- नाशिक**

(सहपत्र : "१ - अ")

नमुना अर्ज

धन्वंतरी विद्याधन योजना

पासपोर्ट
आकाराचा
फोटो

प्रति,
मा. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक.

| अ. क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | |
| २ | विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव व पत्ता | |
| ३ | मोबाईल नंबर / दुरध्वनी क्र. (STD) कोडसह | |
| ४ | इमेल आयडी (email) | |
| ५ | विद्यार्थ्याचा कायम निवासी पत्ता | |
| ६ | जन्म तारीख व वय | |
| ७ | सध्या शिकत असलेला वर्ग आणि कोर्स | |
| ८ | महाविद्यालयात शिकत असलेल्या वर्गाचे आकारण्यात आलेले शैक्षणिक शुल्क | |
| ९ | गतवर्षी उत्तीर्ण वर्ग व गुण (गुणपत्राची प्रत जोडावी) | |
| १० | मागासवर्गीय असल्यास प्रकार (होय असल्यास जातीच्या दाखल्याची प्रत जोडावी) | होय / नाही वर्गवारी : |
| ११ | शारिरीक अपंगत्व असल्यास (होय असल्यास अंपगत्वाच्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी) | होय / नाही |
| १२ | विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ? | होय / नाही |
| १३ | पालकांचे संपूर्ण नाव | |
| १४ | पालकांशी विद्यार्थ्यांचे नाते | |
| १५ | पालकांचा संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्र. (STD) कोडसह/ मोबाईल क्रमांक : | |

| | | |
|---|---|---|
| १६ | पालकांचा व्यवसाय / नोकरी | |
| १७ | पालकांचे वार्षिक उत्पन्न (तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा स्वसाक्षांकीत दाखला सोबत जोडावा.) | |
| १८ | पालकांची नोकरी / व्यवसायाचा पत्ता | |
| १९ | विद्यार्थ्याच्या आधारकार्डचा नंबर नमूद करावा (आधारकार्डची स्वसाक्षांकीत प्रत जोडणे अनिवार्य) | |
| २० | महाराष्ट्र शासनातर्फे राबविलेली जात असलेली (Education Loan Subsidy Scheme) शैक्षणिक कर्ज व्याज अनुदान सवलत घेणा-या विद्यार्थ्यांना मिळणा-या सवलतीचा तपशिल नमुद करण्यात यावा. | व्याज अनुदान सवलत मिळते ......<br>अथवा<br>नाही ...... |

विद्यापीठाच्या धन्वंतरी विद्याधन योजनेनुसार उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कर्जावरील व्याज रकमेचे अनुदान मिळावे म्हणून मी इच्छुक असून कृपया सदर योजनेचा लाभ मला मिळावा. तथापि मला सन.................. (वर्ष नमुद करावे) या शैक्षणिक वर्षामध्ये या योजनेचा लाभ मिळालेला आहे / नाही.

धन्वंतरी विद्याधन योजनेच्या सर्व अटी व शर्ती जाणून घेतल्या आहेत व त्यांचे पालन करणे माझेवर बंधनकारक राहील हे मी मान्य करतो / करते.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी, योजनेबाबत असलेल्या सर्व नियमांचे मी पालन करीन. या संदर्भात नियमात बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे असतील तसेच सदर अनुदान हे विद्यापीठ निधीतून मिळत असून तो माझा हक्क नाही याची मला जाणीव आहे. मी असे जाहीर करतो / करते की, सदर अर्जात नमुद केलेली माहीती खरी आहे. नमुद केलेली माहिती खोटी असल्यास / तफावत आढळल्यास मी योग्य त्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र असेन.

मी असे प्रमाणित करतो / करते की, सदर विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाकडून व्याज अनुदान सवलत मिळत नाही/मिळणार नाही.

विद्यार्थ्यांचे नाव व सही : पालकांचे नाव व सही:

दिनांक : दिनांक :

## महाविद्यालयाचे हमीपत्र **(Undertaking)**

माझ्या माहितीप्रमाणे वरील सर्व माहिती खरी असून मी असे प्रमाणित करतो / करते की, सदर विद्यार्थ्यांस महाराष्ट्र शासनाकडून तिच्या / त्याच्या शैक्षणिक कर्जावर व्याज अनुदान सवलत मिळत नाही / मिळणार नाही.

महाविद्यालयाचा शिक्का

अधिष्ठाता/प्राचार्याची सही

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## तपासणी सुची **(Check List)**

| अ.क्र. | सादर करावयाची कागदपत्रे | होय/नाही | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेला सहपत्र "अ"(नमुना अर्ज ) परिपुर्ण भरला आहे काय **?** | | |
| २ | बॅंक स्टेटमेंट सहपत्र "ब"(नमुना अर्ज ) (१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१) जोडले आहे काय **?** | | |
| ३ | गतवर्षात उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रकाची (विद्यार्थ्यांची स्वसाक्षांकीत प्रत) प्रत जोडली आहे काय **?** | | |
| ४ | गतवर्षाचा उत्पन्नाच्या दाखल्याची स्वसाक्षांकीत प्रत (आर्थिक वर्ष - २०१९-२०) जोडली आहे काय **?** (फक्त तहसिलदारांचा दाखला) | | |
| ५ | आधारकार्ड ची स्वसाक्षांकीत प्रत | | |

टिप :- महाविद्यालयाने प्रस्तावांची पुर्तता करतांना तपासणी सूची प्रमाणे दस्तावेज तपासून अनुक्रमांकाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.

महाविद्यालय लिपीक :-
अधिष्ठाता/प्राचार्य

भ्रमणध्वनी क्र:-                                        **(**सही व शिक्का**)**

(सहपत्र : "१ - ब")

- विद्यार्थी कल्याण विभाग -

स्वयंघोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

मी_______________________________________श्री________________________________

__________ यांचा मुलगा/मुलगी वय _____वर्ष, आधार

क्रमांक______________________व्यवसाय ________________________________________

राहणार____________________________________________________________यावदारे

घोषित करतो/करते की, योजनेचा अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे याबाबतची माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजूतीनूसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायदयानूसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानूसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : ____________________________ अर्जदाराची सही : ____________________________

दिनांक: ____________________________ अर्जदाराचे नाव : ____________________________

नमुना अर्ज (सहपत्र : "१ - क")

बॅंकेच्या मुखपृष्ठावर **(ON BANK LETTER HEAD)**

प्रति,
मा. संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग,
मआविवि, नाशिक.

विषय : शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या परताव्याबाबत...

संदर्भ : विद्यापीठाची धन्वंतरी विद्याधन योजना.

| क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | बॅंकेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्र. | |
| २. | कर्ज घेतलेल्या विद्यार्थ्याचे नाव | |
| ३. | महाविद्यालयाचे नाव | |
| ४. | शिकत असलेला वर्ग व अभ्यासक्रम | |
| ५. | बॅंकेने वितरीत केलेले कर्ज व दिनांक | अक्षरी रु.<br>अंकी रु. दि. |
| ६. | ०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ पर्यंत बॅंकेने मंजूर केलेल्या कर्जापैकी वाटप केलेली रक्कम | अक्षरी रु.<br>अंकी रु. |
| ७. | ०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ दरम्यान भरलेल्या व्याजाची रक्कम व व्याजाचा दर | व्याज दर : %<br>व्याजाची होणारी रक्कम<br>अक्षरी रु. :<br>अंकी रु. : |

बॅंकेचा शिक्का बॅंक मॅनेजरची स्वाक्षरी

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (सहपत्र "२ - अ")
बहि:शाल शिक्षण मंडळ योजना
प्राचार्यांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,
मा. संचालक विद्यार्थी कल्याण
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक.

महोदय/महोदया,

आपल्या विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेत आम्ही सहभागी होण्यास इच्छूक असून कृपया या योजनेत सहभागी करुन घ्यावे ही नम्र विनंती.

सदर योजनेअंतर्गत आम्हाला अनुदान मंजुर झाल्यास योजनेच्या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यास आमची तयारी आहे. त्याचप्रमाणे योजनेसाठी आलेल्या खर्चाचा ताळेबंद, लेखा परिक्षण अहवाल व कार्यक्रमाचा वृतांत विद्यापीठास विहित मूदतीत पाठविण्यात येईल असे लिहून देतो.

आपला

अधिष्ठाता/प्राचार्य

महाविद्यालयाचा शिक्का

संपर्क प्रतिनिधीचे

मो. नं. नाव व सही

महाविद्यालयाचे बॅंक खाते क्र -

आय.एफ.एस.सी कोड -

बॅंकेचे नाव -

बॅंक शाखेचा पत्ता -

(सहपत्र "२ - ब")

बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेच्या माध्यमातुन व्याख्यानमाला, परीसंवाद, चर्चासत्र किंवा शिबीर यांच्या आयोजनासाठी विद्यापीठामार्फत प्रदान करण्यात आलेल्या अनुदान रक्कमेचा महाविद्यालयाने खर्च करावयाचा तपशिल

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| अ) | व्याख्यानमालेसाठी ( १ दिवस) | |
| | क. वक्त्याचे मानधन (रु.१,००० X २) | रु. २,०००/- |
| | ख. वक्त्यांचा प्रवास खर्च (विद्यापीठाच्या नियमानुसार स्थानिक प्रवासभाडे रु.२५०/- प्रतिवक्ता ( २५० X २) बाहेरगावहुन आलेल्या वक्त्यांसाठी जास्तीत जास्त रु.१,०००/-X २) | रु.५००/- किंवा २,०००/- |
| | ग. प्रशासकीय व अनुषंगीक खर्च | रु.५००/- |
| | प्रति व्याख्यान एकुण | रु.३,०००/- किंवा ४,५००/- |
| ब) | परीसंवाद / शिबीर / चर्चासत्र ( २५ व्यक्तींसाठी १ दिवस) | |
| | क. वक्त्याचे मानधन (रु.१००० X २ वक्ते) | रु. २,०००/- |
| | ख. वक्त्यांचा प्रवासखर्च (विद्यापीठाच्या नियमानुसार स्थानिक प्रवासभाडे रु.२५०/- प्रतिवक्ता ( २५० X २) बाहेरगावहुन आलेल्या वक्त्यांसाठी जास्तीत जास्त रु.१००० X २ वक्ते) | रु.५००/- किंवा २,०००/- |
| | ग. सहभागींचा चहापान व भोजन खर्च | रु. १,०००/- |
| | घ. इतर प्रशासकीय व अनुषंगीक खर्च | रु.५००/- |
| क) | ऑडीट फी रु. ५००/- | रु.५००/- |
| | एकुण | रु.४,५००/- किंवा ६,०००/- |
| | एकुण (अ + ब + क) | रु.७,५००/- किंवा रु.१०,५००/- |

(सहपत्र "३ - अ")

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## नमुना अर्ज

सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना

विद्यार्थीनीचा पासपोर्ट आकाराचा फोटो

प्रति,

मा. संचालक, विद्यार्थी कल्याण

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक.

| | | |
|---|---|---|
| ०१ | विद्यार्थीनीचे संपुर्ण नाव | |
| ०२ | जन्म तारीख व वय | |
| ०३ | मोबाईल नं. व Email Id | |
| ०४ | मागासवर्गीय असल्यास प्रकार | होय / नाही वर्गवारी (अनिवार्य) : |
| ०५ | सध्याचा पत्ता व दुरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ०६ | कायम निवासी पत्ता | |
| ०७ | वडीलांचे / पालकांचे संपुर्ण नाव व पत्ता | |
| ०८ | पालकांचे विद्यार्थीनीशी नाते | |
| ०९ | घरचा दुरध्वनी व मोबाईल क्र. | |
| १० | पालकांचा व्यवसाय / नोकरी | |
| ११ | व्यवसाय / नोकरीचा पत्ता | |
| १२ | वार्षिक उत्पन्न (तहसीलदार यांनी दिलेल्या दाखल्याची स्वसाक्षांकीत छायाप्रत सोबत जोडावी) | |
| १३ | कार्यालय दुरध्वनी क्र. (एस.टी.डी कोडसहित) | |
| १४ | गतवर्षी उत्तीर्ण वर्ग व श्रेणी (स्वसाक्षांकीत गुणपत्रकाची छायाप्रत सोबत जोडावी) | |
| १५ | सध्या शिकत असलेला वर्ग | |
| १६ | कोर्सचे नांव व कालावधी | |
| १७ | कोर्ससाठी प्रवेश घेतल्याचा दिनांक | |
| १८ | कोर्स उत्तीर्ण होण्याचा संभाव्य दिनांक | |
| १९ | महाविद्यालयाचे नाव | |
| २० | महाविद्यालयाचा पत्ता | |
| २१ | प्राचार्यांचे नाव | |
| २२ | शुल्क परतावा किंवा फी सवलत रक्कम, शिष्यवृत्ती / फेलोशिप रक्कम, शिक्षण सहाय्य योजना रक्कम, भारत सरकार / महाराष्ट्र शासन अथवा इतर संस्था यांच्याकडुन मिळणाऱ्या सवलतीबाबत तपशील नमुद करण्यात यावा. | रक्कम रु.<br><br>(सदर रकाना भरणे अनिवार्य) |
| २३ | विद्यार्थीनीचे बॅंकखाते वरील नाव | |
| २४ | बॅंकेच्या शाखेचे नाव व पत्ता | |

| | | |
|---|---|---|
| २५ | बॅक खाते क्रमांक | |
| २६ | बॅक आय एफ एस संकेतांक | |

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी, योजनेबाबत असलेल्या सर्व नियमांचे मी पालन करीन. या संदर्भात नियमात बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे असतील तसेच सदर अनुदान हे विद्यापीठ निधीतून सवलतीच्या स्वरुपात मिळत असुन तो माझा हक्क नाही याची मला जाणीव आहे. मी असेही जाहीर करते की, सदर अर्जात नमुद केलेली सर्व माहिती खरी आहे. ही माहिती खोटी असल्यास / तफावत आढळल्यास मी योग्य त्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र असेन.

विद्यार्थीनीचे नाव व सही :

दिनांक :

मी असे प्रमाणित करतो /करते की, माझ्या पाल्यास भारत सरकार /महाराष्ट्र शासन अथवा इतर संस्थामधून तिच्या शिक्षणासाठी कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ, शुल्क माफ किंवा शुल्क परतावा मिळत नाही/मिळणार नाहीत. तसेच कोणत्याही प्रकारचे स्टायपन्ड (विद्यावेतन) मिळत नाही.

पालकांचे नाव व सही :

दिनांक :

मी असे प्रमाणित करतो /करते की, सदर विद्यार्थीनीस भारत सरकार /महाराष्ट्र शासन अथवा इतर संस्थामधून तिच्या शिक्षणासाठी कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ, शुल्क माफ किंवा शुल्क परतावा मिळत नाही/मिळणार नाहीत. तसेच वरील विद्यार्थीनीस कोणत्याही प्रकारचे स्टायपन्ड (विद्यावेतन) मिळत नाही.

महाविद्यालयाचा शिक्का                                        अधिष्ठाता/प्राचार्याची सही

नाव :

(सहपत्र "३ - ब")

# तपासणी सुची (Check List)

| अ.क्र. | सादर करावयाची कागदपत्रे | होय/नाही | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेला सहपत्र "अ"(नमुना अर्ज ) परिपुर्ण भरला आहे काय ? | | |
| २ | गतवर्षात उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रकाची स्वसाक्षांकीत छायाप्रत जोडली आहे काय ? | | |
| ३ | गतवर्षाचा उत्पन्नाच्या दाखल्याची स्वसाक्षांकीत छायाप्रत (आर्थिक वर्ष - २०२१-२२) जोडली आहे काय ?(फक्त तहसिलदारांचा दाखला) | | |
| ४ | आधारकार्ड ची स्वसाक्षांकीत छायाप्रत | | |

टिप :- महाविद्यालयाने प्रस्तावांची पुर्तता करतांना तपासणी सूची प्रमाणे दस्तावेज तपासूनअनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.

**College Clerk** **Dean/Principal**

**Mob. No.**

**(Name, Signature & Stamp)**

(सहपत्र : "सहपत्र ४ - अ")

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना

## क्लेम फॉर्म (CLAIM FORM)

विद्यार्थ्याचा प्राणघातक अपघात झाला किंवा अपघातात अपंगत्व आल्यास किंवा अपघातात/नैसर्गिक/गंभीर आजाराने मृत पावल्यास/आजारी असल्यास प्रस्तावासोबत क्लेम फॉर्म जोडावा.

१) दावा धारकाची माहिती :
अ) संपुर्ण नाव : ..............................................................................................

ब) पुर्ण पत्ता : ...............................................................................................

क) दूरध्वनी क्र. : .................................. ड) व्यवसाय : ..................................

ड) विद्यार्थी मृत पावला असेल तर विद्यार्थ्या सोबतचे नाते (आई,वडील,भाऊ,बहिण इ.) :
.......................................

इ) दावा धारकाचे बॅंक खातेवरील नाव : .............................................. , बॅंकेच्या शाखेचे नाव व पत्ताः .................................................... , बॅंक खाते क्र. .... ........................., बॅंक आय.एफ.सी.कोड. ......................

२) गंभीर आजाराने मृत पावलेल्या/अपघातात मृत पावलेल्या/गंभीर आजार झालेला विद्यार्थ्याची माहिती
अ) विद्यार्थ्याचे संपुर्ण नाव : ...............................................................................

ब) महाविद्यालयाचे नाव : ....................................................................................

क) महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचा दिनांक : .................

ड) सध्या शिकत असलेला अभ्यासक्रम व वर्ष : ......

३) अपघाताबद्‌दलचा/आजाराबद्‌दलचा तपशिल
अ) अपघात/आजारी केंव्हा व कोणत्या ठिकाणी झाला (तारीख, वेळ व ठिकाण नमूद करावे) :

...................................................................................................................................

ब) अपघाताचे/आजाराचे कारण आणि अपघातात झालेली दुखापत : ......................................................

...................................................................................................................................

क) अपघात झाल्याबाबतची सुचना पोलिस स्टेशनला दिली होती का?दिली असल्यास पोलिस स्टेशनचे नाव नमूद करावे

व FIR ची साक्षांकित प्रत जोडावी : ............................................................................................................

..............................................................................................................................................................

ड) विद्यार्थी अपघातात मृत्यु पावला असेल तर, मृत विद्यार्थ्याचे शव विच्छेदन करण्यात आलेल्या शासकीय रुग्णालयाचे नाव

(शव विच्छेदन अहवालाची साक्षांकित प्रत व मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत जोडावी) : ..................................................

इ) साक्षीदाराचे नाव व संपर्क क्रं. : ..................................................................................................................

४) वारसाहक्क प्रमाणपत्र : अपघाताने/गंभीर आजाराने मृत्यु झालेल्या विद्यार्थ्याचे/विद्यार्थीनीचे वडील/आई/पालक असून संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजनेनुसार मिळणाऱ्या अर्थसहाय्य रक्कमेचा धनादेश/डी.डी.

माझे नावे.................................................पत्ता............................................ ................................................... काढून वरील पत्त्यावर पाठविण्यास विनंती.

मी असे प्रमाणित करतो की, वर नमूद केलेली माहिती सत्य आहे.

दिनांक : / /२०२१ हक्कदार व्यक्ती/दावाधारक/पालक स्वाक्षरी,

ठिकाण : (नावः )

(सोबत : आधारकार्ड/ पॅनकार्ड/किंवा शासकीय ओळखपत्र)

पडताळणीसाठी २ व्यक्तींची माहिती

| अ.क्र. | नाव | फोन नंबर | सही |
|---|---|---|---|
| १ | .................................. | .................................. | .................................. |
| २ | .................................. | .................................. | .................................. |

५) वैद्यकीय उपचाराची माहिती

अ) रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नाव व पत्ता, संपर्क क्रमांक व वैद्यकीय अधिकाऱ्याचे/वैद्यकीय व्यावसायिकाचे नाव : ..........................................................................................................................

ब) उपचारासाठी झालेला खर्च (खर्चाची मुळ देयके क्रमवार सोबत जोडावी): ........................................................

६) अपंगत्व आल्याची माहिती

अ) निकामी झालेले अवयव (उदा.हात, पाय, डोळा इ.) : ..........................................................................

ब) अपंगत्व कायमचे/अस्थायी स्वरुपाचे : ..............................................................................................

अपघात/कायमचे अपंगत्व/गंभीर आजार दाव्यासोबत महाविद्यालयाने दयावयाचे प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो की, दि. / /२० ते दि. / /२० असे एकुण .......................... दिवस अपघातामुळे/कायमचे अपंगत्व आल्यामुळे/गंभीर आजारामुळे ...................................................... या रुग्णालयात उपचार घेत असल्याने, महाविद्यालयात गैरहजर होता/होती.

प्रस्तावासोबत जोडलेले सर्व वैद्यकीय कागदपत्रे तपासले असुन, सर्व कागदपत्रे साक्षांकित व बरोबर असल्याचे खात्री केली. सदर विद्यार्थी/विद्यार्थीनीस विद्यापीठ नियमानुसार झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती मिळणेकरीता शिफारस करत आहे.

महाविद्यालयाचा शिक्का

अधिष्ठाता/प्राचार्य सही व शिक्का

नाव :

..........................................................................................

मृत्यु दाव्यासोबत महाविद्यालयाने दयावयाचे प्रमाणपत्र

दि. / /२० पासुन ...................................................... या अपघाताने /गंभीर रोगाने आजारी असल्याने दि. / /२० रोजी .............................................................................................. या रुग्णालयात मृत घोषित करण्यात आला / आली.

प्रस्तावासोबत जोडलेले सर्व वैद्यकीय कागदपत्रे तपासले असुन, सर्व कागदपत्रे साक्षांकित व बरोबर असल्याचे खात्री केली. सदर विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या पालक श्री/सौ. ................................ यांना विद्यापीठ नियमानुसार अर्थसहाय्यता मिळणेकरीता शिफारस करत आहे.

महाविद्यालयाचा शिक्का

अधिष्ठाता/प्राचार्य सही व शिक्का

नाव :

(सहपत्र : "सहपत्र ४ - ब")

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना

## वैद्यकीय प्रमाणपत्र

सदर प्रमाणपत्रासोबत आजारी/अपघात झाल्याबाबतचे पुरावे जोडावे.

१) आजारी/अपघातग्रस्त विद्यार्थ्याची माहिती

अ) संपुर्ण नाव : ..........................................................................................................

ब) वय : ..........................................................................................................

२) आजाराचा/अपघाताचा प्रकार व कारण

अ) अपघातात जखमी/अपंगत्व आल्याचे पुर्ण वर्णन : ........................................................

..........................................................................................................

ब) शरीरावर झालेल्या जखमा अपघातापूर्वी होत्या का ?: ........................................................

३) आजाराअंतर्गत/अपघाताअंतर्गत उपचारासाठी प्रथम कोणत्या तारखेला तपासणी केली ? :
...................

४) आजारग्रस्त/अपघातग्रस्त विद्यार्थी सध्या उपचाराने बरा झाला का? नसल्यास किती कालावधी लागला ?

..........................................................................................................

५) आजारग्रस्त/अपघातग्रस्त विद्यार्थी अपघात होण्यापुर्वी एखादया रोगाने आजारी होता का? अशा

परीस्थीतीत रुग्णाला बरा होण्यासाठी काही अडथळे आले का? असल्यास तपशिल नमुद करावा ?

..........................................................................................................

६) रुग्णाची सध्याची परीस्थिती :..........................................................................................................

..........................................................................................................

७) कायमचे अपंगत्व आले आहे का ? आले असल्यास अपंगत्वाचे प्रमाण (%) किती आहे.

..........................................................................................................

८) अपंगत्वामध्ये शरीराचे कोणते अवयव निकामी झाले आहेत

..........................................................................................................

मी असे प्रमाणित करतो की, सदर रुग्णास मी वैयक्तीक तपासले असून वर नमुद केलेली माहिती खरी आहे.

स्थळ :

दिनांक : / /२०

वैद्यकीय व्यावसायिक/ अधिकाऱ्याची स्वाक्षरी : ----------

नाव : ..........................................................................................................

शैक्षणिक पात्रता :..........................................................................................................

नोंदणी क्रं. ..........................................................................................................

पत्ता : ..........................................................................................................

(सहपत्र "५")

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## "कमवा व शिका" योजनेतंर्गत प्रवेश मिळविण्यासाठी
## विद्यार्थ्यांने करावयाचा नमुना अर्ज

पासपोर्ट
आकाराचा फोटो

१. विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव
:________________________________________

२. शिकत असलेल्या महाविद्यालयाचे नाव :
________________________________________

३. विद्यार्थ्याचा कायम निवासी
पत्ताः________________________________________
________________________________________
________________________________________

४. मोबाईल नंबर / दुरध्वनी क्र. (STD)
कोडसहः________________________________________

५. ईमेल आयडीः- ______________________________

६. जन्म तारीखः- ______________________________ वयः-
__________वर्ष

७. सध्या शिकतअसलेला वर्ग आणि कोर्सः ______________________________

८. मागीलवर्षी झालेल्या परीक्षेत मिळालेले एकूण गुण व टक्केवारी(%):__________
(गतवर्षीच्या गुणपत्रिकेची स्वसांक्षांकित प्रत सोबत जोडावी.)

९. वडीलांचे/पालकांचे संपूर्ण नाव श्री / श्रीमतीः ______________________________

१०. नोकरी / व्यवसाय________________________________________

११. एकत्रित वार्षिक उत्पन्न :रु. ______________________________

(तहसिलदारांनी दिलेल्या उत्पन्नाचा दाखला स्वसांक्षांकित करुन जोडावा.)

१२. कोणते काम निवडले आहे.:

१)________________________________________

२)________________________________________

३)________________________________________

१३. अध्ययन तासिका कालावधी :__________________________

१४. मागास वर्गीय असल्यास प्रकार : __________ प्रवर्ग : __________

१५. विद्यार्थ्यांचा आधारकार्ड नंबर : ____________ ( आधारकार्ड स्वसाक्षांकीत प्रत सोबत जोडणे अनिवार्य )

१६. योजनेच्या अटी, शर्ती, हिशोब, आर्थिक व्यवहार याबाबत सर्व नियमांचे मी पालन करीन व माझ्या शैक्षणिक अध्ययनात खंड पडू देणार नाही अशी मी हमी देतो/देते.

वर नमूद केलेली सर्व माहिती खरी आहे.

विभाग प्रमुखाचे नाव व स्वाक्षरी | विद्यार्थ्यांचे नाव व स्वाक्षरी

सदर विद्यार्थी गरीब व गरजु असून योजनेसाठी दिलेली माहिती खरी आहे.

महाविद्यालयाचा शिक्का | अधिष्ठाता/प्राचार्याची सही

# - योजना समन्वयक -

संचालक - विद्यार्थी कल्याण,

विद्यार्थी कल्याण विभाग, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,

नाशिक.


वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२ ००४

दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५३९१७०, २५३९१७३,

२५३९१६९

ई -मेल :- sw@muhs.ac.in

संकेत स्थळ :- www.muhs.ac.in

| | |
|---|---|
|  | Savitribai Phule Scholarship for Girl Students |
|  | Earn While Learn Scheme |
|  | Extra Mural Studies |
|  | Dhanwantri Vidhyadhan Yojana |
|  | Sanjivani Student Safety Scheme |